इचलकरंजी ICHALKARANJI ▸ वर्ष - ४१ ▸ अंक - १८४ ▸ शुक्रवार,ता.७ नोव्हेंबर २०२५ ▸ पाने १२+४=१६ इचलकरंजी आर.एन.आय.रजि.नं.63119/94 ▪ पोस्टल रजि.नं.|KLR/78/ 2024-2026

**एच-१ बी कामगारांना कॅनडात नोकऱ्या**

**ओटावा,ता. ६**-अमेरिकेत एच-१बी व्हिसाची फी तब्बल १ लाख अमेरिकन डॉलर (सुमारे ₹८८ लाख) झाल्यामुळे आता कंपन्यांसाठी परदेशी कामगारांना नोकरी देणे खूप कठीण झाले आहे. याशिवाय काही असे एच-१बी व्हिसाधारक आहेत, जे सध्या अमेरिकेत काम करत असले तरी ते तेथे कायमस्वरूपी राहण्याची इच्छा बाळगत नाहीत. अशा परिस्थितीत कॅनडा आता या व्हिसाधारकांना आपल्या देशात काम देण्याच्या तयारीत आहे. अमेरिकेत अलीकडेच एच-१बी व्हिसाची फी वाढल्यामुळे अनेक कुशल कामगार प्रभावित झाले आहेत आणि आता कॅनडा त्यांनाच आपल्या देशात आणू इच्छित आहे.

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव

**मांजाने दुचाकीस्वाराचा गळा चिरला**

**वर्धा,ता.६**-

जिल्ह्याच्या देवळी तालुक्यातील भिडी येथील दुचाकीस्वाराचा पतंगाच्या नायलॉन मांजामुळे गळ्याला फास लागून मृत्यू झाला. सुभाष शेलोटे हे शेतातील फवारणीचे काम आटोपून दुचाकीने घराकडे जात असताना रस्त्यावर गळ्याला पतंगाचा मांजा आवळला गेला.

मांजा अतिशय घातक आणि धारदार असल्याने त्यांचा गळा चिरला व गळ्याला घट्ट फासही बसला. त्यामुळे शेलोटे यांचा नायलॉन मांजाच्या धाग्याने बळी घेतला.मांजाला बंदी असताना हा नॉयलॉन मांजा येतो कुठून? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

www.emahasatta.com e-mail : mahasatta@gmail.com mahasattaadvt@gmail.com किंमत ₹ ५.००

# अठराशे कोटीची जमीन तीनशे कोटीत खरेदी

## पार्थ पवार यांच्या कंपनीवर कमी किंमतीत जमीन खरेदीचा आरोप

■ पुणे,ता.६-

पुण्यातील प्रतिष्ठित आणि महागड्या कोरेगाव पार्क परिसरातील ४० एकर जमिनीच्या व्यवहारावरून मोठे वादळ उठले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्या मालकीची अमेडिया



कंपनी आणि दिग्विजय अमरसिंह पाटील या सहमालकाविरोधात मोठ्या आर्थिक घोटाळ्याचे आरोप केले जात आहेत.या जमिनीची बाजार किंमत सुमारे ३०० कोटी रुपये असल्याचे कागदोपत्री दाखवले गेले आहे. परंतू प्रत्यक्ष किंमत १८०० कोटी रुपयांपर्यंत असल्याचा दावा करण्यात आला आहे.

अमेडिया कंपनीने या जमिनीची खरेदी करताना आयटी पार्क उभारणीच्या नावाखाली सरकारकडून स्टँप ड्युटी माफी मिळवल्याचे आरोपात नमूद करण्यात आले आहे. २२ एप्रिल २०२५ रोजी कंपनीने आयटी प्रकल्पाचा ठराव केला आणि फक्त दोन दिवसांत म्हणजे २४ एप्रिलला उद्योग (पान २ वर)

**पार्थ पवार यांनी स्वत:वरील आरोप फेटाळले आहेत.एका वृत्तवाहिनीशी बोलताना त्यांनी सांगितले की, मी कोणताही चुकीचा व्यवहार केलेला नाही किंवा कोणताही गैरप्रकार घडलेला नाही.मात्र, त्यांनी अधिक माहिती देण्यास नकार दिला. या भूमिकेमुळे प्रकरण अधिक गूढ झाले असून, राज्यात यावरून जोरदार चर्चा सुरू आहे.**

**सुरुवातीला याप्रकरणी माध्यमांना टाळणाऱ्या अजित पवार यांनी अखेर समोर येऊन आपली भूमिका मांडली. माझा त्या व्यवहाराशी दुरान्वये संबंध नाही, मी कुणालाही फोन केला नाही किंवा चुकीच्या कामाला माझे कसलेही समर्थन नाही अशी प्रतिक्रिया अजित पवार यांनी दिली. तसेच, मुख्यमंत्र्यांनी जरूर चौकशी करावी असेही त्यांनी म्हटले आहे.**

### तहसिलदार,दुय्यम निबंधक निलंबित

### अतिरिक्त मुख्य सचिव खारगे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन

पुण्यातील जैन बोर्डिंग आर्थिक व्यवहारानंतर आता उपमुख्यमंत्री अजित पवारांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्या कंपनीलाही पुण्यातील १८०० कोटींची जमीन केवळ ३०० कोटींमध्ये विकल्याची माहिती समोर आली आहे. विरोधकांनी याप्रकरणी रान उठवल्यानंतर आता सरकारने कारवाईला सुरुवात केली असून पुण्यातील संबंधित जागा प्रकरणी तहसिलदारांचे तडकाफडकी निलंबन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे आदेश दिल्याने राज्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.या व्यवहारात स्टँप ड्युटीही पाचशे रूपये फक्त आकारण्यात आल्याचे दिसून आल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच, व्यवहारात अनियमितता झाली असेल तर ते चुकीचे आहे. कुठेही अनियमितता (पान २ वर)

राज्यातील २९ महापालिका निवडणुकांसाठी

# मतदार यादीचा सुधारित कार्यक्रम जाहीर

### मतदार यादीतील सुधारणांची प्रक्रिया वेळापत्रकानुसार;राज्य निवडणूक आयोगाचे महापालिका आयुक्तांना आदेश

■ मुंबई, ता.४ -

**राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील २९ महानगर पालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादीचा सुधारित कार्यक्रम २०२५ जाहीर केला आहे. आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांच्या स्वाक्षरीने हा आदेश सर्व महानगरपालिका आयुक्तांना पाठविण्यात आला असून, मतदार यादीतील सुधारणांची प्रक्रिया आता ठराविक वेळापत्रकानुसार पार पाडली जाणार आहे.**

या सुधारित वेळापत्रकानुसार निवडणुकीच्या तयारीचा एक महत्त्वाचा टप्पा सुरू झाला आहे. आयोगाने दिलेल्या आदेशानुसार मतदार यादीतील अद्ययावत व पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी सर्व महानगरपालिकांनी कार्यक्रमानुसार (पान २ वर)

**१४ नोव्हेंबर :** निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या विधानसभेच्या मतदार यादीनुसार तयार केलेली प्रारूप मतदार यादी प्रसिध्द करण्यात येईल.

**२२ नोव्हेंबर:** प्रारूप मतदार यादीवरील हरकती व सूचना दाखल करण्याची अंतिम तारीख

**६ डिसेंबर:** दाखल हरकतींचा निपटारा करून प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी अधिप्रमाणित करून प्रसिध्द केली जाईल.

**८ डिसेंबर:** मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी प्रसिध्द केली जाईल.

**१२ डिसेंबर :** मतदान केंद्रनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात येईल.

# जरांगे-पाटील यांच्या हत्येचा कट

■ बीड,ता.६-

**मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांना जीवे मारण्याचा कट रचल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.पोलीसांच्या प्राथमिक**



**माहितीनुसार, जरांगे पाटील यांच्या हत्येसाठी अडीच कोटी रुपयांची सुपारी देण्यात आली होती.**

या प्रकरणी जालना पोलीस अधीक्षकांना

### ● अडीच कोटीची सुपारी
### ● दोन जण ताब्यात

जरांगे पाटील यांचे सहकारी गंगाधर काळकुटे यांनी तक्रार दिल्यानंतर, स्थानिक गुन्हे शाखेने तातडीने कारवाई केली आणि बीड जिल्ह्यातून दोन संशयितांना ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या व्यक्तींची दादा गरुड आणि अमोल खुणे अशी नावे आहेत.यापैकी अमोल खुणे हा जरांगे पाटील यांचाच पूर्वीचा सहकारी असल्याचे समोर आले असून, या दोघांची पोलिसांकडून कसून चौकशी सुरू आहे. पोलिसांच्या तपासातून समोर आलेल्या माहितीनुसार, बीड शहरात काही दिवसांपूर्वी जरांगे पाटील यांच्या हत्येचा (पान २ वर)

**या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन मनोज जरांगे पाटील यांनी स्वत: रात्री उशिरा जालना पोलीस अधीक्षकांची भेट घेतली.जरांगे पाटील म्हणाले की, मराठा आरक्षणासाठी सुरू असलेल्या आंदोलनाला कमजोर करण्यासाठी काही शक्ती प्रयत्न करत आहेत.पण आम्ही मागे हटणार नाही. आमच्या जीवावर बेतले तरी आम्ही समाजासाठी लढत राहू.पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या आरोपींची कसून चौकशी सुरू केली असून, या कटामागे कोण, कशासाठी आणि किती लोक सहभागी आहेत हे शोधण्याचे प्रयत्न सुरू आहेत.**

# तलाठी,कोतवाल ‘लाचलुचपत’च्या जाळ्यात

### १० हजारांची लाच घेताना कारवाई

■ इचलकरंजी,ता.६-

**वारसा नोंदीसाठी गट खुला करण्याकरीता १० हजार रुपयांची लाच घेताना शहापूर येथील तलाठी आणि कोतवाल लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात रंगेहाथ सापडले. गणेश विष्णुपंत सोनवणे (वय ३२, रा. मगदुम कॉलनी, जयसिंगपूर) असे तलाठ्याचे तर नेताजी केशव पाटील (वय ४५ रा. म्हसोबा रोड दर्गा गल्ली, शहापूर) असे कोतवालचे नाव आहे. ही कारवाई**



गणेश सोनवणे



नेताजी पाटील

**स्टेशन रोडवरील गुरुचित्र मंदिर परिसरात करण्यात आली. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु होते.**

याबाबतची अधिक माहिती अशी, तक्रारदाराने वारसा नोंद करण्यासाठी शहापूर तलाठी कार्यालयात कागदपत्रे दिली होती. कागदोपत्री नांव नोंदणीसाठी तक्रारदार शहापूरचे तलाठी गणेश सोनवणे आणि कोतवाल नेताजी पाटील यांच्याकडे पाठपुरावा करत होते. या नोंदीकरीता गट नं. ७२९ हा ब्लॉक असलेला गट खुला करण्यासाठी कोतवाल पाटील याने तलाठी सोनवणे यांच्यासाठी २५ हजार रुपये लाचेची मागणी केली होती. (पान २ वर)

**तलाठी,कोतवालच्या घरांची झडती**

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईनंतर तलाठी सोनवणे आणि कोतवाल पाटील या दोघांच्याही घरांची झाडाझडती घेतल्याचे सांगण्यात आले. दोघाही संशयितांना शिवाजीनगर पोलीस ठाण्यात आणल्यानंतर हातकणंगले आणि शिरोळ तालुक्यातील गावातील तलाठी आणि संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस ठाण्याच्या आवारात गर्दी केली होती.**

### लढाऊ जहाज ‘इक्षक’ नौदलाच्या ताफ्यात दाखल

■ कोची,ता.६-

**भारतीय नौदलाच्या जलक्षेत्र सर्वेक्षण क्षमतेला बळकटी देणारे ‘इक्षक’ हे अत्याधुनिक सर्वेक्षण जहाज गुरूवारी नौदलाच्या ताफ्यात सामील झाले.**

नौदल प्रमुख अॅडमिरल दिनेश त्रिपाठी यांच्या उपस्थितीत हा समारंभ झाला. दक्षिण नौदल कमांडचा भाग असलेले हे सर्वेक्षण जहाज महासागरीय क्षेत्रांचा शोध घेण्याचे आणि भारताच्या विशाल सागरी सीमांचे रक्षण करण्याचे आपले ध्येय पार पाडेल.कमिशनिंग क्रूचे अभिनंदन करताना नौदल प्रमुख अॅडमिरल दिनेश के.त्रिपाठी (पान २ वर)

# राहुल गांधी यांचा हायड्रोजन बॉम्ब फुसकाच

### तो फोटो मॉर्फ केल्याचे उघड-फडणवीस

■ नागपूर,ता.६-

**राहुल गांधी जेव्हा हायड्रोजन बॉम्ब म्हणतात, तेव्हा तो फुसका ठरतो, हे याआधी सिध्द झाले**



**आहे. त्यांनी दाखवलेला फोटो हा मॉर्फ केलेला असल्याचे माध्यमांनी उघड केले आहे.**

त्या फोटोतल्या काही मतदारांची ओळख पटवली गेली असून, त्या मतदारांचा शोधही माध्यमांनी घेतला आहे.त्यामुळे राहुल गांधी यांची ही मोहीम लोकशाहीला डळमळीत करण्याच्या आंतरराष्ट्रीय अजेंड्याशी संबंधित असल्याचा संशय उपस्थित होत आहे.भारताच्या लोकशाहीवर आणि संविधानाने उभारलेल्या संस्थांवर जनतेचा विश्वास कमी करण्याचा प्रयत्न सुरू असल्याची (पान २ वर)

# सोलापूरमध्ये विमानाच्या पंखात पतंगाचा मांजा अडकला

■ सोलापूर,ता.६-

**सोलापूरमध्ये विमानाचे लॅण्डींग होताना विमानाच्या पंखात पतंगाचा मांजा अडकल्याची घटना घडली.मात्र पायलटच्या सतर्कतेमुळे मोठी जीवित हानी टळली आहे. या प्रकरणी नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या विक्रेत्यावर पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पतंग उडवणाऱ्या मुलांना सुरक्षा रक्षकांनी चांगलीच समज दिली आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, सकाळच्या सुमारास दोन अल्पवयीन मुले विमानतळ परिसरातील सुरक्षा भिंतीवरून उडी मारून विमानतळ परिसरात शिरले.विमानतळ परिसरात मोकळ्या आभाळात ते पतंग उडवू लागले.




**थोडक्यात दुर्घटना टळली**

दुपारी दोनच्या सुमारास मुंबईहून सोलापूरला एक विमान दाखल झाले. यामध्ये एकूण ३४ प्रवासी प्रवास करत होते.सोलापूर विमानतळाच्या रनवेवर हे विमान लँड करत असताना विमानाच्या पंखात मांजा अडकला.ही बाब पायलटच्या लक्षात येताच पायलट सतर्क झाले. त्यांनी सतर्कता दाखवत सुरक्षितपणे विमान लँड केले.त्यामुळे ३४ प्रवाशांवरचे (पान २ वर)

### मनी लाँड्रिंग प्रकरण

# अनिल अंबानींना ईडीकडून पुन्हा समन्स

■ नवी दिल्ली,ता.६-

**अंमलबजावणी संचालनालयाने रिलायन्स एडीए ग्रुपचे प्रमुख अनिल अंबानी यांना मनी लाँड्रिंग प्रकरणात चौकशीसाठी १४ नोव्हेंबरला हजर राहण्याचे समन्स बजावले आहे.**



यापूर्वी ईडीने अनिल अंबानींच्या नेतृत्वाखालील रिलायन्स ग्रुपविरुध्द मोठी कारवाई करत अंदाजे ३,०८४ कोटींची मालमत्ता तात्पुरती जप्त केली. यामध्ये अंबानी कुटुंबाचा मुंबईतील पाली हिल्स येथील बंगला, दिल्लीतील रिलायन्स सेंटर आणि इतर अनेक शहरांमधील मालमत्तांचा समावेश आहे. ही कारवाई ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी पीएमएलएच्या कलम ५(१) अंतर्गत करण्यात आली होती. २०१७ ते २०१९ दरम्यान, येस बँकेने (पान २ वर)

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
|---|---|
| १२०४०० रु. | १४८५०० रु. |

अंडी ६४५ रुपये शेकडा

**हास्यतुषार- सुरेंद्र दास**



सत्तेत एकत्र असताना मुलाला अडचणीत आणणे,ते ही निवडणुकीच्या तोंडावर, यालाच राजकारण म्हणतात!

### उद्घाटनानंतर तासाभरातच नव्या समांतर पुलावर अपघात

■ सांगली,ता.६ (प्रतिनिधी)-

**कृष्णा नदीवरील आयर्विन पुलाला समांतर पुलाचा लोकार्पण सोहळा गुरुवारी झाला. उद्घाटनानंतर तासाभरात त्या नव्या पुलावर अपघात झाला. पुलावरील पदपथाच्या बाजूला असणाऱ्या कट्ट्यांवर एक चारचाकी गाडी धडकली आणि कट्टा फुटला. सायंकाळच्या सुमारास हा अपघात झाला.**

अधिक माहिती अशी, की आयर्विन पुलाला समांतर पुल उभारण्यासाठी आमदारांनी पुढाकार घेतला. त्यापूर्वी जुन्या पुलावरून अवजड वाहतूक बंद करण्यात आली होती. त्यानंतर पुलाचे काम सुरू झाले. कोट्यवधीचा निधी खर्च करून हा पुल उभारण्यात आला होता. त्याचे काही किरकोळ काम शिल्लक राहिल्याने या पुलाचे उद्घाटन राहिले होते. आज त्याच पुलाचे उद्घाटन झाले. (पान २ वर)

# बिहारमध्ये पहिल्या टप्प्यात ६०.१८ टक्के मतदान



■ पाटणा,ता.६ -

**बिहारमध्ये १८ जिल्ह्यांमधील १२१ मतदारसंघांमध्ये झालेल्या पहिल्या टप्प्यातील निवडणुकीत गुरुवारी सायंकाळी ५ वाजेपर्यंत विक्रमी ६०.१८ टक्के मतदान झाले.मतदारांनी १,३१४ उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएममध्ये सील केले.**

### २५ वर्षांनंतर उच्चांकी मतदानाची नोंद

### १३१४ उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएममध्ये बंद

### दोन उपमुख्यमंत्र्यांसह १८ मंत्र्यांची प्रतिष्ठा पणाला

बेगुसरायमध्ये सर्वाधिक ६७.३२ टक्के , तर राजधानी पाटणा येथे ५५.०२ टक्के मतदान झाले. तर शेखपुरा येथे सर्वांत कमी ५२.३६ टक्के मतदान झाले. (पान २ वर)

### मुलीची छेड काढल्याप्रकरणी वाहन चालकावर गुन्हा दाखल

■ हातकणंगले,ता.६(प्रतिनिधी)-

**मजले (ता.हातकणंगले) येथे अल्पवयीन मुलीची छेड काढून लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केल्या प्रकरणी एकावर हातकणंगले पोलीसांत गुन्हा दाखल झाला आहे.**



प्रमोद रामचंद्र घारगे (वय ४०, रा. मजले ता. हातकणंगले) असे संशयिताचे नाव असून त्याच्या विरोधात हातकणंगले पोलीसात बालकांचे लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबतची फिर्याद पीडित मुलीच्या आईने दिली आहे.या प्रकारामुळे परिसरात संतापाची लाट उसळली आहे. (पान २ वर)

(पान १ वरून)

## जमीन तीनशे कोटीत खरेदी

संचालनालयाने त्यावर स्टँप ड्युटी माफ असा शेरा नोंदवला.इतक्या वेगाने झालेल्या प्रशासकीय हालचालींनी संशय निर्माण केला आहे.या संपूर्ण व्यवहारासाठी फक्त ५०० रुपयांची स्टँप ड्युटी भरल्याचे समोर आले असून, एवढ्या मोठ्या मूल्याच्या जमिनीचा व्यवहार फक्त काही आठवड्यात पूर्ण झाला.सदर जमीन ही महार वतनाची असल्यामुळे कायद्यानुसार तिचा व्यवहार करता येत नाही, असा तज्ज्ञांचा दावा आहे. वतनधारक जमीन विकली गेल्यास त्या किमतीचा काही भाग सरकारला नजराण्याच्या स्वरूपात द्यावा लागतो.मात्र, या व्यवहारातील कागदपत्रांमध्ये असा कोणताही उल्लेख नसल्याचे सांगितले जात आहे. कागदोपत्री हा व्यवहार पॅरामाऊंट इन्फ्रास्ट्रक्चर या शीतल तेजवानी यांच्या कंपनीसोबत झाला असल्याचे भासवले असले तरी प्रत्यक्षात अमेडिया कंपनीने मूळ गायकवाड आणि २७४ जमिनमालकांसोबत खरेदी खत नोंदवले असल्याचे उघड झाले आहे.या प्रकरणातील आर्थिक देवाणघेवाण,चेक,एनईएफटी व्यवहार किंवा बँक पुरावे, हे नोंदणी दस्तावेजात जोडले गेले नाहीत, यावरून या व्यवहारातील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.या प्रकरणामुळे पुणे आणि राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे.पार्थ पवार आणि दिग्विजय पाटील या दोघांचे नाते उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कुटुंबाशी संबंधित असल्याने प्रकरणाला राजकीय रंग चढला आहे. विशेष म्हणजे, इतक्या मोठ्या मूल्याच्या व्यवहारात फक्त ५०० रुपयांची स्टँप ड्युटी भरली गेली हे पाहता, शासनानेच काही विशिष्ट कंपन्यांना लाभ मिळावा, अशी योजना आखली का? असा संशय व्यक्त केला जात आहे. सध्या या प्रकरणाची चौकशी सुरू असून, कागदपत्रांची तपासणी,मूल्यांकन अहवाल आणि धोरणाच्या अंमलबजावणीतील पारदर्शकतेचा तपास करण्याचे संकेत प्रशासनाकडून दिले गेले आहेत. या वादामुळे आगामी निवडणुकांपूर्वी अजित पवार आणि त्यांच्या कुटुंबावर राजकीय दबाव वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## जरांगेंच्या हत्येचा कट

कट रचण्यासाठी गुप्त बैठकाही घेण्यात आल्या होत्या.या बैठकीत जरांगे पाटील यांच्या ओळखीतील काही जण उपस्थित होते. या बैठकीदरम्यान हत्येसाठी अडीच कोटी रुपयांची डील ठरल्याची चर्चा आहे. ही माहिती मिळताच गंगाधर काळकुटे यांनी पोलिसांकडे लेखी निवेदन देऊन तक्रार केली. तक्रार मिळाल्यानंतर पोलिसांनी मध्यरात्री बीडमध्ये छापा मारून दोघांना चौकशीसाठी ताब्यात घेतले. प्राथमिक चौकशीत आरोपींनी एका मोठ्या राजकीय नेत्याचे नाव घेतल्याची माहिती सूत्रांकडून समोर येत आहे. मात्र, पोलिसांनी अधिकृतरीत्या कोणतेही नाव जाहीर केलेले नाही.राज्यात या प्रकरणामुळे मोठी खळबळ उडाली आहे. कारण मनोज जरांगे पाटील हे सध्या मराठा आरक्षणाच्या चळवळीचे प्रमुख चेहरे आहेत आणि त्यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर मोठे आंदोलन झाले. त्यामुळे त्यांच्या हत्येचा कट रचल्याचा प्रकार समोर येणे ही अत्यंत गंभीर बाब मानली जात आहे. यामागे कोणत्या राजकीय शक्तींचा हात आहे का? हे पोलीस तपासातून समोर येणार आहे.

## चौकशी समिती स्थापन

झाली असेल तर कारवाई झालीच पाहिजे, या मताचे आम्ही आहोत, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले होते. मुख्यमंत्र्यांनी दुपारी १२ वाजता कारवाईचे संकेत दिल्यानंतर आता दोन तासांच्या आतच याप्रकरणात तहसीलदारांचे निलंबन करण्यात आले आहे.

पार्थ पवार यांच्या कंपनीला देण्यात आलेल्या जमीन प्रकरणात अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करण्यात येणार आहे. तत्पूर्वी, पुणे तहसीलदार सूर्यकांत येवले यांचे तात्काळ प्रभावाने निलंबित करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. पार्थ पवार यांच्या कंपनीसाठी झालेल्या जमीन व्यवहारप्रकरणी तहसीलदारानंतर दुय्यम निबंधक रविंद्र तारुही निलंबित झाले आहेत.

## पतंगाचा मांजा अडकला

मोठे संकट दूर झाले.याप्रकरणी शोध घेतला असता विमानतळ परिसरात काही अल्पवयीन मुले पतंग उडवत असल्याची माहिती समोर आली. पोलिसांनी या मुलांचा शोध घेत मुलांना आणि त्यांच्या पालकांना चांगली समज दिली.

## ईडीकडून पुन्हा समन्स

आरएचएफएल आणि आरसीएफएलमध्ये अंदाजे ५,००० कोटींची गुंतवणूक केली.आरएचएफएलमध्ये २,९६५ कोटी आणि आरसीएफएलमध्ये २,०४५ कोटी. त्यानंतर ही गुंतवणूक दिवाळखोरीत निघाली. ज्यामुळे डिसेंबर २०१९ पर्यंत आरएचएफएलवर १,३५३ कोटी आणि आरसीएफएलवर १,९८४ कोटींची थकबाकी होती.

ईडीने म्हटले आहे की,अनिल अंबानी समूहात रिलायन्स निप्पॉन म्युच्युअल फंडद्वारे केलेली थेट गुंतवणूक बेकायदेशीर होती.तरीही म्युच्युअल फंड निधी अप्रत्यक्षपणे येस बँकेद्वारे रिलायन्स समूहाच्या कंपन्यांकडे वळवण्यात आला. आरएचएफएल आणि आरसीएफएलने दिलेल्या कॉर्पोरेट कर्जाचा एक महत्त्वाचा भाग या गटांशी संलग्न कंपन्यांना गेला आणि निधीचा गैरवापर झाला.

## हायड्रोजन बॉम्ब फुसकाच

प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.नागपुरातील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था (एम्स) येथे गुरुवारी एका कार्यक्रमासाठी आले असता ते माध्यमांशी बोलत होते. उध्दव ठाकरे यांच्या दौऱ्याबाबत ते म्हणाले, मला आनंद आहे की ते घराबाहेर पडले आहेत.मात्र,ते मुख्यमंत्री असताना शेतकऱ्यांवर संकट आले होते, तेव्हा त्यांनी खाली उतरून लोकांमध्ये जाण्याचे टाळले होते. आता सततच्या राजकीय पराभवामुळे त्यांना लोकांमध्ये जाण्याची गरज जाणवू लागली आहे. पण आपणच पाहत आहात की, ज्या ठिकाणी उध्दव ठाकरे जात आहेत तिथे लोक पाठ फिरवत आहेत. त्यामुळे निवडणुका डोळ्यासमोर ठेवूनच त्यांचा दौरा सुरू आहे, असे फडणवीस म्हणाले. दुसरीकडे शेतकऱ्यांना सरकारचे मदत पॅकेज मिळत आहे, त्यामुळे उध्दव ठाकरे यांना शेतकऱ्यांकडून प्रतिसाद मिळत नाही.काही ठिकाणी तर लोकांना पकडून त्यांच्या सभांमध्ये आणावे लागत आहे. राज्यात काही ठिकाणी पॅकेजचे पैसे पोहोचले नसतील, पण दररोज सुमारे ६०० कोटी रुपये आरबीआयच्या नियमानुसार शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केले जात आहेत. त्यामुळे हे संपूर्ण पॅकेज प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत दररोज पोहोचत आहे, असे फडणवीस म्हणाले.

## 'इक्षक' नौदलाच्या ताफ्यात

म्हणाले, मला विश्वास आहे की,तुम्ही 'इक्षक'च्या 'निर्भय, शूर, मार्ग प्रदीपदर्शक' या ब्रीदवाक्यानुसार खलाशांना निर्भय भावनेने, धैर्याने आणि चिकाटीने समुद्र ओलांडून सुरक्षितपणे मार्गदर्शन कराल. नौदलाच्या मते, 'इक्षक' या त्याच्या श्रेणीतील तिसऱ्या जहाजाचा समावेश, प्रगत, अत्याधुनिक प्लॅटफॉर्म तयार करण्याच्या नौदलाच्या दृढ वचनबद्धतेचे प्रतिबिंबित करतो.

## चौथी,सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचा अभ्यासक्रम जाहीर

■ पुणे,ता.६-

**पाचवी आणि आठवी इयत्तांसह चौथी आणि सातवी या इयत्तांसाठीही यंदा शिष्यवृत्ती परीक्षा घेण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला.चौथी आणि सातवीच्या परीक्षांसाठीचा अभ्यासक्रम राज्य परीक्षा परिषदेने जाहीर केला असून, या अभ्यासक्रमानुसार विद्यार्थ्यांना परीक्षेची तयारी करावी लागणार आहे.**

राज्यातील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मकतेकरिता प्रोत्साहन देण्यासाठी शिष्यवृत्ती परीक्षा आयोजित करण्यात येते. पूर्वी ही परीक्षा चौथी आणि सातवी या इयत्तांसाठी घेतली जात होती. मात्र, शिक्षण हक्क कायद्यातील तरतुदी लक्षात घेऊन २०१६-१७ पासून ही परीक्षा पाचवी आणि आठवी या वर्गासाठी लागू करण्यात आली. पाचवी आणि आठवीला शिष्यवृत्ती परीक्षा लागू केल्यापासून परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत घट झाल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे शिक्षण विभागाने पूर्वीप्रमाणेच चौथी आणि सातवीसाठी शिष्यवृत्ती परीक्षा लागू करण्याचा निर्णय घेतला.

## चोरी करताना नागरिकांनी चोपले

■ सांगली,ता.६(प्रतिनिधी)-

**नेहमी गजबजलेल्या राममंदिर चौकात एकजण महिलेच्या वेशात आला. अगदी तो बांगड्या, चुडीदार घालून आला होता. त्याने एकाची लॅपटॉप बॅग हातोहात लंपास केली. त्याची चोरी नागरिकांनी पाहिली अन् भर चौकात त्याला चोपला. महिलेच्या वेशात आल्याने लोक मारणार नाहीत, अशी धारणा त्याची असावी. पण, नागरिकांनी त्याची पोलखोल करत त्याला चोपला. दरम्यान, पोलिस आले मात्र फिर्यादीने दया दाखवली. यामुळे त्याच्यावर गुन्हा नोंद झाला नाही.**

राममंदिर चौकात ऑफिस सुटल्याने नागरिक मोठ्या संख्येने चौकात होते. अशाच एका नागरिकाजवळ लॅपटॉपची बॅग होती.या चोरट्याने ती बॅग हेरली. पण, तो चोरटा महिलेच्या वेशात आला होता. त्याने चुडीदार आणि बांगड्याही घातल्या होत्या. डोक्यावर ओढणी ओढल्याने तो ओळखून आला नाही. भिक मागण्याच्या बहाण्याने तो तिथे गेला. त्यावेळी त्याची नजर बॅगवर होती. त्याने हातोहात बॅग लंपास केली. त्यावेळी अनेकांनी त्याला पाहिले. त्याचा काही मीटर अंतरावर पाठलाग करून पकडले.विचारपूस करण्यास सुरुवात केली. तोवर नागरिकांना शंका आली. तो पुरुष असल्याचे समोर आले. नागरिकांना त्याला चोपला.

## गोवा परिवहनची पणजी ते आदमापूर बस सुरु

■ गारगोटी,ता.६ (प्रतिनिधी)-

**आदमापूर येथील बाळूमामांच्या भक्तांसाठी गोवा परिवहनने पणजी ते आदमापूर अशी बस सेवा सुरु केली आहे. ही बस पणजी येथून सुटून गारगोटी मार्गे आदमापूर येथे पोहोचेल.**

दिवसेंदिवस आदमापूर येथील संत बाळूमामांच्या भक्तगणात वाढ होत आहे. मराठवाडा, कर्नाटक राज्याबरोबरच कोकण व गोवा राज्यातून भक्त दर्शनासाठी येत आहेत. त्यामुळे गोवा परिवहनने पणजी -आदमापूर ही बससेवा सुरु केली आहे.

ही बस पणजी येथून दररोज दुपारी ४.२५ वाजता सुटेल. ही बस म्हापसा, पेडणे,बांदा, सावंतवाडी, आंबोली, आजरा, उत्तूर, गारगोटी, आदमापूर, निढोरी, कागल वरून कोल्हापूर येथे पोहोचणार आहे.कोल्हापूर येथून ही बस पहाटे ५.१५ वाजता सुटेल तर आदमापूर येथून पणजी साठी सकाळी ६.४५ वाजता सुटेल.

## मतदार यादीचा सुधारित कार्यक्रम जाहीर

(पान १ वरून)

कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे आदेशात म्हटले आहे. राज्य निवडणूक आयोगाने या प्रक्रियेदरम्यान तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास तत्काळ ई-मेल किंवा दूरध्वनीद्वारे संपर्क साधण्याच्या सूचना दिल्या आहेत. तांत्रिक कारणांसाठी आयोगातील समीर गंधपवार (संगणकीकरण कक्ष) यांच्याशी संपर्क साधण्यास सांगण्यात आले असून, संपर्क क्रमांक ०२२-२२८८६९५० / २२०२२९०९ तसेच ई-मेल sec.compu@mah.gov.in उपलब्ध करून देण्यात आला आहे.मतदार यादीचा संपूर्ण कार्यक्रम आणि अद्ययावत माहिती आयोगाच्या संकेतस्थळावर https://mahasec.maharashtra.gov.in येथे पाहता येईल.या आदेशाच्या प्रती राज्याचे मुख्य सचिव, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव, मुख्य निवडणूक अधिकारी आणि सर्व महानगरपालिका आयुक्तांना पाठविण्यात आल्या आहेत.

राज्य निवडणूक आयोगाने म्हटले आहे की, मतदार यादी सुधारित करणे हा निवडणूक प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाचा टप्पा असून, प्रत्येक मतदाराचा योग्य समावेश व्हावा आणि यादी पारदर्शक राहावी, हे आमचे प्राधान्य आहे.या सुधारित कार्यक्रमामुळे राज्यातील २९ महापालिकांमधील निवडणुकांची तयारी औपचारिकरित्या सुरू झाली आहे.नागरिकांना आपल्या नावाचा समावेश, वगळणे अथवा दुरुस्ती याबाबत वेळेत अर्ज करण्याचे आवाहन आयोगाने केले आहे.

## नव्या समांतर पुलावर अपघात

(पान १ वरून)

तो पुल वाहतुकीसाठी खुला करण्यात आला.दरम्यान, उद्घाटनानंतर तासाभरात या पुलावर एक वृद्ध चारचाकी घेऊन आले होते. त्यांना पदपथाशेजारी असणाऱ्या कट्ट्यांचा अंदाज आला नाही आणि अंधार असल्याने त्यांची चारचाकी त्याला जाऊन धडकली. त्यानंतर मोठी गर्दी झाली. या पुलावरून वाहतूक सुरू झाल्यानंतर अपघाताची शक्यता वर्तवण्यात येत होती. पहिला अपघात झाला परंतु भविष्यात अपघात टाळण्यासाठी उपाययोजना होणे अपेक्षित आहे.

## टीईटी अनिवार्य निर्णयाविरोधात उद्या शिक्षकांचा मूक मोर्चा

■ कोल्हापूर, ता. ६ (प्रतिनिधी)-

**सुप्रीम कोर्टाने टीईटी (शिक्षक पात्रता परीक्षा) अनिवार्य करण्याबाबत दिलेल्या निर्णयाविरोधात राज्यभरातील शिक्षक आक्रमक झाले असून, शिक्षकांच्या अस्तित्वाला धोका पोहोचवणारा निर्णय तात्काळ रद्द करण्याची मागणी शिक्षकांनी राज्य सरकारकडे केली आहे. या संदर्भात लवकरात लवकर सुप्रीम कोर्टात पुनर्विचार याचिका दाखल करावी, यासाठी शनिवारी ८ नोव्हेंबर रोजी कोल्हापुरात मूक मोर्चा काढण्यात येणार आहे.अशी माहिती शिक्षक संघटनांनी पत्रकार परिषदेत दिली.**

भरत रसाळे, दादासाहेब लाड, खंडेराव जगदाळे, सी. एम. गायकवाड, प्रसाद पाटील आदींनी संयुक्त पत्रकार परिषदेत मोर्चाचे वेळापत्रक व भूमिका स्पष्ट केली. राज्यातील ३० हून अधिक शिक्षक संघटना आणि ८ हजारांहून अधिक शिक्षक या मोर्चात सहभागी होणार आहेत.

राज्यातील टीईटी परीक्षेबाबत शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोईर यांनी १ ऑक्टोबर रोजी नागपूर येथे सर्व शिक्षक संघटनांची बैठक घेतली होती. या बैठकीत राज्य सरकार लवकरच पुनर्विचार याचिका दाखल करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली होती.

मात्र ग्वाही दिल्यानंतरही सरकारकडून कोणतीही हालचाल होत नाही. २५ ते ३० वर्षे सेवा दिलेल्या ज्येष्ठ शिक्षकांना परत टीईटी परीक्षा देण्यास भाग पाडणे म्हणजे उघड अन्याय आहे. टीईटी अनिवार्य निर्णयामुळे हजारो शिक्षक मानसिक तणावाखाली आहेत. मोर्चात कोणत्याही घोषणा दिल्या जाणार नाहीत. शिक्षक हातातील फलकाद्वारे प्रश्नांचे लक्ष वेधतील.पत्रकार परिषदेस बबन केकरे, मनोज माळवदकर, श्वेता खांडेकर, संतोष आयरे, राजेंद्र कोरे, सुनील पोवार, रणजीत सूर्यवंशी, मनोज रणदिवे, आर. डी. पाटील, मनोहर जाधव आदी उपस्थित होते.

## मुलीची छेड काढली चालकावर गुन्हा दाखल

(पान १ वरून)

दरम्यान आरोपीला आज इचलकरंजी न्यायालयात हजर केले असता एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.अधिक माहिती अशी,पीडित मुलगी ही रोज संशयित आरोपी घारगे यांच्या वाहनातून शाळेत जात होती.शाळेतून परत आल्यानंतर तो तिला घरापर्यंत सोडत होता. मात्र त्याने बुधवारी तिच्या सोबत लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले असून मुलीशी गैरवर्तन करणाऱ्या त्या वडाप रिक्षाचालक घारगे यास मुलीच्या वडीलांनी फोन करून जाब विचारला मात्र त्यांनाही त्याने धमकी देऊन शिवीगाळ केली, असे फिर्यादीत म्हटले आहे. याबाबतचा गुन्हा पोलीसात दाखल झाला असून अधिक तपास स. पो. नि. पिलाणी करत आहेत.

## पहिल्या टप्प्यात ६०.१८ टक्के मतदान

(पान १ वरून)

२५ वर्षांनंतर विक्रमी मतदान झाल्याची आतापर्यंतची आकडेवारी सांगते.पहिल्या टप्प्यातील मतदानानंतर १,३१४ उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएममध्ये बंद झाले आहे. यापैकी १०४ जागा थेट लढवल्या जातात, तर १७ जागा त्रिपक्षीय लढवल्या जातात. बिहारमधील २४३ जागांसाठी दोन टप्प्यात निवडणुका होत आहेत. १४ नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर होतील. पहिल्या टप्प्यात दोन उपमुख्यमंत्र्यांसह १८ मंत्र्यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. तेजस्वी यादव, तेज प्रताप यादव, सम्राट चौधरी, विजय कुमार सिन्हा आणि अनंत सिंग यांच्यासह १० जागा आहेत. ५६ अतिसंवेदनशील मतदान केंद्रांवर सायंकाळी ५ वाजेपर्यंत मतदान सुरू राहिले. बिहारमधील शहरी मतदारांमध्ये उत्साहाचा अभाव होता. १२१ पैकी तीन जागांवर सर्वात कमी मतदान झाले. राजधानी पाटणामधील शहरी भागात कुम्हरार येथे ३९.५२ टक्के, दिघा येथे ३९.१० टक्के आणि बांकीपूर येथे ४० टक्के मतदान झाले.राज्यातील विविध जिल्ह्यांमधून मिळालेल्या आकडेवारीनुसार, मतदारांनी लोकशाहीच्या या भव्य उत्सवात उत्साहाने सहभाग घेतला. मुजफ्फरपूर जिल्ह्यातील गायघाट विधानसभा मतदारसंघातील तीन बूथवर मतदारांनी बहिष्कार टाकला. बूथ क्रमांक १६१, १६२ आणि १७० वरील मतदारांनी ओव्हर ब्रिज आणि रस्ता बांधकामासाठी मतदान बहिष्कार टाकला. सुरक्षेच्या कारणास्तव सिमरी बख्तियारपूर, महिसी, तारापूर (मुंगेर जिल्हा) आणि जमालपूर येथे मतदानाची वेळ सायंकाळी ५ वाजेपर्यंत मर्यादित करण्यात आली. फतुहा विधानसभा मतदारसंघातील हाजीपूर गावातील बूथ क्रमांक २५४ वर तैनात असलेले पीठासीन अधिकारी आजारी पडल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. बिहार शरीफमध्ये मतदानादरम्यान पोलिसांनी चार भाजपा कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ते वॉर्ड १६ मधील २२६ ते २३२ क्रमांकाच्या बूथजवळ पत्रके वाटत होते.

**मधेपुरा – ६५.७४ टक्के, सहरसा – ६२.६५ टक्के, दरभंगा – ५८.३८ टक्के, मुझफ्फरपूर – ६५.२३ टक्के, गोपालगंज – ६४.९६ टक्के, सिवान – ५७.४१ टक्के, सारण – ६०.९० टक्के, वैशाली – ५९.४५ टक्के, समस्तीपूर – ६६.६५ टक्के, बेगुसराय – सर्वाधिक ६७.३२ टक्के , खगरिया – ६०.६५ टक्के, मुंगेर – ५४.९० टक्के, लखीसराय – ६२.७६ टक्के , शेखपुरा – सर्वात कमी ५२.३६ टक्के, नालंदा – ५७.५८ टक्के, पाटणा – ५५.०२ टक्के, भोजपूर – ५३.२४ टक्के आणि बक्सर – ५५.१० टक्के मतदान झाले.**

## 'लाचलुचपत'च्या जाळ्यात

(पान १ वरून)

तडजोडीअंती तक्रारदाराने सुरुवातीला १० हजार रुपये आणि काम झाल्यानंतर उर्वरीत रक्कम देण्याचे ठरले होते. तर लाच मागितल्याबद्दल तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोर्टलवर ३ नोव्हेंबर रोजी तक्रार नोंदवली होती. त्या अनुषंगाने कोल्हापूर लाचलुचपत विभागाच्या पथकाने दोन दिवसांपूर्वी तलाठी कार्यालयात शहानिशा केली होती. गुरुवारी स्टेशन रोडवरील गुरु चित्रमंदिर नजीकच्या चहा टपरीवर तक्रारदाराकडून १० हजारांची लाच घेताना तलाठी सोनवणे आणि कोतवाल पाटील या दोघांना पथकाने रंगेहाथ पकडले. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या उपअधिक्षक वैष्णवी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या या कारवाईत पोलीस निरीक्षक राजेंद्र सानप, सुधीर पाटील, कृष्णा पाटील, प्रकाश चौगुले सहभागी झाले होते.



फुलेवाडी पी.एन.पाटील गॅरेज परिसरात आपटेनगरकडे जाणाऱ्या जलवाहिनीवर असलेल्या एअर व्हॉल्ववरील सेफ्टीप्लेटला धक्का लागल्याने या परिसरात हजारो लिटर पाणी वाया गेले.

## नवी मुंबई विमानतळाच्या नावाचा घोळ कायम

■ रायगड,ता.६-

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी करणारी जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळून लावल्याने विमानतळाच्या नामकरणाचा वाद पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.**

प्रकाशज्योत सामाजिक संस्थेचे अध्यक्ष विकास पाटील यांनी दाखल केलेल्या या याचिकेत केंद्र सरकार व नागरी उड्डाण मंत्रालयाला विमानतळाच्या नामकरणाचा निर्णय तात्काळ घेण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली होती. न्यायालयाने आपल्या निर्णयात स्पष्ट केले की, कोणत्याही सार्वजनिक प्रकल्पाचे नामकरण किंवा नाव बदल हा निर्णय प्रशासकीय पातळीवर घेतला



### दि.बा.पाटील नामकरणाची याचिका फेटाळली

जातो.त्यामुळे या विषयात न्यायालय थेट हस्तक्षेप करू शकत नाही.मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अखड यांच्या खंडपीठाने ही याचिका फेटाळताना हे स्पष्ट केले.दरम्यान, राज्य सरकारने पूर्वीच नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्याचा प्रस्ताव केंद्राकडे पाठविला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या प्रस्तावावर सकारात्मक प्रतिसाद दिल्याची माहिती दिली होती. यापूर्वी माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही २०२२ मध्ये लोकनेते दि.बा.पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ असे नामकरण करण्यात येईल, असे जाहीर केले होते.मात्र, न्यायालयाने स्पष्ट केले की, नामकरणविषयीचा निर्णय घेण्याचा अधिकार केवळ शासन आणि नागरी उड्डाण मंत्रालयाकडे आहे. संबंधित कायद्यांच्या आधारे शासन निर्णय घेईल आणि याचिकाकर्ते त्या अधिकाराची पुरेशी कायदेशीर कारणमीमांसा सादर करण्यात अपयशी ठरले. परिणामी, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नामकरणाबाबतचा घोळ अद्याप कायम राहिला आहे.

## अजित पवार यांनी राजीनामा द्यावा-खडसे

■ जळगाव,ता.६-

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ पवार यांच्यावर जमीन गैरव्यवहाराचा आरोप असून त्यांनी कोरेगाव पार्कमधील १८०४ कोटी बाजारभाव असलेली जमीन केवळ ३०० कोटींना विकत घेतल्याचा आरोप ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी केला. यावरून विरोधकांनी अजित पवार यांच्यासह सरकारला घेरले असून अशातच शरद पवार गटाचे नेते आमदार एकनाथ खडसे यांनी प्रतिक्रिया देत या जमीन प्रकरणाची चौकशी होईपर्यंत अजित पवार यांनी मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी केली आहे.**

या व्यवहारात मोठ्या प्रमाणावर बनवाबनवी झाली आहे. ही जमीन महार वतनाची आहे आणि अशा जमिनीच्या खरेदीसाठी महसूल आयुक्तांची परवानगी आवश्यक असते. मात्र, या व्यवहारात अशी कोणतीही परवानगी घेतल्याचे दिसत नाही. त्यामुळे हा व्यवहार बेकायदा असल्याचे स्पष्ट होत असून तो तत्काळ रद्द केला पाहिजे, अशी मागणी खडसे यांनी केली.

या कंपनीचे भागभांडवल केवळ एक लाख रुपये आहे, मग ३०० कोटी रुपयांची जमीन खरेदी करण्यासाठी इतका मोठा निधी आला कुठून? कोणत्या खात्यातून पैसे दिले गेले आणि हे पैसे कोणाच्या खात्यात जमा झाले, हे तपासणे आवश्यक आहे. जी स्टॅम्प ड्युटी माफ केलेली आहे, ती करताना जी कागदपत्रे दिली आहेत.ती कागदपत्रेच बनावट आहेत. या ठिकाणी महसूल आयुक्तांची परवानगी घेतलेली दिसत नाही.

नाशिक,ता.६- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्या असतानाच वंचित बहुजन आघाडीला नाशिकमध्ये फटाका बसला आहे. जिल्हा अध्यक्षांच्या वागणुकीला कंटाळून २०० पदाधिकाऱ्यांनी राजीनामे दिले आहेत.

## ऑनलाईन फसवणूक; ३५ हजाराचा गंडा

■ सांगली,ता.६ (प्रतिनिधी)-

**ओल्ड कॉईन संदर्भात अनोळखी मोबाईल क्रमांकावरून आलेली लिंक उघडल्याने एका शेतकऱ्याच्या बँक खात्यातून ३५ हजार ८०० रुपये गायब झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी उदयसिंग बाळसिंग रजपूत (रा.कर्नाळ, ता. मिरज ) यांनी संजयनगर पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदविली आहे.**

घटनेची माहिती अशी, फिर्यादी राजपूत हे शेतकरी आहेत. त्यांना मोबाईलवर एका अनोळखी क्रमांकावरून ओल्ड कॉईन संदर्भात एक मेसेज आला. तसेच एक लिंक देखील आली. फिर्यादी राजपूत यांनी सदर लिंक उघडली असता त्यांच्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या खात्यावरील ३५ हजार रुपये गायब झाले. काही वेळाने ही बाब राजपूत यांच्या निदर्शनास आली.

आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच राजपूत यांनी तातडीने पोलीस ठाण्याशी संपर्क साधून फिर्याद नोंदविली. पोलिसांनी अज्ञात भामट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## रेल्वे ट्रॅकवरुन मार्ग काढणे जीवावर बेतले

मुंबई,ता.६-

मध्य रेल्वे मार्गावर आज सँन्डहर्स्ट रोड रेल्वे स्थानकाजवळ रेल्वे वाहतूक खोळंबल्यामुळे काही प्रवाशांनी रेल्वे ट्रॅकवरुन मार्ग काढण्याचा निर्धार केला. पण त्यांच्या जीवावर बेतले. भरधाव फास्ट लोकल ट्रेन आली आणि तीन ते चार प्रवाशांना या लोकल ट्रेनने धडक दिली.यात तिघांचा मृत्यू झाला.

### ॥ दुःखद निधन ॥




**श्री. जयकुमार शंकर रावळ**

आमच्या परिवारातील श्री. जयकुमार शंकर रावळ यांचे बुधवार दि. ०५/११/२०२५ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना !

**समस्त रावळ परिवार इचलकरंजी**

रक्षाविसर्जन : शुक्रवार,दि.०७/११/२०२५ रोजी सकाळी ८ वा. पंचगंगातिरी,इचलकरंजी.

### ॥ दुःखद निधन ॥



**श्रीमती गुणवंती शंकर स्वामी**

यांचे गुरुवार दि. ६/११/२०२५ रोजी वृध्दापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना!

**स्वामी परिवार इचलकरंजी**

माती सावडणे कार्यक्रम : शनिवार, दि.८/११/२०२५ रोजी सकाळी ९ वा. लिंगायत रुद्रभुमी येथे आहे.

# पावणेदोन लाखाचा गुटखा जप्त ; एकास अटक

इचलकरंजी,ता.६–

**स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा कोल्हापूर पथकाने इचलकरंजीतील इंदिरानगर येथे घरावर छापा टाकून १ लाख ७२ हजार रुपयांचा**



**सुगंधी तंबाखू, पान मसाला व गुटख्याचा अवैध साठा जप्त केला. या प्रकरणी वसीम युनूस तांबोळी (वय २९ रा. इंदिरानगर गल्ली नं. ३) याला अटक करण्यात आली असून त्याच्यावर गावभाग पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने पोलिस अधिक्षक योगेशकुमार गुप्ता यांनी अवैध धंद्यावर कारवाईच्या सुचना दिल्या आहेत. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक रविंद्र कळमकर यांनी पथके रवाना केली होती. पोलीस उपनिरीक्षक संतोष गळवे यांचे पथक माहिती घेत असताना पोलीस अंमलदार वैभव पाटील यांना गुटखा विक्रीसाठी बंदी असतानाही इचलकरंजीतील वसीम तांबोळी याने घरामध्ये पान मसाला व तंबाखुचा साठा करून त्याची विक्री करत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने त्याठिकाणी छापा टाकून वसीम तांबोळी याला ताब्यात घेऊन १ लाख ७१ हजार ७१० रूपये किंमतीचा वेगवेगळ्या कंपनीचा सुगंधी तंबाखू व सुपारी, पान मसाला व सुगंधी जर्दा असा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक रविंद्र कळमकर, पोलीस उप निरीक्षक संतोष गळवे, पोलीस अंमलदार वैभव पाटील, महेश पाटील, विशाल चौगले, संतोष बरगे, राजू कोरे व सागर चौगले यांचे पथकाने केली.

# उमेदवार शोधताना राष्ट्रवादी काँग्रेसची होणार कसरत

## आगामी निवडणुकीत कोणत्या पक्षाशी सलगी साधणार

इचलकरंजी,ता.६–

**महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील प्रमुख नेते बाहेर पडल्याने जिल्हाध्यक्षांना निवडणुकीमध्ये व्हीव रचना आखण्यासाठी आणि उमेदवार शोधण्यासाठी नेते मंडळींना तारेवरची कसरत करावी लागणार आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा स्थापनेपासूनच इचलकरंजी शहरामध्ये एक वेगळे अस्तित्व निर्माण केलेला पक्ष आहे. एकेकाळी या पक्षाने नगरपालिकेत २५ नगरसेवक निवडून आणण्याची किमया केली होती. मात्र, सुरुवातीपासूनच या पक्षाला फुटीचे ग्रहण लागले आणि वेळोवेळी या पक्षातून अनेक नेते बाहेर पडले. त्यामध्ये अनेक दिग्गज नेत्यांचा समावेश आहे. जिल्हाध्यक्ष पदाच्या निवडीवरून ज्यांनी पक्षांमध्ये एक वेगळे अस्तित्व निर्माण करताना कार्यकर्त्यांची मोट बांधली ते विठ्ठल चोपडे नुकतेच पक्षातून बाहेर पडले आणि त्यांनी भाजपचा रस्ता धरला. शहरातील एक अभ्यासू नगरसेवक म्हणून चोपडे यांची ख्याती आहे. पक्षाची व्हिव रचना करण्यामध्ये त्यांचे नाव आघाडीने घेतले जाते. तसेच कायद्यामध्ये हुशार असलेल्या या नेत्यांनी अचानक महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आपल्या राजकारणाचे काटे फिरवले आणि थेट कमळावर विराजमान झाले. त्यानंतर जिल्हाध्यक्ष पद युवा नेतृत्व असलेल्या सुहास जांभळे यांना देण्यात आले. स्वच्छ प्रतिमा असलेल्या सुहासला पक्ष वाढीसाठी मोठी कसरत करावी लागणार आहे. अशोकराव जांभळे आणि स्व. नितीन जांभळे यांच्या प्रमाणे सुहास ही राजकारणात आपले वेगळे अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. जांभळे घराण्याला मानणारा एक मोठा वर्ग शहरामध्ये आहे.तो वर्ग नेहमीच जांभळे कुटुंबियांच्या सोबत राहिला आहे. आता सुहास यांच्यासोबत हे कार्यकर्ते काम करीत आहेत. परंतु शहरामध्ये पक्ष वाढीसाठी त्यांना आता मोठी ताकद लावावी लागणार आहे. पक्षाची बांधणी करण्याबरोबरच राष्ट्रवादी काँग्रेसचे अस्तित्व दाखवण्यासाठी अनेक उमेदवार शहरांमध्ये उभे करून त्यांना निवडून आणण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहे. त्यासाठी भागाभागात उमेदवारांची चाचपणी करावी लागणार आहे .त्यांना बळ द्यावा लागणार आहे. तसेच भाजप सोबत आघाडी करण्यासाठी वाटाघाटीही कराव्या लागणार आहेत. त्यातून आपल्या पदरात जास्तीत जास्त जागा पाडून घेण्यासाठी चाणक्य नीती ही अवलंबावे लागणार आहे. तसेच जागा मिळाल्या तर त्या निवडून आणण्यासाठी प्रयत्नही करावा लागणार आहे.

पक्षाची बांधणी करण्याबरोबरच राष्ट्रवादी काँग्रेसचे अस्तित्व दाखवण्यासाठी अनेक उमेदवार शहरांमध्ये उभे करून त्यांना निवडून आणण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहे. त्यासाठी भागाभागात उमेदवारांची चाचपणी करावी लागणार आहे.त्यांना बळ द्यावा लागणार आहे. तसेच भाजप सोबत आघाडी करण्यासाठी वाटाघाटीही कराव्या लागणार आहेत. त्यातून आपल्या पदरात जास्तीत जास्त जागा पाडून घेण्यासाठी चाणक्य नीती ही अवलंबावे लागणार आहे.

**भाजपने आघाडी संदर्भातील आपले पत्ते अद्यापही खुले केलेले नाहीत. परिस्थितीनुसार आघाडी करण्याचा निर्णय त्यांनी जाहीर केला आहे. या पार्श्वभूमीवर सुहास जांभळे यांना भाजपसोबत आघाडी करताना आपल्या पारड्यात जास्तीत जास्त जागा कशा पाडून घेता येतील यासाठी प्रयत्न करावा लागणार आहे. जर भाजपसोबत जाणे शक्य झाले नाही तर महायुतीतील शिवसेना शिंदे गट त्याचबरोबर महाविकास आघाडी सोबत ही चर्चा करून आपल्या जागा निवडून आणण्यासाठी प्रयत्न करावा लागणार आहे, असे जाणकारातून बोलले जात आहे.**

# महानगरपालिकेच्या ड्रेनेज विभागाची गाडी ठरतेय चर्चेतील विषय

## श्रेयवादावरून उलट-सुलट चर्चेला ऊत

इचलकरंजी,ता.६–

**महानगरपालिका क्षेत्रात निवडणुकीची चाहूल लागल्याने राजकीय वातावरण तापू लागले आहे. पक्षीय समीकरणे जुळविण्याच्या हालचाली, संभाव्य उमेदवारांचे दौरे, कार्यकर्त्यांची बैठक, यामध्ये आता एक नवाच विषय केंद्रस्थानी आला आहे. तो म्हणजे महापालिकेच्या ड्रेनेज विभागात दाखल झालेली हाय कॅपॅसिटी सक्षन अँड जेटिंग मशीन विथ वॉटर**



**रिसायकलिंग गाडी.**

शहराच्या सांडपाणी व्यवस्थापनात सुधारणा घडवून आणण्यासाठी ही गाडी आणण्यात आली असून ती अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज आहे. या यंत्राद्वारे ड्रेनेज लाइनमधील ब्लॉकेज, सांडपाणी वाहिनीतील अडथळे, तसेच साठलेली घाण स्वच्छ करण्याचे काम मोठ्या वेगाने आणि प्रभावीपणे करता येते. या गाडीच्या वॉटर रिसायकलिंग यंत्रणेमुळे वापरलेले पाणी पुन्हा प्रक्रिया करून त्याच कामासाठी वापरता येते, ही या गाडीची सर्वात महत्त्वाची बाब आहे. महानगरपालिका प्रशासनाच्या दृष्टीने ही एक महत्त्वाची सुविधा असली, ही गाडी शहरात दाखल होताच राजकीय वर्तुळात खळबळ माजली आहे. विविध राजकीय पक्षांचे इच्छुक उमेदवार या गाडीच्या उद्घाटन, प्रात्यक्षिक आणि सफाई मोहिमांच्या फोटो व व्हिडिओ सोशल मीडियावर टाकत आपली छाप पाडण्याचा प्रयत्न करत आहेत. काहींनी तर 'ही गाडी माझ्या पाठपुराव्यामुळे आली' असा दावा करत नागरिकांमध्ये स्वतःचे योगदान दाखविण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

शहरातील नागरिक या घडामोडीवर उलट-सुलट चर्चा करत आहेत. अनेकांनी सोशल मीडियावर प्रतिक्रिया देताना, 'आता या गाडीला पोस्टरपेक्षा जास्त उमेदवार मिळालेत!' काहीजण तर चेष्टेने म्हणतात की, 'या निवडणुकीत ड्रेनेज गाडीच खरी स्टार उमेदवार ठरणार दिसते.'

स्वच्छतेच्या उद्देशाने आलेली ही हाय कॅपॅसिटी सक्षन अँड जेटिंग मशीन गाडी आता शहरातील राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू ठरली आहे. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही गाडी केवळ ड्रेनेज साफ करणारी नव्हे, तर राजकीय समीकरणांना हलवणारी 'हाय कॅपॅसिटी' चर्चा गाडी ठरत आहे.

राजकीय वर्तुळात सध्या महापालिकेची गाडी की उमेदवारांची प्रचार गाडी? यावरून अनेक ठिकाणी उलट-सुलट चर्चा सुरू आहेत. या गाडीच्या शेजारी फोटो काढल्याशिवाय आता निवडणुकीचा अर्ज अपूर्ण वाटेल, असे बोलले जात आहे.

# अंबप येथे विषबाधेने वीस मेंढ्यांचा मृत्यू

## मेंढपाळाचे चार लाखांचे नुकसान

टोप,ता.६ (प्रतिनिधी)–

**अंबप (ता . हातकणंगले) येथे मेंढ्यांना विषबाधेने तब्बल वीस मेंढ्यांचा मृत्यू झाला असून परिसरात एकच खळबळ उडाली आहे. ही घटना गुरूवारी सकाळी उघडकीस आली.**

अंबप गावच्या पश्चिमेस इंडस्ट्रियल पार्कच्या माळावर अंबप येथील मेंढपाळ सतीश सर्जेराव हिरवे यांच्या मेंढ्या गेल्या दोन दिवसापासून चरत होत्या. बुधवारी दिवसभर या परिसरात चरल्यानंतर सायंकाळी शेतकरी अशोक नाना माने यांच्या शेतात बसवण्यासाठी होत्या. गुरुवारी सकाळी पासून मेंढ्यांचे पोट फुगू लागल्यामुळे सतीश हिरवे यांनी गावातील स्थानिक डॉक्टर यांना बोलवले व उपचार सुरू केले पण काही वेळेतच ५ मेंढ्याचा मृत्यू झाला.सकाळी ११ नंतर याची माहिती मिळताच स्थानिकांनी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना कळवले, परंतु तोपर्यंत अनेक मेंढ्या दगावल्या होत्या. पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी बाकीच्या मेंढ्यांना तात्काळ उपचार करत चाळीसवर मेंढ्या वाचवल्या. दुपारी सरपंच दिप्ती माने, उपसरपंच असिफ मुल्ला, पोलीस पाटील पंढरीनाथ गायकवाड, ग्रा पं सदस्य सारिका हिरवे, अजित माने,तलाठी उमेश माळी यांनी या घटनेची माहिती घेतली.

# मध्यवर्ती बसस्थानकात महिलेचे मंगळसुत्र लंपास

इचलकरंजी,ता.६–

**येथील मध्यवर्ती बसस्थानकात गर्दीचा फायदा घेत चोरट्याने एका महिलेच्या गळयातील अर्धा तोळयाचे सोन्याचे मंगळसुत्र हिसडा मारून लंपास केले. या प्रकरणी सुनंदा कुमार चौगुले (वय ४५, रा. अब्दुललाट ता. शिरोळ) यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात वर्दी दिली आहे.**

नांद्रे (जि. सांगली) येथील नातेवाईकांकडे जाण्यासाठी सुनंदा चौगुले या दुपारी येथील मध्यवर्ती बसस्थानकात आल्या होत्या. त्या सांगलीच्या बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेत चोरट्याने त्यांच्या गळ्यातील अर्धा तोळ्याचे सोन्याचे मंगळसुत्र चोरुन नेले.

# रिक्षा चालकावर कारवाई

मिरज,ता.६(प्रतिनिधी)

**मिरजेत रस्त्यावर रिक्षा उभी करून वाहतुकीस अडथळा केल्या प्रकरणी एका रिक्षा चालकावर पोलिसांनी कारवाई केली. मिरज शहर पोलिसात सदर रिक्षा चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एस. के. मोबाईल शॉपी समोर पोलिसांनी ही कारवाई केली. जावेद नूरमोहम्मद कोसापुरे (रा. शंभर फुटी रोड, मिरज) या रिक्षाचालकावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.**

याबाबत पोलिसात नोंद झाली आहे की, संबंधित रिक्षा चालकाने त्याच्या ताब्यातील (एमएच -१० -के ३४८७) या क्रमांकाची रिक्षा मिरजेतील किसान चौक ते जवाहर चौक जाणाऱ्या रस्त्यावर एस. के. मोबाईल शॉपी समोर वाहतुकीस अडथळा होईल व लोकांच्या जीवितास धोका होईल अशा स्थितीत उभा केली. यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील कारवाई करीत आहेत.

# वृध्दाला धक्काबुक्की: दोघांवर गुन्हा

मिरज ,ता.६(प्रतिनिधी)

**मिरज तालुक्यातील बेडग येथे रस्त्याच्या कामावेळी दोघांनी एका वृद्ध व्यक्तीस धक्का देऊन दुखापत केल्याची घटना घडली आहे.**

याबाबत पोलिसात फिर्याद देण्यात आली असून मिरज ग्रामीण पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. बेडग-मालगाव रोडवर ही घटना घडली आहे. याबाबत जखमी सुरेश ज्ञानू शिंदे (वय ७४) यांनी पोलिसात फिर्याद दिली आहे.मिरज ग्रामीण पोलिसांनी विलास विठोबा पाटील, संतोष विलास पाटील (दोघे राहणार बेडग) या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# प्रभाग क्र.२ मध्ये 'माझा प्रभाग, माझी जबाबदारी' उपक्रमाचा शुभारंभ

## परवेझ गैबान यांचा स्तुत्य उपक्रम

इचलकरंजी,ता.६ –

**सन २०१६ साली बिनविरोध निवडून आलेले नगरसेवक व माजी बांधकाम सभापती लतीफ मिरासाहेब गैबान यांनी नगरपरिषदेतील काळात खाजगी स्वरूपातील स्वच्छता टेंडर मंजूर करून घेतले होते. या दूरदृष्टीपूर्ण निर्णयामुळे हा प्रभाग अनेक वर्षे स्वच्छ, सुबक आणि आदर्श राहिला.**

मात्र, २०२१ साली नगरपरिषदेचा कार्यकाल संपल्यानंतर प्रशासनाने कारभार हाती घेतला आणि २०२२ मध्ये नगरपरिषद महापालिकेत रूपांतरित झाली. या प्रक्रियेत प्रभागांची नव्याने रचना होऊन पूर्वीचा प्रभाग ४ आता प्रभाग २ मध्ये समाविष्ट झाला. प्रभागाचे क्षेत्रफळ दुप्पट झाल्याने मनुष्यबळाची कमतरता निर्माण झाली आणि काही भागांत स्वच्छतेच्या अडचणी निर्माण झाल्या.

महापालिका आपल्या परीने प्रामाणिक प्रयत्न करत असली, तरी सोयी सुविधांचा अभाव जाणवत होता. या पार्श्वभूमीवर प्रभागातील नागरिकांना स्वच्छतेच्या समस्यांपासून दिलासा देण्यासाठी परवेज लतीफ गैबान यांनी पुढाकार घेत ''माझा प्रभाग, माझी जबाबदारी'' हा उपक्रम सुरू केला आहे.

स्वतःच्या वैयक्तिक खर्चातून त्यांनी ६ सदस्यांची स्वतंत्र स्वच्छता टीम नेमली असून, ही टीम महापालिकेच्या समन्वयाने प्रभागातील स्वच्छता राखण्यासाठी सातत्याने कार्यरत राहील.

या उपक्रमाचा शुभारंभ राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव परवेझ गैबान यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला.यावेळी भागातील महिला, युवक व जेष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



माझा प्रभाग,माझी जबाबदारी' उपक्रमाचा शुभारंभ करताना परवेझ गैबान व भागातील नागरिक.

# मिरजेत पाव किलो गांजा जप्त

मिरज, ता.६ प्रतिनिधी–

**शहर पोलिसांनी दोन संशयितांना अटक करून त्यांच्याकडून एकूण पाव किलो गांजा जप्त केला आहे.**

याप्रकरणी इशरत इरफान बारगीर (वय २९) आणि जैद इर्शाद रोहिले (वय २६, रा. रेवणी गल्ली, मिरज) यांना पोलिसांनी अटक केली. बारगीर व रोहिले प्लास्टिकच्या पिशवीत गांजा बाळगून असल्याच्या माहितीचा आधारे पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून प्लॅस्टिक पिशव्यातून एक मोठी पुडी व २२ छोट्या पुड्या असा सहा हजाराचा पाव किलो गांजा जप्त करण्यात आला. तसेच दोघांकडून २२ हजार रुपये किमतीचे दोन मोबाईल असा एकूण २८ हजार रुपयांचा ऐवज हस्तगत करण्यात आला. या प्रकरणी शहर पोलिस ठाण्यात अंमली पदार्थ संबंधित कायद्यांनुसार गुन्हा दाखल केला आहे.

## चुकीची दुरूस्ती

दि ६/११/२५ रोजी पान ३ वर प्रसिध्द झालेल्या सलोनी तोष्णीवाल व वंशिता भराडिया यांच्या अभिनंदन जाहिरातीमध्ये **निलाइचंद** ऐवजी **निहालचंद** असे वाचावे

## CHANGE OF NAME

MY OLD NAME ABHINANDAN BHAUSO GAT AT HUPARI HERE BY SOLEMNLY DECIARE MY NEW NAME **ABHINANDAN BHAUSAHEB GAT** TELIPHONE OFFICE NEAR HUPARI PIN-416203 TAL-HATKAN ANGLE DIST KOLHAPUR DATE-06/11/2025



■ **संपादकीय** ■

# ममदानींच्या विजयाचे मोल

आपल्या जाचक आणि विचित्र टॅरिफ पॉलिसीच्या निमित्ताने जगातील छोट्या मोठ्या देशांना सतत धक्का देणारे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना त्यांच्याच देशातील न्यूयॉर्क महानगरीतील मतदारांनी जोरदार धक्का दिला आहे. न्यूयॉर्कच्या महापौरपदी ट्रम्प यांनी जोरदार विरोध केलेले झोहरान ममदानी यांचा मोठा विजय झाल्यामुळे ट्रम्प यांचा राजनैतिक पराभव झाला आहेच, शिवाय त्यांना आणि त्यांच्या रिपब्लिकन पक्षालाही जोरदार धक्का बसला आहे. खरे तर कोणत्याही मोठ्या देशातील एखाद्या मोठ्या शहराचा महापौर होणे किंवा त्या पदाची निवडणूक होणे ही राष्ट्रीय राजकारणात फारशी महत्त्वाची गोष्ट नसते. पण अमेरिकेत महानगरांचे महापौर हेसुद्धा मोठे सत्ताकेंद्र असल्याने त्यातही न्यूयॉर्कसारख्या सर्वात मोठ्या शहराचा महापौर होणे ही अभिमानाची बाब असल्याने महापौरपदाची निवडणूक अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीसुद्धा प्रतिष्ठेची केली होती. या निवडणुकीमध्ये ममदानी यांना डेमोक्रॅटिक पक्षातर्फे उमेदवारी देण्यात आली होती, तर ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षातर्फे स्लीवा हे उमेदवार होते. निवडणुकीमध्ये तिसरे उमेदवार न्यूयॉर्कचे माजी गव्हर्नर कुओमो हे होते. या निवडणुकीमध्ये ट्रम्प यांच्या उमेदवाराचा पराभव तर झालाच शिवाय त्यांना तिसऱ्या स्थानावर जावे लागले. कारण या निवडणुकीमध्ये दुसऱ्या क्रमांकाची मते अन्य उमेदवाराला मिळाली. या निवडणुकीमध्ये डेमोक्रॅटिक उमेदवार ममदानी जर निवडून आले तर न्यूयॉर्कला विकासासाठी निधी मिळणार नाही अशा प्रकारची धमकी देण्यापर्यंतही ट्रम्प यांची मजल गेली होती. अर्थात, या धमकीला न्यूयॉर्कमधील मतदारांनी भीक घातली नाही आणि त्यांनी मोठ्या मताधिक्याने ममदानी यांना महापौर पदावर बसवले. फक्त ३४ वर्षांचे असलेले ममदानी यांनी ही निवडणूक जिंकून अनेक विक्रम तर नोंदवलेच शिवाय न्यूयॉर्कचे प्रथम मुस्लीम महापौर होण्याचा मानही मिळवला. त्यांच्या आई मीरा नायर या प्रख्यात भारतीय निर्माता दिग्दर्शक आहेत. महापौरपदाची निवडणूक जिंकल्यानंतर ममदानी यांनी थेटपणे ट्रम्प यांना आव्हान दिलेच शिवाय भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या एका गाजलेल्या विधानाचाही उल्लेख केला. सुडाचे राजकारण करण्यामध्ये प्रख्यात असलेले डोनाल्ड ट्रम्प आगामी कालावधीमध्ये याबाबत कोणती पावले उचलतात हे पाहणे जरी महत्त्वाचे असले तरी न्यूयॉर्कच्या महापौरपदाच्या निवडणुकीच्या निमित्ताने ट्रम्प यांना निवडणुकीमध्ये कशाप्रकारे पराभूत करता येऊ शकेल याचा दाखला मात्र मतदारांनी निश्चितच घालून दिला आहे. ज्या प्रकारे ट्रम्प यांनी अमेरिका फर्स्ट आणि मेक अमेरिका ग्रेट अगेन या मंत्रांचा जप करत अमेरिकेची मूलभूत व्यवस्थाच विस्कळीत केली आहे, त्यावरून अमेरिकेत सार्वत्रिक पातळीवर नाराजी आहे. ट्रम्प यांनी जारी केलेले टॅरिफ धोरण असो किंवा इमिग्रेशनचे नियम असोत याबाबत सर्वसामान्य नागरिकही समाधानी नाहीत. ममदानी यांची भूमिका याबाबत अत्यंत स्पष्ट आहे. अमेरिकेत कोणत्याही प्रकारचे धार्मिक द्वेषाचे किंवा वांशिक भेदाचे राजकारण करण्यास त्यांचा विरोध आहे आणि त्यांनी अनेक वेळा आपली ही पॉलिसी जाहीर केली होती. म्हणूनच ट्रम्प यांनी त्यांच्या उमेदवारीला विरोध केला होता. पण ज्या प्रकारे ममदानी यांनी अत्यंत वेगळ्या प्रकारचा प्रचार करून घरोघरी जाऊन आपली भूमिका स्पष्ट केली त्याचा चांगलाच परिणाम मतदारांवर झाला. न्यूयॉर्कमध्ये ३० लाखांपेक्षा जास्त मतदारांपर्यंत प्रत्यक्षपणे पोहोचून ममदानी यांनी आपले मत आणि भूमिका व्यक्त केली होती. ममदानी यांचे तरुण वय त्यांच्या बोलण्यातील प्रामाणिकपणा, त्यांची पटणारी मते याचा एकत्रित परिणाम होऊनच न्यूयॉर्कमधील मतदारांनी त्यांच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्णय घेतला. या महापौरपदाच्या निवडणुकीसोबतच अमेरिकेतील न्यू जर्सी आणि व्हर्जिनिया या स्टेटच्या गव्हर्नरपदाची निवडणूकही होणार होती. या निवडणुकीमध्येही ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाच्या उमेदवारांना पराभव स्वीकारावा लागला आहे. वर्षापूर्वी दुसऱ्यांदा अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष पदावर विराजमान झालेल्या डोनाल्ड ट्रम्प यांच्यासाठी हा मोठा धक्का मानावा लागेल. 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' या अट्टाहासापायी आपण जे काही करत आहोत ते अमेरिकेतील सर्वसामान्य जनतेला आवडत नाही याची जाणीव आता ट्रम्प यांना व्हायला हरकत नाही. अर्थात, ट्रम्प यांची एकूणच मानसिकता आणि इतर राजकारण पाहता अशा प्रकारच्या काही एखाद्या पराभवामुळे त्यांच्या धोरणामध्ये कोणता मोठा बदल होईल अशी आशा करणे चुकीचे ठरेल. आपण करतोय तेच बरोबर आहे यावर ठाम विश्वास असणारे ट्रम्प यापुढेही पूर्वीच्या चुकीच्या पद्धतीने वागत राहणार आहेत यात शंका नाही. पण स्वतःला अपराजित आणि सर्व शक्तीमान मानणाऱ्या ट्रम्प यांना पराभवाची चव चाखायला लावण्याची शक्ती अमेरिकेतील मतदारांच्या हातात आणि मनात आहे हे सिद्ध झाले आहे. अमेरिकेतील राजनैतिक तज्ज्ञांच्या मते,आगामी निवडणुकीमध्ये ट्रम्प यांना किंवा त्यांच्या पॉलिसीचे समर्थन करणाऱ्या नेत्यांना पराभूत कसे करायचे याचा दाखला न्यूयॉर्कच्या महापौरपदाच्या निवडणुकीच्या निमित्ताने मतदारांनी दिला आहे.

# बांगला देशचे कुटिल डाव

**बांगलादेशचे हंगामी प्रमुख मुहम्मद युनूस यांनी अलीकडेच केलेली एक कृती भारताच्या दृष्टीने अत्यंत आक्षेपार्ह आणि चिथावणी देणारी आहे. पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल साहिर शमशाद मिर्झा यांना युनूस यांनी 'आर्ट ऑफ ट्रायम्फ' नावाचे एक कलाकृती चित्र भेट दिले असून त्यात भारताच्या ईशान्येकडील राज्यांचा समावेश 'विस्तारित बांगलादेश'च्या नकाशात दाखवण्यात आला आहे. ही कृती भारताच्या सार्वभौमत्वाला थेट आव्हान देणारी आणि भारताच्या भूमीवर दावा करणारी आहे.**

या कलाकृतीतून युनूस यांनी भारतविरोधी भूमिका अधिक स्पष्ट केली असून यामुळे विभागीय सुरक्षेविषयी गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. विशेषतः सिलिगुडी कॉरिडॉरच्या संदर्भातील चिंता पुन्हा एकदा निर्माण झाली आहे. मुहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखाली बांगलादेशात मुस्लिम कट्टरतावाद्यांचे बळ वाढले असून हिंदू अल्पसंख्याकांवर अत्याचाराचे प्रमाण वाढले आहे. युनूस प्रशासनाचे भारताबद्दलचे धोरणही अधिकाधिक शत्रुत्वपूर्ण होत आहे. पाकिस्तानशी पुन्हा संबंध प्रस्थापित करून बांगलादेश 'भारतविरोधी आघाडी' तयार करण्याच्या प्रयत्नात असल्याचे संकेत दिसतात. पाकिस्तानच्या सर्वात वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्याला असा वादग्रस्त नकाशा भेट देणे हे या प्रवाहाचेच प्रतीक मानले जात आहे.मार्च २०२५ मध्ये चीन दौऱ्यादरम्यान युनूस यांनी केलेले वक्तव्यही भारताच्या ईशान्येकडील राज्यांविषयी त्यांच्या याच मनोवृत्तीचे द्योतक होते. त्यांनी त्या वेळी म्हटले होते की, ईशान्य भारत हा लँडलॉकड् प्रदेश आहे आणि या संपूर्ण प्रदेशाचा समुद्राशी संपर्क येण्यासाठी बांगलादेश हे एकमेव माध्यम आहे. या वक्तव्यावर भारतात तीव्र प्रतिक्रिया उमटली होती.

आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्व सरमा यांनी याला अपमानजनक आणि निषेधार्ह म्हटले होते. तसेच युनूस यांच्या या वक्तव्याने भारताच्या चिकन नेक कॉरिडॉरवरील असुरक्षिततेचे कथानक पुन्हा पुढे आले आहे, असा सूचक इशाराही त्यांनी त्यावेळी दिला होता. युनूस यांच्या विधानांनंतर भारताने ईशान्य राज्यांकडे जाणाऱ्या बांगलादेशी वस्तूंवर काही निर्बंध लादले. कारण बांगलादेश गरज पडल्यास ईशान्य भारताच्या प्रगतीला अडथळा आणू शकतो, असे युनुस यांनी म्हटले होते. सिलिगुडी कॉरिडॉरला 'चिकन नेक' म्हणून ओळखले जाते. हा भारतासाठी धोरणात्मक दृष्ट्या सर्वाधिक संवेदनशील पट्टा आहे.



केवळ २२ किलोमीटर रुंद असलेला हा भूभाग भारताच्या ईशान्य राज्यांना उर्वरित देशाशी जोडतो. नेपाळ, भूतान आणि बांगलादेश यांच्या सीमांमध्ये अडकलेला हा भाग भारताच्या लष्करी आणि व्यापारी हालचालींसाठी अत्यावश्यक आहे. कोणत्याही संभाव्य संकटात या भूभागावर हल्ला झाला, तर ईशान्य भारत पूर्णपणे मुख्य भूमीपासून तुटण्याचा धोका निर्माण होतो.

बांगलादेशात गेल्या काही महिन्यांत कट्टरतावादी गट आणि पाकिस्तानसमर्थक जमात-ए-इस्लामी पुन्हा सक्रिय झाले आहेत. गेल्या दशकात शेख हसीना यांच्या काळात भारतविरोधी बंडखोर गटांना बांगलादेशातून हाकलण्यात आले होते, पण युनूस सत्तेत आल्यानंतर पुन्हा त्यांना आश्रय दिला जात असल्याची माहिती पुढे येत आहे. ऑगस्ट २०२४ मधील बांगलादेशातील राजकीय उलथापालथीनंतर ईशान्य भारतातील राज्यांत चिंता वाढली आहे. नागालँडचे मुख्यमंत्री नेफ्यू रियो यांनी त्यावेळी म्हटले होते की, बांगला देशातील बदलत्या राजकीय परिस्थितीमुळे ईशान्य भारताला सर्वाधिक धोका निर्माण झाला आहे. विशेषतः आसाम आणि त्रिपुरामध्ये घुसखोरीचा धोका वाढला आहे.युनूस यांनी पाकिस्तानच्या जनरल मिर्झा यांना भेट दिलेल्या कलाकृतीच्या घटनेत आणखी एक स्तर आहे, तो म्हणजे पाकिस्तानी लष्कर अलीकडील काळात पुन्हा बांगलादेशाशी संबंध दृढ करण्याच्या प्रयत्नात आहे. अफगाणिस्तानात तालिबानी शक्तींशी झालेल्या लढायात अपयश आल्यानंतर पाकिस्तान आता पूर्वेकडील नवा सुरक्षा भागीदार शोधत आहे.

**दैनंदिनी**

इस्लामाबाद आणि ढाका यांच्यात लष्करी आणि व्यापारिक संबंध पुनरुज्जीवित करण्यासाठी मिर्झा सध्या ढाक्यात आहेत. आयएसआय बांगलादेशात पुन्हा आपले जाळे विणत आहे. जानेवारी २०२५ मध्ये आयएसआयचे वरिष्ठ अधिकारी ढाक्यात आले होते आणि कॉक्सबाजार, टेक्नाफ, मौलवीबाजार, हबीगंज आणि शेरपूर येथे आपला प्रभाव वाढवण्याच्या हालचाली त्यांनी सुरू केल्या आहेत. १९७१ पूर्वी याच भागात पाकिस्तानी सैन्याची उपस्थिती होती, हे विशेषत्वाने लक्षात घ्यायला हवे. चीनच्या सीमेजवळील तणावाने या परिस्थितीला नवे परिमाण दिले आहे. चीन बांगलादेशातील लालमोनिरहाट विमानतळाचा विकास करत आहे. हे ठिकाण सिलिगुडी कॉरिडॉरच्या अत्यंत जवळ आहे. वरकरणी हा नागरी विमानतळ प्रकल्प असला तरी त्याचे लष्करी वापरासाठी 'दुहेरी उपयोग' होऊ शकतो. भारत नेहमीच चीनच्या 'घेराव नीती'कडे लक्ष ठेवून आहे.

चीन-पाकिस्तान आर्थिक महामार्ग (सीपेक), श्रीलंका व नेपाळमधील चीनी गुंतवणुकी आणि आता बांगलादेशशी वाढलेली जवळीक या सर्व गोष्टी एकत्र पाहिल्यास भारताभोवती एक धोरणात्मक वेढा निर्माण होत असल्याचे दिसते. बांगला देशने एक गोष्ट कदापि विसरता कामा नये की, या देशाचा जन्मच भारताच्या प्रयत्नातून झालेला आहे. त्यामुळे चीन किंवा पाकिस्तानच्या खांद्यावर हात ठेवून भारताशी पंगा घेण्याची खुमखुमी युनुस यांनी सोडायला हवी.

# 'वंदे मातरम्' गीताला संविधानिक दर्जा मिळायला हवा



**'इन्किलाब झिंदाबाद' पासून 'भारत माता की जय' पर्यंत, हे असे काही शब्द आहेत जे आपल्याला आपल्या स्वातंत्र्याची आणि त्यासाठी बलिदान देणाऱ्या शूर सुपुत्रांची आठवण करून देतात. देशाला मुक्त करण्यात केवळ शूर सैनिकांच्या देशभक्तीनेच नव्हे तर त्यांच्या घोषणा, कविता आणि गाण्यांनीही महत्त्वाची भूमिका बजावली. यापैकी एक म्हणजे बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी लिहिलेली प्रसिद्ध कविता 'वंदे मातरम्', जी नंतर राष्ट्रगीत बनली. वंदे मातरम् या गाण्याला १५० वर्षे पूर्ण झाली आहेत.**

इंग्रजांच्या दडपशाही विरुद्ध भारतीयांना प्रेरणादेण्यासाठी बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी १८७६ मध्ये वंदे मातरम् ही कविता रचली. ही देशभक्तीपर कविता प्रथम त्यांच्या लोकप्रिय कादंबरी आनंद मठमध्ये प्रकाशित झाली. त्यांचे काम त्या वेळी स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या भारताच्या शूर सुपुत्रांसाठी प्रेरणास्त्रोत म्हणून काम करत होते. हे गीत स्वातंत्र्यसैनिकांसाठी प्रेरणास्थान बनले आणि ब्रिटिश सरकारने त्यावर बंदी घालण्याचा प्रयत्न केला, परंतु त्याची लोकप्रियता वाढतच गेली. रवींद्रनाथ टागोर यांनी प्रथम १८९६ मध्ये ते गायले आणि नंतर ते भारताचे राष्ट्रीय गीत म्हणून स्वीकारले गेले. २४ जानेवारी १९५० रोजी संविधान सभेने वंदे मातरम् हे भारताचे राष्ट्रगीत म्हणून स्वीकारले. मात्र अजूनपर्यंत या गीताला संविधानिक दर्जा मिळाला नाही.

या गीताला राष्ट्रगीताइतकाच सन्मान मिळावा यासाठी अनेक याचिका दाखल झाल्या असून, सरकारने जन गण मन आणि वंदे मातरम् यांना समान आदर दाखवण्यावर भर दिला आहे, तरीही त्याला संवैधानिक दर्जा मिळालेला नाही. विशेष म्हणजे वंदे मातरम् हे भारताचे राष्ट्रगीत नाही, तर ते भारताचे राष्ट्रीय गीत आहे. भारताचे राष्ट्रगीत जन गण मन आहे, जे रवींद्रनाथ टागोर यांनी लिहिले आहे. वंदे मातरम या गीताची रचना बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी केली होती आणि ते स्वातंत्र्यलढ्याच्या काळात प्रेरणास्थान होते.

२४ ओळींच्या कवितेतील पहिला श्लोक मातृभूमीच्या नैसर्गिक वैभवाचे, सौंदर्याचे आणि समृद्धीचे गुणगान करतो. दुसऱ्या श्लोकात, कवी मातृभूमीला एका शक्तीशाली आईच्या रूपात चित्रित करतो जी तिच्या सात कोटी मुलांच्या सामुहिक शक्तीने तिच्या शत्रूंवर विजय मिळवते. तिसरा आणि चौथा श्लोक अनुक्रमे दुर्गा, लक्ष्मी आणि सरस्वती यांच्याशी मातृदेवतेची तुलना करतो-शक्ती, संपत्ती आणि ज्ञानाचे प्रतीक. अशाप्रकारे, बंकिमचंद्रांनी भारतमातेचे केवळ एक भूमी म्हणून नव्हे तर नैतिक आणि आध्यात्मिक शक्ती म्हणून देखील चित्रण केले आहे.

१८९६मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या कलकत्ता अधिवेशनात रवींद्रनाथ टागोर यांनी प्रथम वंदे मातरम् गायले. या सत्राचे अध्यक्ष रहिमतुल्ला मोहम्मद सयानी होते, एक मुस्लिम नेते. या गाण्याचा प्रतिध्वनी दक्षिणेपर्यंत पोहोचला-तमिळ कवी सुब्रमण्यम भारती यांनी ते तमिळमध्ये गायले आणि पंतलूने ते तेलुगुमध्ये रूपांतरित केले. परंतु दुर्दैवाने, कालांतराने, राजकारणाने हे गाणे तुष्टीकरणाच्या सुरात रूपांतरित केले. काँग्रेसच्या काकीनाडा अधिवेशनात, जेव्हा प्रसिद्ध संगीतकार पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर यांनी वंदे मातरम् गायला सुरुवात केली, तेव्हा अध्यक्ष मौलाना मोहम्मद जौहर अली यांनी आक्षेप घेतला. १९०६ मध्ये मुस्लिम लीगची स्थापना झाल्यानंतर, या विरोधाने संघटित स्वरूप धारण केले आणि असा युक्तिवाद केला की हे गाणे एकेश्वरवादाच्या तत्त्वाच्या विरुद्ध आहे.

मौलाना आझाद यांनी एक मध्यम मार्ग सुचवला:'गाण्याचे पहिले दोन श्लोक पूर्णपणे सांस्कृतिक आणि भौतिक वर्णन आहेत; ते राष्ट्रीय गीत म्हणून स्वीकारले जाऊ शकतात.' १९३७ मध्ये, काँग्रेसने अधिकृतपणे निर्णय घेतला की फक्त पहिले दोन श्लोक राष्ट्रीय गीत म्हणून स्वीकारले जातील.

**संविधान सभेत 'वंदे मातरम्' वर चर्चा**

संविधान सभेतील अनेक सदस्यांना 'वंदे मातरम्' हे राष्ट्रगीत हवे होते. तथापि, वाद पाहता, मध्यम मार्ग स्वीकारण्यात आला आणि २४ जानेवारी १९५० रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी संविधान सभेत घोषणा केली की 'जन गण मन' हे भारताचे राष्ट्रगीत असेल.भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात ऐतिहासिक भूमिका बजावणाऱ्या 'वंदे मातरम्' ला समान आदर दिला जाईल.

बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांची १५० वी जयंती अशी वेळ आहे जेव्हा भारतीय सरकार आणि संसदेने वंदे मातरमला केवळ 'समान आदर' नाही तर 'संवैधानिक दर्जा' मिळेल याची खात्री करावी. कलम ५१अ(अ) मध्ये 'राष्ट्रगीत' हे शब्द समाविष्ट करण्यासाठी सुधारणा करावी. इतिहासाच्या पाठ्यपुस्तकांमध्ये वंदे मातरम्चे महत्त्व अधोरेखित केले पाहिजे आणि वंदे मातरम् दिन,निबंध आणि गाण्याच्या स्पर्धा आयोजित केल्या पाहिजेत. संसद आणि राज्य विधिमंडळांचे अधिवेशन 'वंदे मातरम्'ने सुरू व्हावे. राष्ट्रपती आणि पंतप्रधानांच्या शपथविधी समारंभात ते अधिकृत गाणे म्हणून समाविष्ट केले पाहिजे. सोशल मीडियावरील 'वंदे मातरम् रिबॉर्न' सारख्या सांस्कृतिक मोहिमांनी तरुणांमध्ये त्याची ओळख पुन्हा जागृत करावी. हे फक्त एक गाणे नाही, तर ते राष्ट्रीय चेतनेचे प्रतीक आहे.

आता वेळ आली आहे वंदे मातरम्ला त्याचे योग्य ते मिळाले पाहिजे. २०२५ मध्ये ही १५० वी जयंती ऐतिहासिक पुनर्वाचनाची संधी आहे. स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या या गाण्याला स्वतंत्र भारतात त्याचा संवैधानिक दर्जा मिळाला पाहिजे. मौलाना आझाद यांनी लिहिले, 'वंदे मातरम् हे गाणे भारताची राष्ट्रीय स्मृती आहे. कोणताही भारतीय, हिंदू किंवा मुस्लिम, त्याबद्दल उदासीन राहू शकत नाही.' आणि हेच सत्य आहे: वंदे मातरम् हा केवळ एका समुदायाचा चमत्कार नाही; तो भारताचा सामूहिक गाथा आहे. २०२५ हे गाणे १५० वी जयंती आहे; हे वर्ष केवळ उत्सव नाही, तर आत्मस्मरणाचा प्रसंग आहे. भारताने आता हे जाहीर केले पाहिजे की 'वंदे मातरम्' हे केवळ राष्ट्रगीत नाही, तर ते राष्ट्राच्या आत्म्याचा अमर आवाज आहे.

■ **प्रा.डॉ.सुधीर अग्रवाल**


## विद्यार्थी दिनाच्यानिमित्ताने...

७ नोव्हेंबर हा दिवस भारतीय शिक्षणाच्या इतिहासात अत्यंत महत्वाचा ठरला आहे. या दिवशी साताऱ्यातील प्रतापसिंग शाळेच्या उंबरठ्यावर एका बालकाने प्रथमच पाऊल ठेवले, आणि त्या पावलाने पुढे संपूर्ण राष्ट्राच्या भविष्याचा मार्ग उजळवला. तो बालक म्हणजेच भारतरत्न, संविधान शिल्पकार, शिक्षणतज्ञ, समाजक्रांतीचे प्रवर्तक डॉ. भीमराव रामजी आंबेडकर. ७ नोव्हेंबर हा दिवस 'विद्यार्थी दिन' म्हणून साजरा केला जातो.कारण याच दिवशी इ.स.१९०० साली बाबासाहेब प्रथम शाळेत दाखल झाले होते. साताऱ्याच्या प्रतापसिंग हायस्कूलच्या प्रवेश नोंदवहीत १९१४ या क्रमांकासमोर त्यांच्या स्वाक्षरीची नोंद आजही इतिहासाचे साक्षीदार म्हणून जपली गेली आहे.

आजच्या माहितीच्या युगात विद्यार्थ्यांपुढे ज्ञानाची असंख्य दारे उघडी आहेत; पण त्याचवेळी एकाग्रता, मूल्यं आणि विचारशीलता हरवण्याचा धोका आहे.अशा काळात डॉ.आंबेडकरांचे जीवन आणि विचार विद्यार्थ्यांसाठी दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक आहेत. त्यांच्या आयुष्यातील संघर्ष, चिकाटी आणि आत्मविश्वास हेच खरे विद्यार्थ्यांचे भांडवल आहे. शासनाने ७ नोव्हेंबर हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा करण्याचा घेतलेला निर्णय अत्यंत योग्य आणि स्वागतार्ह आहे. त्यांचे आयुष्य सांगते. 'विद्यार्थी म्हणून विचार करा, शिका, आणि समाजाला प्रकाश द्या.'या विचारांच्या ज्योतीनेच खऱ्या अर्थाने विद्यार्थी दिन उजळून निघतो.

■ **प्रा.विजय कोष्टी**

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**शुक्रवार,ता.७.११.२०२५**, विक्रम संवत २०८२, शिवशक ३५२, शालिवहन शके १९४७, विश्वावसुनाम संवत्सरे, दक्षिणायणे, शरद ऋतो, कार्तिक मासे, कृष्ण पक्षे ,द्वितीया तिथी, ११.०७ नंतर तृतीया तिथी, रोहिणी नक्षत्र, २४.३५ नंतर मृग नक्षत्र, वृषभ रास, परिघ योग, २२.२९ नंतर शिव योग,गरज करण ११.०७ नंतर, वणिज करण २१.१८ पर्यंत, दिनमान ११.२१, सुर्योदय ६.३६, सुर्यास्त १७.५७ (कोल्हापूरचे),राहूकाळ सकाळी १०.३० ते १२,उत्तम दिवस दुपारी १२.३० नंतर, भद्रा २१.१८ नंतर,दुपारी १२.३० पर्यंत परिघ पूर्वदल वर्ज्य.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## * राशीभविष्य

**मेष-** आज केलेली गुंतवणूक तुमच्या समृद्धी आणि आर्थिक सुरक्षिततेला पूरक ठरेल. आर्थिक आघाडीवरील तुम्हाला तुमची प्रलंबित देणी आणि बिले देण्यास उपयोगी पडतील.

**वृषभ-** मित्रमंडळी आणि व्यवसायातील सहकारी यांच्याशी व्यवहार करताना दक्ष रहावे. आजचा दिवस तुम्ही तुमच्या मुलांच्या सोबत घालवाल.

**मिथून-** एखाद्या सहलीच्या ठिकाणी जाऊन तुमच्या प्रेमी जीवनात आनंद आणाल. नवीन गोष्टी शिकण्याकडे तुमचा कल असून तो उल्लेखनीय ठरेल.आजचा दिवस मजेत जाईल.

**कर्क-**तुमच्या वडिलांचा सल्ला आज तुम्हाला कामाच्या क्षेत्रात धन लाभ करवून देऊ शकते. आजच्या दिवशी आपल्या कुटुंबातील सदस्यांच्या गरजांवर लक्ष केंद्रीत कराल.

**सिंह-**तुम्ही तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे आणि तुमची भीती शक्य तितक्या लवकर घालवणेही आवश्यक आहे.त्याचा तुमच्या प्रकृतीवर परिणाम होऊ शकतो.

**कन्या-**व्यापारात आज चांगला नफा मिळण्याची शक्यता आहे. आजच्या दिवशी तुम्ही आपल्या व्यवसायाला नवीन उच्चता देऊ शकता. मुलांच्या अभ्यासाबाबत काळजी करू नका.

**तुळ-** आजच्या दिवशी तुम्ही स्वीकारलेले धर्मादाय काम तुम्हाला मानसिक समाधान आणि आराम मिळवून देईल. तुम्ही इतरांवर अतिखर्च करण्यासाठी पुढाकार घ्याल.

**वृश्चिक-**कुटुंबाच्या कल्याणासाठी मेहनत करा. तुमची कृती प्रेमापोटी असू देत आणि सकारात्मक दृष्टिकोन बाळगा आणि मत्सर करू नका.तुमचा जोडीदार काहीतरी खास खरेदी करेल.

**धनु-** प्रदीर्घ आजारातून तुम्ही बरे व्हाल. धनाची आवश्यकता कधी ही पडू शकते म्हणून, आज जितके शक्य असेल तितके आपल्या पैश्याची बचत करण्याचा विचार करा.

**मकर-** तुमचा स्पर्धात्मक स्वभाव तुम्हाला एखाद्या स्पर्धेत यश मिळवून देईल. तुमचा एखादा जुना मित्र भेटण्याची शक्यता आहे जोडीदाराबाबतच्या जुन्या आठवणींना उजाळा देईल.


**कुंभ-**स्वत:ची प्रगती करणारे प्रकल्प हाती घेतले तर त्याचा दुहेरी फायदा होईल. तुम्हाला चांगले वाटेल आणि तुम्ही अधिक आत्मविश्वास बाळगू शकाल.

**मीन-**सुयोग्य कर्मचाऱ्यांना नोकरीत बढती किंवा आर्थिक फायदा मिळेल प्रवास फायदेशीर ठरेल. आर्थिक प्रगतीमध्ये मदत होईल.तुमच्या कुटुंबियांची काळजी घ्या.

## वाचकांचा पत्रव्यवहार

### कोल्हापूर शहरात पार्किंग व्यवस्था विकसित करावी

कोल्हापूर शहरात रस्त्यांवर अनियंत्रित पार्किंग मोठ्या प्रमाणात असते. शहराची लोकसंख्या व वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत असताना पार्किंगची व्यवस्था त्यानुसार विकसित झालेली दिसत नाही. त्यामुळे अनेक वाहनचालक



सुलभतेच्या दृष्टीने रस्त्याच्या कडेला किंवा ज्या ठिकाणी जागा मिळेल त्या ठिकाणी वाहन उभे करतात. यामुळे रस्त्यांची वहन क्षमता कमी होऊन वाहतूक मंदावते. विशेषत: दवाखाने, बाजारपेठा, शाळा व कार्यालयांच्या परिसरात तर पूर्णपणे गोंधळाचे वातावरण दिसते. पादचाऱ्यांना फुटपाथ वापरणे शक्य होत नाही, त्यांना रस्त्यावर चालण्याची वेळ येते. परिणामी नागरिकांमध्ये वाद होण्याचे प्रमाण व अपघात देखील वाढले आहेत. याव्यतिरिक्त रुग्णवाहिका व अग्निशामक वाहनांना वेळेत मार्ग न मिळाल्याने गंभीर परिणाम होऊ शकतात.

या परिस्थितीत कोल्हापूर महानगरपालिका व जिल्हा प्रशासनाने नियोजित पार्किंग व्यवस्था विकसित करणे, बहुमजली पार्किंग केंद्रे उभारणे व अनधिकृत पार्किंगवर कठोर दंड आकारणे आवश्यक आहे. तसेच नागरिकांनीही सामाजिक जबाबदारी ओळखत शिस्त व जागरुकता ठेवून वाहन पार्क करावे.

■ **दिग्विजय पाटील, एकोंडा (ता.कागल)**

### देशातील गरिबीवर मात करण्यासाठी प्रयत्न व्हावेत

दक्षिण आफ्रिकेतील जी २० साधारण समितीने केलेल्या जागतिक आर्थिक अभ्यासात असे आढळून आले की, जागतिक स्तरावर वरच्या एक टक्का श्रीमंत लोकांनी २००० ते २०२४ या काळात निर्माण झालेल्या संपत्तीपैकी ४१ टक्के हिस्सा मिळविला तर त्याखालील उत्पन्न धारक केवळ एक टक्का हिस्सा मिळवू शकले. सर्व देशांतील श्रीमंत लोकांनी आपल्या संपत्तीचा वाटा वाढविला. जी टक्केवारी ७४ टक्के भरते. याच काळात भारतातील श्रीमंत लोकांची संपत्ती ६२ टक्क्यांनी वाढली. चीनमध्ये हेच प्रमाण ५४ टक्क्यांपर्यंत वाढले.

परिणामी प्रचंड लोकसंख्या असलेल्या या देशांतील लोकांमध्ये असलेल्या लोकसंख्येतील असमानता वाढत गेली. इंटरनॅशनल असमानता पॅनेल जे विविध देशांतील लोकांमध्ये असमानता आणि त्यांच्या कारणांचा अभ्यास करत उपलब्ध होणारी माहिती त्या त्या देशांपुढे पुढील कार्यवाहीसाठी पुढे ठेवून काही उपाययोजना सुचवेल असे ठरविले गेले आहे. या समितीच्या असे निदर्शनास आले की, सन २००० पासून एकंदरीत जागतिक गरिबी कमी करणे थांबले आहे. तर काही देशांत याउलट परिणाम झाले आहेत. २.३ अब्ज लोकांना मध्यम किंवा गंभीर अन्न असुरक्षिततेचा सामना करावा लागतो. जागतिक लोकसंख्येच्या अर्ध्याहून अधिक लोकांना पुरेशा आरोग्य सेवा मिळत नाहीत. १.३ अब्ज लोकांना त्यांच्या उत्पन्नापेक्षा खर्च अधिक करावा लागतो म्हणून ती लोकं गरिबीत राहतात. जास्त गरिबी असलेल्या देशांतील असमानतेमुळे तेथील सरकारांच्या सत्तेवर परिणाम होऊन ती सरकारे अस्थिर होऊन कोसळू शकतात असे जी २० समितीच्या अहवालात म्हटले आहे. असमान उत्पन्नाची वाटणी लोकांवर अन्यायकारक ठरते म्हणूनच दरडोई उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न करण्याची गरज आहे जेणेकरून गरीब देशांतर्गत असमानता कमी होईल परंतु हे सर्व करण्यासाठी प्रत्येक गरीब आणि सामान्य देशांना आपल्या देशातील गरिबीवर मात करण्यासाठी बरेच प्रयत्न करावे लागतील. आता देशादेशातील सरकारे किती गांभीर्याने प्रयत्न करतील यावर त्यांच्या देशांची गरिबी, मागासलेपणा दूर होऊ शकेल.

■ **राजन पांजरी**

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् ॲन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५., दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६० , सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.* कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# गारगोटी जिल्हा परिषद निवडणूक चुरशीची होणार

## सौ.रेश्मा देसाईंची उमेदवारी घोषित होण्याची शक्यता; सौ.विद्या सावंत,सौ.राजनंदिनी पाटील यांची नावे चर्चेत

गारगोटी,ता.६(आनंद चव्हाण)-

**आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत गारगोटी जिल्हा परिषद गट पुन्हा एकदा सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षित झाला आहे. या गटातून माजी आ. बजरंग देसाई यांच्या सून व राहुल देसाई यांच्या पत्नी आणि गत वेळेच्या जि.प.सदस्या सौ.रेश्मा राहुल देसाई या काँग्रेसच्या उमेदवार असणार हे नक्की आहे.पण त्यांच्या विरोधात महायुतीचा उमेदवार अजून तरी ठरलेला नाही. त्यामुळे 'रेश्मा देसाई यांची उमेदवारी नक्की पण अजून तरी विरोधकांची ठरेना पक्की'' अशी स्थिती झाली आहे.**

भुदरगड तालुक्याचे मुख्यालय म्हणून गारगोटी ओळखली जाते. तालुक्याचे राजकारण हे गारगोटी येथूनच हलते. गारगोटी जिल्हा परिषद गटात गारगोटी, खानापूर, कलनाकवाडी, मडिलगे बुद्रुक, मडिलगे खुर्द, वाघापूर, आदमापूर, मुदाळ, व्हनगुती या गावांचा समावेश आहे.

गत वेळच्या निवडणुकीत काँग्रेसच्या सौ.रेश्मा देसाई या विजयी झाल्या होत्या. त्यांनी राष्ट्रवादीच्या के.पी.पाटील गटाच्या सौ.संजीवनी विजय आबिटकर यांचा पराभव केला होता. त्यावेळी या गटात पंचरंगी लढत झाली होती.सौ रेश्मा देसाई यांचे पती माजी जि.प.सदस्य राहुल देसाई यांनी भाजपात प्रवेश केला. ते भाजपाचे जिल्हाध्यक्षही झाले, त्यांनी २०१९ ची विधानसभा निवडणूकही लढवली, सध्या त्यांनी पुन्हा काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. आगामी जिल्हा परिषद निवडणुकीसाठी काँग्रेस किंवा महाविकास आघाडी झाली किंवा भुदरगड तालुक्यापुरती राष्ट्रवादी अजित पवार पक्ष म्हणजे माजी आम.के.पी. पाटील यांच्याशी काँग्रेसची आघाडी झाली तरी या गारगोटी गटातून पुन्हा सौ.रेश्मा देसाई यांचीच उमेदवारी असणार हे निश्चित आहे. त्यादृष्टीने त्यांनी तयारी सुरु केली आहे. राहुल देसाई यांनी भेटीगाठी सुरु केल्या आहेत. जिल्हा परिषद सदस्या असताना सौ. देसाई यांनी अनेक विकास कामे खेचून आणली आहेत शिवाय तालुक्यात देसाई गट म्हणून राहुल देसाई यांचे प्रत्येक गावात कार्यकर्त्यांचे जाळे आहे. याचा त्यांना फायदा होऊ शकतो.

राज्यात, केंद्रात भाजपा, शिवसेना शिंदे पक्ष व राष्ट्रवादी अजित पवार पक्ष यांची महायुती सत्तेत आहे. अशीच युती जिल्हा परिषद निवडणुकीत व्हावी असा आदेश आला तर तालुक्यात ही युती प्रबळ ठरू शकते, पण जर तरच्या या बाबी आहेत. राहुल देसाई हे बिद्री साखर कारखान्याचे संचालक आहेत.ते दोन वर्षांपूर्वी झालेल्या कारखान्याच्या निवडणुकीत बिद्री साखर कारखान्याचे चेअरमन के.पी.पाटील यांच्या आघाडीतून लढले आणि जिंकले आहेत. लोकसभा व विधानसभा निवडणुकीत हे दोघेही एकत्र होते. पण गत विधानसभा निवडणुकीनंतर के.पी.पाटील हे राष्ट्रवादी अजित पवार गटाकडे म्हणजे महायुतीकडे आहेत तर राहुल देसाई काँग्रेस म्हणजे महाविकास आघाडीकडे आहेत. महायुती म्हणून तिन्ही पक्षांनी निवडणूक लढवली तर याच गारगोटी जिल्हा परिषद गटात के. पी.पाटील यांच्या सून व मुदाळ गावच्या लोकनियुक्त सरपंच सौ. राजनंदिनी विकास पाटील या उमेदवारीच्या दावेदार ठरू शकतात.त्या सुद्धा मुदाळ गावच्या लोकनियुक्त सरपंच आहेत, त्यांनीही अनेक विकासकामे केली आहेत. शिवाय महायुतीचे त्यांना बळ मिळणार आहे.गेल्या चार दिवसांपासून सोशल मीडियावर त्यांचे फोटो झळकू लागले आहेत. असे झाले तर ही लढत दोन माजी आमदारांच्या सुनबाई यांच्यामध्ये होणार आहे. त्यामुळे जिल्ह्याचे लक्ष या लढतीकडे राहण्याची शक्यता आहे. अर्थात युती आणि आघाडी कशी होते यावर हे अवलंबून असणार आहे.

### शिवसेना शिंदे पक्ष वेट अँड वॉच च्या भूमिकेत

भुदरगड राधानगरी मतदार संघातून सलग तिसऱ्यांदा ना.प्रकाश आबिटकर निवडून आले आहेत. सध्या ते राज्याचे मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. महायुती कशा पद्धतीने होते,त्यावरच बरेचसे अवलंबून आहे.त्यामुळे सध्या तरी हा पक्ष वेट अँड वॉचच्या भूमिकेत आहे. अद्याप त्यांनी कोणतेही पत्ते खोलले नाहीत.



### पंचायत समिती गणात अद्याप सामसूम

गारगोटी जिल्हा परिषद गटात गारगोटी आणि मडिलगे बुद्रुक हे दोन पंचायत समितीचे गण येतात. हे दोन्हीही गण सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षित आहेत. म्हणजे गारगोटी गटातील तीनही उमेदवार हे महिला असणार आहेत.पंचायत समितीसाठी असा विशेष निधी नाही. सध्या जिल्हा परिषदेकडून किंवा राज्य वा केंद्र शासनाकडून थेट निधी ग्रामपंचायतीकडे वर्ग होत आहे.पंचायत समितीसाठी असा निधी नाही. त्यामुळे पंचायत समिती गणात उमेदवारीसाठी फारसा रस दिसत नाही. त्यामुळे दोन्हीही गणात सध्या तरी सामसूम आहे.

### भाजपच्या सौ.विद्या प्रविणसिंह सावंत पण दावेदार

गारगोटी जिल्हा परिषद गटात खानापूरच्या माजी सरपंच सौ.विद्या प्रविणसिंह सावंत या सुद्धा भाजपा तथा महायुतीकडून उमेदवारी मिळावी यासाठी प्रयत्नशील आहेत.सौ.सावंत यांचे पती भाजपाचे प्रविणसिंह सावंत व पुत्र पार्थ सावंत यांच्या माध्यमातून समाजकार्यात अग्रेसर आहेत. त्यांनी सरस्वती गारमेंटच्या माध्यमातून शेकडो महिलांच्या हाताला काम दिले आहे. शिवाय अनेक सामाजिक,, सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रम या परिवाराने केले आहेत.त्यामुळे त्यांची उमेदवारी लक्षवेधी ठरणार आहे.



आदमापूरः येथे गटार नसल्याने रस्त्यावरून वाहणारे पाणी.

# आदमापूरच्या प्रवेशद्वाराजवळच भाविकांना दुर्गंधीचा त्रास

मु.तिट्टा,ता.६(प्रतिनिधी)-

**महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश,गोवा,कोकण आदी राज्यातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या आदमापूर (ता.भुदरगड) येथील संत बाळूमामा यांच्या दर्शनाला येणाऱ्या भाविकांना दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत आहे. मुख्य प्रवेशद्वाराजवळ अंतर्गत गटर्स नसल्याने पाणी साचून त्याची दुर्गंधी येत आहे.त्यामुळे भाविकांतून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.**

मुदाळ तिट्ट्याकडून आदमापूरकडे येणाऱ्या रस्त्याच्या बाजूला अंतर्गत गटर्स बांधण्यात आलेली आहेत.परंतु मुख्य प्रवेशद्वाराच्या बाजूला ४० मीटर अंतरापर्यंत अंतर्गत गटर्स बांधण्यात आलेली नाहीत.गटर्स खुली असल्याने पाणी साचले आहे.त्यामुळे दुर्गंधी येत आहे.शिवाय पाणी साचल्याने त्याचा त्रास भाविकांना सहन करावा लागत आहे. त्यामुळे भाविकातून नाराजी व्यक्त होत आहे.एका नावाजलेल्या मोठ्या खाजगी कंपनीने रस्ता केला आहे. संबंधित कंपनीने जवळपास अडीचशे मीटर पर्यंत अंतर्गत गटर्स बांधली आहेत. केवळ ४० मीटर अंतरापर्यंतचे अंतर्गत गटर्स त्यांनी बांधलेले नाहीत. या संदर्भात या कंपनीच्या अधिकाऱ्यांची आसपासच्या लोकांनी भेट घेऊन गटर्स बांधण्या संदर्भात चर्चा केली. परंतु सार्वजनिक बांधकाम विभागाने आपल्याला सांगितल्या शिवाय गटर्सचे काम करणार नाही असे सांगितले.



शेतकरी संघटनेला पाठींबा असेलेले पत्र देताना धवल भिवरे बाजूला शेतकरी संघटनेचे नेते व सदस्य.

# शेतकऱ्यांच्या आंदोलनास विविध संघटनांचा जाहीर पाठिंबा

बेडकिहाळ,ता.६(प्रतिनिधी)-

**ऊस आंदोलनास पाठींबा म्हणून बुधवारी शेतकरी संघटनेच्या आंदोलनास निपाणी, चिकोडी तालुक्यातील खते व कीटकनाशक, बि-बियाणे विक्रेते असोसिएशन पदाधिकाऱ्यांनी बेडकिहाळ सर्कल परिसरातील आंदोलनस्थळी भेट घेऊन पाठींबा जाहीर केला.**

बेडकिहाळ सर्कल परिसरात शनिवारी ता.१ पासून महाराष्ट्रातील साखर कारखान्यांना जात असलेल्या ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर आणि ट्रक शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी रोखून धरले आहेत. कारखानदारांनी जाहीर केलला दर शेतकऱ्यांना मान्य नसून आमची मागणी हि ३७५१ रुपयांची आहे. तेव्हा कर्नाटकातील कोणत्याही कारखान्याने आपला दर जाहीर केलेला नाही. तेव्हा ऊस दर जाहीर केल्या विना रस्त्यावरील ऊस वाहतुकीस अनुमती देण्यात येणार नाही असा ठाम निर्धार शेतकरी संघटना व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी घेतला आहे. या प्रसंगी धवल भिवरे, बाबासाब खोत, राजू खिचडे, रमेश पाटील, बंटी पाटील, विनय कोरे, भारत खोत, म्हाळू कोरे, आदींनी मनोगत व्यक्त केले. याच दरम्यान निपाणी तहसीलदार सुरेश मुंजे यांनी आंदोलन कार्यकर्त्यांची भेट घेतली तसेच सदलगा पोलिसांना बंदोबस्तासाठी विशेष सूचना केली.

# जीवन साळोखे सादर करणार पाच दिवस 'वैचारिक बंध'

मुरगूड,ता.६(प्रतिनिधी)-

**कोल्हापूर आकाशवाणी केंद्रावरुन दररोज सकाळी ठीक ७.०० वाजता प्रसारित होणाऱ्या 'ऐसी रसिके'या रसिकप्रिय साहित्यिक कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक जीवन साळोखे यांचे वैचारिक बंध प्रसारित होणार आहेत. शनिवार ता. १६ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर, असे सलग पाच दिवस विविध विषयांवरील पाच "वैचारिक बंध" ऐसी रसिके या कार्यक्रमातून जीवन साळोखे सादर करणार आहेत.**

यापूर्वीही त्यांनी"ऐसी रसिके"या कार्यक्रमातून अनेक वेळा वैचारिक बंध सादर केले असून, त्यांना जाणकार श्रोत्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे. विविध वृत्तपत्रांतून सातत्याने सदर लेखन करणाऱ्या जीवन साळोखे यांची आजवर पन्नास पुस्तके प्रकाशित झाली आहेत. ग्रंथप्रसार, ग्रंथालय चळवळ आणि वाचन संस्कृती यासाठी ग्रंथदान हा उपक्रम, ग्रामीण आणि शहरी भागात एक हाती गेली वीस वर्षे,ते शाळा महाविद्यालयांतून राबवत आहेत.

# जीवन यशस्वी होण्यासाठी सतत प्रयत्नशील रहा-प्रा.पाटील

बेडकिहाळ,ता.६(वार्ताहर)-



**आजचे युवक उद्याचे भविष्य घडविणारे नागरिक आहेत.आपल्या जीवनात यशस्वी होण्यासाठी आदर्श व थोर महापुरुषांचे चरित्र वाचन करा, व त्यांचा आदर्श घेऊन आपल्या आई वडिलांची मान सन्मान उंचविण्यासाठी सतत प्रयत्नशील राहा. तर आपल्या मातीशी व आपल्या माणसांशी सतत नाते जोडून समाजात आदर्श नागरिक म्हणून आदर्श समाज घडवा ता जीवनात यशस्वी होण्यासाठी सतत प्रयत्नशील राहा.नक्कीच यश मिळेल, असे मत व्याख्याते प्रा.दीपक पाटील (इचलकरंजी) यांनी व्यक्त केले.**

ते बेडकिहाळ येथे श्री १००८ पार्श्वनाथ भगवांनाच्या ११३ व्या रथोत्सवा निमित्त बी.जे.पाटील किणीकर समुदाय भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यान प्रसंगी बोलत होते. स्वागत व प्रास्ताविक कुंथल वडेर यांनी केले.याप्रसंगी लठ्ठे शिक्षण संस्थेचे प्राचार्य उपप्राचार्य, प्राध्यापक वर्ग,शिक्षक, शिक्षिका व बेडकिहाळ येथील श्रावक, श्राविका मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रविण पाटील यांनी आभार मानले.

## निपाणीत रविवारी मराठा वधू-वर मेळावा

निपाणी,ता.६(प्रतिनिधी)-

**येथे रविवार ता.९ रोजी सकाळी दहा वाजता धर्मवीर संभाजीराजे चौकातील बस स्थानकाजवळील गुरुकृपा मंगल कार्यालयात मराठा समाजाचा वधू-वर महामेळावा होणार आहे.**

प्रथम घटस्फोटित, विधवा, विधूर, ज्येष्ठ तसेच विवाह इच्छुक मुला मुलींसाठी हा मेळावा आहे. एकाच व्यासपीठावर असंख्य वधू-वरांना पाहण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. याशिवाय जैन, लिंगायत सुतार, लोहार, कुंभार, साळी, शिंपी, न्हावी, गवळी, रंगारी, परीट, ए.सी./एस.टी. इत्यादी मराठा उपजातीतील वधू-वरांची नोंदणी केली जाणार आहे.

# विरोधक सक्षम असल्यामुळेच बोरगाव शहराचा विकास

## बी.के.महाजन

बोरगाव,ता.६(प्रतिनिधी)-

**बोरगाव नगरपंचायतीवर सत्ताधारी गटाचे १६ नगरसेवक एकीकडे व भाजपाचे शरद जंगटे हे एकीकडे आहेत. ग्रामदैवत हजरत पीर बाबा ढंगवली दर्गा परिसरात काँक्रिटीकरण काम गेल्या अनेक वर्षापासून रखडले होते.**

ही बाब लक्षात येताच या प्रभागातील नगरसेवक शरद जंगटे यांनी तातडीने निधी उपलब्ध करून काँक्रिटीकरण केले.मात्र सत्ताधारी गटाकडून घाईगडबडीने त्याच ठिकाणी दुसरीकडे काँक्रिटीकरण केले. कोणतेही टेंडर किंवा वर्क ऑर्डर नसताना काँक्रिटीकरण केले.



बोरगाव येथे दर्गा परिसराची पाहणी करताना नगरसेवक शरद जंगटे व विविध खात्याचे अधिकारी,क पदाधिकारी.

आमदार शशिकला जोल्ले व माजी खासदार अण्णासाहेब जोल्ले व नगरसेवक शरद जंगटे यांच्या विशेष प्रयत्नामुळे या ठिकाणी काँक्रीट करण्याचे काम झाले. विरोधक सक्षम असल्यामुळेच शहराचा सर्वांगीण विकास होत आहे.विकास कामात राजकारण न आणता शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कार्य करीत असून यासाठी नगरसेवक शरद जंगटे हे विशेष प्रयत्न करीत असल्याचे मत ग्रामपंचायत माजी अध्यक्ष बी.के.महाजन यांनी व्यक्त केले.ग्रामदैवत बाबा ढंगवली यांच्या उरूसानिमित्त बोरगाव येथे नगरसेवक शरद जंगटे यांनी नगरपंचायत अधिकारी, आरोग्य, महसूल यांच्या उपस्थितीत दर्गा परिसराची पाहणी केली.

याप्रसंगी बोलताना जंगटे म्हणाले,बोरगांव उरुसासाठी कर्नाटक महाराष्ट्र राज्यातील हजारो भाविक येत असतात. या ठिकाणी भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी आपण सर्वच अधिकाऱ्यांना सांगितले आहे.

आरोग्य विभागाचे अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन आपली सेवा बजावावी.याप्रसंगी मुख्याधिकारी एस.बी.तोडकर, महादेव नेजे, जितेंद्र पाटील, फिरोज अफराज, अजित कांबळे, अजित तेरदाळे, राजू लटलटे, महापती खोत, शेशु ऐदमाळे, पिंटू नेजे, मजीद मुजावर, हैदर मुजावर, सैदुल मुजावर, बबन रेंदाळे, बाहुबली चोकावे, भूपाल महाजन, संजय महाजन, यांच्यासह हिंदू मुस्लिम उरूस कमिटीचे पदाधिकारी,नगरपंचायत, आरोग्य, महसूल विभागाचे अधिकारी शहरवासिय उपस्थित होते.

# 'हालशुगर'देणार रोपे,खतांसाठी १५ हजार रुपये

## एम.पी.पाटील यांची माहिती

निपाणी,ता.६(प्रतिनिधी)-



**येथील श्री हालसिद्धनाथ सहकारी साखर कारखान्याने माजी खासदार आण्णासाहेब जोल्ले व आमदार शशिकला जोल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली प्रगतीची दिशा धरली आहे.कारखान्याच्या माध्यमातून ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबवल्या जात आहे.**

शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना ऊस उत्पादन वाढीसाठी पाठबळ दिले जात आहे. कारखान्याच्या माध्यमातून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना गेल्या चार वर्षापासून ऊस रोपे व रासायनिक खते यासाठी प्रति एकरी १० हजार रुपये दिले जात होते.यंदा यामध्ये वाढ करण्यात आली असून ऊस रोपे किंवा रासायनिक खते यासाठी एकरी १५००० रुपये दिले जाणार आहेत.ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी हा लाभ घेण्यासाठी नजीकच्या कारखाना कार्यालयाला भेट द्यावी,अशी माहिती चेअरमन एम.पी. पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. शेतकऱ्यांच्या ऊस उत्पादनात वाढ व्हावी हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून यावर्षीपासून ऊस उत्पादन स्पर्धा घेण्याचे नियोजन केले आहे. या स्पर्धा आडसाली-जून ते ऑगस्ट,पूर्व हंगाम-सप्टेंबर ते नोव्हेंबर, सुरू हंगाम-डिसेंबर ते फेब्रुवारी, खोडवा १-नोव्हेंबर ते डिसेंबर, खोडवा २ जानेवारी ते फेब्रुवारी अशा पाच गटात घेतली जाणार आहे. प्रत्येक गटानुसार १० हजार, ७ हजार, ५ हजार अशी अनुक्रमे बक्षिसे देण्यात येणार आहेत, असे देखील प्रसिद्धी पत्रकात सांगितले असून अधिकाधिक शेतकरी सभासद व बिगर सभासद यांनी या स्पर्धेचा लाभ घ्यावा, असे म्हटले आहे.

# नेत्यांच्या' वेट अॅण्ड वॉच'मुळे इच्छुकांचे ठोके वाढले

कागल,ता.६(कृष्णात कोरे)-

**कागल नगरपालिका निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आणि इच्छुक उमेदवारांची घालमेल सुरू झाली. नेत्यांच्या वेट आणि वॉच मुळे इच्छुकांचे ठोके वाढायला सुरुवात झाली. इच्छुकांनी सोशल मीडियावर जोरदार प्रचार बाजी सुरू केली आहे. गटाची उमेदवारी कोणाला मिळणार ? कोण रिंगणातून बाजूला होणार? हे प्रश्न सध्यातरी अनुत्तरीत आहेत.**

सध्या कागल नगरपालिकेवर राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांची सत्ता आहे. यावेळी राजे गट आक्रमक झाला आहे.किंबहुना त्यांनीही या निवडणुकीत चांगलीच कंबर कसली आहे. त्यामुळे राजे गट व मुश्रीफ गट पुन्हा एकदा राजकीय संघर्षातून आमने-सामने येणार आहेत. उमेदवारी मिळवण्यासाठी इच्छुकांची नेत्यांच्या दारात रांग लागली आहे.उमेदवारांची संख्या जास्त असल्याने उमेदवारी कोणाला द्यावयाची यासाठी नेत्यांची डोकेदुखी ठरणार आहे.

### राजे गट-मुश्रीफ गट पुन्हा आमने-सामने येणार

कागल नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी ११ प्रभाग आहेत. २३ नगरसेवक व एक लोकनियुक्त नगराध्यक्ष मतदारांनी निवडावयचा आहे. नगराध्यक्षपद सर्वसाधारण गटासाठी आरक्षित झाले आहे. पालिकेत यावेळी १२ महिला उमेदवार व ११ पुरुष उमेदवार सभागृहात पाठवायचे आहेत. महिला नगरसेवकांची संख्या १२ असलेने पालिकेत महिलाराज येणार आहे हे आता निश्चित झाले आहे. महिला उमेदवारांच्या पतीदेवानी आतापासूनच मतदारांचे उंबरठे झिजवायला सुरुवात केली आहे. यावेळीची ही पंचवार्षिक निवडणूक दुरंगी की तिरंगी की चौरंगी होणार हे अद्याप गुलदस्त्यात आहे. कोणत्या गटाबरोबर कशी युती होणार याचे राजकीय चित्र कसे असणार सध्या तरी अस्पष्टच आहे. उमेदवारी माघारीनंतरच खरे राजकीय चित्र जनतेसमोर येणार आहे.सध्या कागल नगरपालिकेवर महाराष्ट्र राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांची सत्ता आहे. या सत्तेच्या माध्यमातून कागल शहरात विकास कामांची रेलचेल झाली आहे.असे असले तरी समरजीतसिंह घाटगे गट आक्रमक झाला आहे. सत्तेसाठी काय पण अशी भूमिका सर्वच राजकीय गटातून दिसून येते. नेत्यांकडून उमेदवारांची चाचपणी सुरू आहे.चांगला व सक्षम उमेदवार देण्यासाठी नेत्यांची कसोटी येथे सार्थक ठरणार आहे. इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतींना वेग आला आहे.बैठका सुरू आहेत. सध्या तरी थंडीच्या दिवसात राजकीय वातावरण तापायला लागले आहे.

# बोरवडेतील साठे बंधूंनी बनवले भात मळणी मशीन

## एक लिटर पेट्रोल खर्चात १० पोती भाताची होतेय मळणी

बिद्री,ता.६(प्रतिनिधी)-

**सध्या भातकापणीचा हंगाम जोमात सुरु असून शेतमजुरांच्या कमतरतेमुळे कापणीला विलंब होत आहे. या समस्येवर मात करत कागल तालुक्यातील बोरवडे येथील युवराज आणि रविंद्र पांडूरंग साठे या दोन भावांनी देशी जुगाड करुन अल्प खर्चात भात मळणी मशीन बनवले आहे. या मशिनने एक लीटर पेट्रोल खर्चात म्हणजे फक्त शंभर रुपयात १० पोती भाताची मळणी केवळ एक तासात होत आहे.**

जिल्ह्यात भात पिकाचे उत्पादन आजही मोठ्या प्रमाणात घेतले जाते.पावसाळी पिकासोबतच पाण्याची उपलब्धता असलेल्या ठिकाणी उन्हाळ्यातही भाताचे पिक घेतले जाते. भाताची पेरणी किंवा रोप लागवड करण्यापासून ते भात कापणीपर्यंत मशागतीची भरपूर कामे करावी लागतात.यासाठी अधिक मनुष्यबळाची गरज लागते. परंतू कालपरत्वे तरुण पिढी शेतीपासून दूर जात असल्याने शेतीत मजुरांची कमतरता भासत आहे. या अडचणींचा विचार करुन युवराज आणि रविंद्र साठे यांनी अनोखे भात मळणी मशीन बनवले आहे. यासाठी त्यांनी पत्र्याचे रिकामे बॅरल घेऊन त्याला आतून लोखंडी पट्टी आणि लाकडी फळी बसवली आहे. या यंत्राला पट्ट्याच्या सहाय्याने साडेसहा एचपीची मोटर जोडली आहे. हे यंत्र पेट्रोलवर चालत असून एक तासात केवळ एक लिटर पेट्रोलमध्ये १० पोती भाताची मळणी होते. या कामासाठी केवळ तीन ते चार लोकांची गरज असून दिवसभरात दोन ते तीन एकर भाताची कापणी शक्य होते.



बोरवडे : येथील शेतकरी युवराज व रविंद्र साठे या बंधूंनी बनवलेले अनोखे भात मळणी यंत्र.

अभियांत्रिकीचे कोणतेही शिक्षण नसताना युवराज व रविंद्र यांनी स्वतःच्या कल्पनेने या मशीनची निर्मिती केली आहे हे विशेष. या मळणी मशीनची रचना साधी व सोपी असल्याने त्याची वाहतूकही सहज करता येते.अडचणीच्या शिवारात नेण्या-आणण्यासाठी कोणतीच समस्या येत नाही. शिवाय मळणी होताना संपूर्ण लोंब्या रिकाम्या होतात. त्यामुळे भात वाया जाण्याची भिती नसते. या यंत्राची निर्मिती करण्यासाठी केवळ १६ हजार रुपयांचा खर्च आला असून ते दीर्घकाळ टिकणारे आहे.

या यंत्राच्या साहाय्याने साठे बंधूंनी सुमारे शंभर पोती भाताची मळणी केली आहे. हे यंत्र शेतकऱ्यांसाठी उपयुक्त असल्याची भावना शेतकरी व शेतमजूर यांनी व्यक्त केली आहे.

> "भात पिकाची कापणी करताना मजूर मिळत नाहीत ही मोठी समस्या आहे. शिवाय भात कापणीचे मोठे मशीन अडचणीच्या शिवारात नेता येत नसल्याने आपल्याला हे यंत्र बनविण्याचे सुचले. केवळ १६ हजार रुपयांत आपण हे यंत्र बनवले आहे. याचा परिणाम खूपच चांगला असून आपण शंभर पोती भात या मशीनने मळले आहे."
>
> -रविंद्र साठे ,मशीन निर्माता शेतकरी

## आंतरराष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत नमिरा मोमीनचे सुयश

मांजरी,ता.६(वार्ताहर)-

**दुबई येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय अबॅकस स्पर्धा २०२५ यामध्ये नमिरा खुर्शिदलम मोमीन हिने द्वितीय स्थान पटकावले.**

नुकत्याच दुबई येथे आंतरराष्ट्रीय अबॅकस स्पर्धा पार पडल्या.यामध्ये २० देशातील विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेत भारतातील ४१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.या स्पर्धेत चिकोडीच्या केएलई इंग्लिश मिडीयम स्कूलची विद्यार्थीनी नमिरा मोमीन हिने १० मिनीटात २०० गणित सोडवून द्वितीय क्रमांक पटकावला. तिला श्री मास्टर अबॅकस अकॅडमीच्यावतीने प्रशिक्षिका अश्विनी चौगुले यांचे मार्गदर्शन लाभले.संचालक शिवराज पाटील, मनोजकुमार अनूरे आदींचे प्रोत्साहन मिळाले. तिच्या यशाबद्दल परिसरातून तिचे अभिनंदन करण्यात येत आहे.

**पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत**

## * खरेदी विक्री *

**जुने सोफासेट** रिपेअरी करून देवू तसेच नविन सोफा, पडदे व गादी ऑर्डरीप्रमाणे तयार करून देऊ. ८२६१०८९५१०

**७२X३० प्रशस्त** तयार शेड विकणे आहे. व्यंकटेशकॉलनी मागे, जवाहरनगर. संपर्क-९८५०९४९०८०

**प्लॉट विकणे-** रूई, मानेनगर येथील बंदिस्त एनए प्लॉट विकणे आहे. संपर्क- ९४२२०३२०९९

**रेंदाळमध्ये बाजारपेठ** लगत कन्या शाळेजवळ गावठाण हद्दीतील प्रॉपर्टीकार्ड असणारे सर्व सोयीनियुक्त घर विकणे आहे. संपर्क-७७९८९४५८००

**एनए प्लॉट विकणे-** कलेक्टर व तहसिल कबनूरमध्ये जयहिंदनगर, दत्तनगर, फॅक्टरीमागे हॉटेल पॅराडाईज व गुडलकसमोर सर्वसोयीसह. संपर्क-८१४९९६५६९९, ९६९०२७४७७६

**भिडे कंपनीचे ६०'' डब्बल घोडा** २४ माग डॉबीसहीत चालू स्थितीत विकणे आहे. संपर्क-८६६८५६०२४५

**घर विकत पाहिजे.** कोरोची/ इचलकरंजी परिसरात १ बीएचके सर्व सोयीयुक्त. संपर्क-७७५४८१०८०९

**कृष्णानगर शहापूर येथे** १८७९ स्क्वे. फूट बिगरशेती खुली जागा त्यामध्ये १ बीएचके बांधकामसहीत विकणे आहे. संपर्क-८४८३९५९५१०

**जागा विकणे आहे.** निपाणीपासून १२ किमी अंतरावरती निपाणी आणि संकेश्वरच्या मध्ये कणगला KIADB समोर पुणे-बंगळूर (NH-4) हायवेच १४५ फूट फ्रंट असलेली २१ गुंठे जागा देणे आहे. संपर्क-९६०१९४११२

**सांगली नाका** येथे ७X १२ चा लोखंडी गाळा ३ शटरचा विकणे आहे. संपर्क-९७६३२८१६२२

**विकणे-** ४ गुंठे, १ गुंठा घर-९९ वर्षे करार ५,५०,०००/-, ५ गुंठे प्लॉट एनए प्लॉट विकणे. संपर्क-७२१८००९८६८-हातकणंगले.

**१० पैसे पिकाने** ३३ पीसी माल चालवणे आहे. ६८ इंची मागवाल्यांनी संपर्क साधावे. संपर्क-९९७०६३७०७०

**उत्तरमुखी असलेला** व २ रस्ते १६२५ स्क्वे. फूटाचा प्लॉट विकणे आहे. पी.बा. पाटील मळा, टाकवडे रस्ता, इचल. ९६२३०९६१६५

**दुकानगाळा विकणे आहे.** महादेव प्लाझा, जुना चंद्रूर रोड, इचलकरंजी. संपर्क-९५०९३३६६६२

**३ बीएचके** आरसीसी घर विकणे आहे. जवाहरनगर, ठाकरे चौक, शिक्षक कॉलनी, इचलकरंजी. ७२४९११६२११ (एजंट नको)

**घर विकणे आहे.** शास्त्री सोसायटी नं.१.-९६७७०१९८५७०

**जुने व नवे पॉवरलूम** घेऊ व देऊ तसेच फवारा, कांडीमशीन डक्टींग घेऊ व देऊ. संपर्क-८३७०२११००८

**चालू स्थितीतील** हॉटेल बार परमिटसह विकणे आहे. संपर्क-९८३४१६९२२१

## बोअरवेल विषयक

**चौगुले बोअरवेल-**४३ वर्षाची परंपरा आमचेकडे एक दिवसात ४।। व ६।। इंची बोअरींग काढून सबमर्सिबल पंप बसवून मिळेल. संपर्क- डॉ. संजय चौगुले, जुन्या स्टॅण्डसमोर, स्टेशन रोड, इचलकरंजी. मो. ९३२५१४६८८४.

**राज बोअरवेल-** आमचेकडे ४।। व ६।। इंची बोअरवेल तसेच आर्थिकची कामे माफक दरात करून मिळेल. संपर्क- ९६०४०५४६८७, ९४२०३५३६८७.

**चौगुले बोअरवेल जयसिंगपूर-** घरासाठी ४।।। इंची व शेतीसाठी ६।। इंची बोअर मारून मिळेल. संपर्क-९९६०९५०४२१

## यात्रासहल

**अष्टविनायक, शिर्डीसह** ९ नोव्हेंबर ४ दिवस रामेश्वर, कन्याकुमारी, म्हैसूर, तिरुपती डिसेंबर १४ दिवस. कोजागिरी ट्रॅव्हल्स. मो. ९४०३५३४१२, ९४२०५१२५२४

**३ दिवस गोवा ट्रिप-** ३ स्टार हॉटेलमध्ये राहणेची सोय, ३ दिवस साईड सीन फिरण्यासाठी स्पेशल गाडी. संपर्क-९३०९४२३४३६

## हॉटेल

**फक्त संध्याकाळी-** वेटर, तंदुरी रोटीवाला व महिला कामगार पाहिजे. हॉटेल गावरान ढाबा, इचलकरंजी, टाकवडे रोड, टाकवडे. ९९७५११०५९१

## व्यवसाय विषयक

**घर बसल्या-** काम करून दररोज कमवा १०० ते १०००. संपर्क-दिपाली मॅडम-७२४९६७०९९६

## कर्ज विषयक

**लोन मिळेल-** घर बांधकामासाठी व घरावर तारण कर्ज कमित कमी व्याज दरामध्ये मिळेल. ९१७५७१९९१७

## वधु-वर विषयक

**निपाणी येथे** भव्य मराठा समाज वधु-वर परिचय महामेळावा, रविवार दि.९ नोव्हेंबर २०२५, स्थळ-श्री गुरुकृपा मंगल कार्यालय बस स्टॅंडजवळ, निपाणी, वेळ-सकाळी १० ते ४. मेळाव्यामधील येणारे बायोडाटा व आणखी ५० कॉमन बायोडाटाची पीडीएफ दिली जाईल. टीप-मेळाव्यात सर्व जातीच्या वधु-वरांची नावे नोंद करून घेतली जातील. संपर्क-ऑफ- ९८०३७५२३०, ८६६०४५४१४१

## * भाड्याने देणे/घेणे *

**२ बीएचके** सर्व सोयीनियुक्त बोअर व पार्किंगसह भाड्याने देणे आहे. ठाकरे चौक, जाणता राजा गल्ली नं.३, खोतवाडी. संपर्क-९४०४४०७८२०, ७७६९८३६४८

**२ बीएचके** घर/बंगला भाड्याने देणे. वर्धमान चौकाजवळ शाकाहारींसाठी नयनरम्य वसाहतीमध्ये. भेटा-९९२३०२९०९०, ९४२३०२९०९०

**दुकानगाळा भाड्याने देणे-** १०X२५ चा गाळा व वरती पोटमाळा १०X१५ आरसीसी थोरात चौक, इचलकरंजी. ९५२७१६४१०१, ९४२२०४४६८५

**सर्व सोयीनियुक्त** आरसीसी गोडावून भाड्याने देणे आहे. गारमेंट व इतर व्यवसायासाठी. संपर्क-९४२०४५१२०१

**१ बीएचके व १ आरके** रूम्स व दुकानगाळा भाड्याने देणे आहे. गणेशनगर, डेक्कन व यशवंत कॉलनी एरिया येथे. संपर्क-९७६७०५१४५४

**भाड्याने देणे-** शहापूरमध्ये सर्व सोयीयुक्त २ बीएचके फ्लॅट भाड्याने देणे आहे. संपर्क-९४२०१३२३७२

**दुकानगाळा भाड्याने देणे.** प्रत्येकी २०५ स्क्वे. फूट गोल्डन टॉवर निरामय हॉस्पिटल रोड, इचलकरंजी. संपर्क-९८२२५९७४९७

**गाळा भाड्याने देणे आहे.** २०० स्क्वे. फूट मेन रोड जनता बँकेजवळ. संपर्क-९५६१६६६९६७

**१ बीएचके ग्राऊंड फ्लोअर** (रो हाऊस) भाड्याने देणे. सांगली रोड, सुतगिरणीजवळ, इचलकरंजी. संपर्क-९०२२५५९८८०

**आरसीसी सिंगल रूम** भाड्याने देणे आहे. सर्वसोयीयुक्त पहिला मजला, नदीवेस रोड, गुरुकृपा रेसिडेन्स, इचलकरंजी. भोसले-९१९८५४३६९५

**सुदर्शन चौक आर.पी.** रोड येथील १०X१० चे २ आरसीसी दुकानगाळे, एकत्रित किंवा वेगवेगळे भाड्याने देणे आहे. संपर्क-९८९०२७०११०

**भाड्याने देणे-** १५०० स्क्वे. फूट रोडच १९ एचपी लाईटसह सीएनसी, व्हीएमसी गारमेंट, गोडाऊनसाठी भाड्याने देणे. डी-मार्टजवळ. देसाई-९८२२११२९०

**साखरपे हॉस्पिटलजवळ** सातपुते गल्लीमध्ये १०X२० गाळा भाड्याने देणे आहे. ८१३४९९१३०८

**१२।।X२५=३००** फूटाचा गाळा दुकान, शोरूम, पतसंस्था इ.साठी भाड्याने देणे. रोडटच, गांधी कॅम्पजवळ, खंजीरे मळा, इचलकरंजी. फोन-७४९८५२२८६५

**भाड्याने देणे-** २ बीएचके सर्व सोयीसुविधांनीयुक्त, जुन्या नगरपालिकेजवळ (धान्य ओळ), बदली नोकरदार कुटूंब किंवा कॉलेज विद्यार्थ्यांसाठी देणे आहे. संपर्क-९३२६७६१२९९

**सर्व सोयीनियुक्त** २ बीएचके प्रशस्त घर भाड्याने देणे. (भाडे १०,००० रू.) संपर्क-स्वामी समर्थ कॉलनी, योगाश्रमजवळ, शहापूर. ७४९९५८८००

**शेड भाड्याने देणे-**१८X३४ चे आरसीसी शेड, १० एचपी लाईटसह, तिवारे अपार्टमेंटजवळ, स्वामी अपार्टमेंटजवळ, इचलकरंजी. फोन-९१९५९८७३८१

**शेड भाड्याने देणे-** अंदाजे ११०० स्क्वे. फूटाची खंजीरे मळा, दत्त मंदिरजवळ, गोडाऊन, गारमेंट, क्लासेससाठी उपयुक्त. संपर्क-९९२३९६९४९४

**२५X२३ चा आरसीसी** दुकानगाळा भाड्याने देणे. पॅराडाईज कॉलनी, गजानन महाराज मंदिरशेजारी, मेडिकल, गोडाऊनसाठी/सुत गोडाऊनसाठी/सुत गोडाऊनसाठी उपयुक्त. संपर्क-कोतवाल सर-८८०००२२१७०

**१ बीएचके व २ बीएचके** सर्व सोयीनियुक्त ग्राऊंडलेवल भाड्याने देणे आहे. स्वत:चा बोअरसह. संपर्क-९४२०७७६२६४

**१ रूम किचन** भाड्याने देणे आहे. गावभाग, चावरे गल्ली, इचलकरंजी. संपर्क-९९७०३०५७६७

**कबनूर, धुळेश्वरनगर** गल्ली नं.५, येथील एनए प्लॉट त्वरीत विकणे आहे. एजंट क्षमस्व तसेच जवाहरनगर मधील खोल्या भाड्याने देणे आहे. संपर्क-९९६०६२२४०८

**बोरगाव, इचलकरंजी** रोडटच प्लॉट पूर्णत: १० फूट उंचीची आरसीसी वॉल कपौंडने केलेली जागा भाड्याने देणे आहे. ९४२२४१४४०७

**शेड भाड्याने देणे.** आरसीसी ३२०० स्क्वे. फूट २१००+११०० स्क्वे. फूट एकत्र दोन शेड, लाईट, पाण्याची सोय आहे. ५२X४०, ५२X२२. पत्ता-रूई फाटापासून रूईकडे ७५० मी. वरती पाटणकर मळा, ता. हातकणंगले. संपर्क-९७६६६८२२९९, ९९२२४१३९१५

**सर्व सोयीनियुक्त** आरसीसी दुकानगाळा भाड्याने देणे आहे. राणी बागेजवळ, आयसीआयसी बँकेमागे. संपर्क-भावना-८८८८८५६०५२

**भाड्याने देणे-** १ बीएचके सर्व सोयीनियुक्त रूम. पत्ता-किरण गॅसमागे, लंगोटे मळा, २ री गल्ली, इचलकरंजी. (अर्जुन कदम) ९४२३२६७३२१

**शेड भाड्याने पाहिजे.** १५०० ते २००० स्क्वे. फूटाचे इचलकरंजी परिसरात. संपर्क-९३७१६३४९४३, ७०२०९८२३२१

**भाड्याने देणे-** २ बीएचके फ्लॅट सर्व सोयीनियुक्त फर्निचर असलेला पाण्याची सोय, शाकाहारीसाठी भोनेमाळ येथे भेटा. फोन-८४२१९८८७६०

**१२ लूम व शेड** डक्टींगसहीत भाड्याने देणे. घरून चालवणाऱ्यांना प्राधान्य. शहापूर ८०X४२ बिमे मिळतील. संपर्क-९६६८०१३८१०१

**चालू स्थितीतील हॉटेल** भाड्याने देणेचे आहे. हातकणंगले, मंडारे पंपासमोर. संपर्क-९७६३४७७७९९, ७७९८७२०९४१

**विक्रमनगर,** मारूती मंदिरसमोर येथे क्लाससाठी, गारमेंटसाठी उपयुक्त २५X१३ दुसऱ्या मजल्यावरील हॉल भाड्याने देणे. संपर्क-९७६३७७७७९९

**घोरपडे नाट्यगृहाशेजारी** सर्व सोयीनियुक्त २ बीएचके घर व १ आरके भाड्याने देणे आहे. संपर्क-७०५७८२८९९

**आरसीसी ३ रूमचे** घर सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे आहे. पत्ता- तांबे मळा, ज्योतिबा मंदिरजवळ, (शुध्द शाकाहारीसाठी) ९४२११०१००८

**जय सांगली नाका येथे** ११X२२ आरसीसी गाळा भाड्याने देणे आहे. संपर्क-९७६३२८१६२२

**मध्यवस्तीत** सर्व सोयीनियुक्त आरसीसी २ रूम भाड्याने देणे आहे. रेंदाळ बॅंकेच्या आतील बाजूस कुंभार गल्ली, शाकाहारींना प्राधान्य. संपर्क-७८७५५७०६४२

**८५०० स्क्वे. फूट** रिकामी जागा कंपौंडसहीत भाड्याने देणे आहे. जुने राज कॅसलजवळ, सांगली रोड, इचलकरंजी. संपर्क-९३०११७०११७

**खोतवाडीमध्ये** सर्व सोयीनियुक्त १ बीएचके व १ आरके रूम सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे. संपर्क-९३२५००९००४

**मेडिकलचे A to Z** साहित्य भाड्याने देणे आहे. संपर्क-७६२०६२७४२१

**श्री बीएचके** बंगल्यातील पहिला मजला भाड्याने देणे. कमर्शियल किंवा रहाणेसाठी उपयुक्त नवीन महापालिकेजवळ, ६० फूटी रोडटच इचलकरंजी. ९६६५०३८६७७

**फॉर्च्युन प्लाझाजवळ** रोडटच ४०० स्क्वे. फूट ते २००० स्क्वे. फूटपर्यंत गाळे भाड्याने देणे आहेत. संपर्क-९५४३८२५४३८२

**दुकानगाळा भाड्याने देणे-** पाटील मळा, सांगली रोड, सहकारनगर, बस स्टॉपजवळ, इचलकरंजी. संपर्क-आलगोंडा पाटील-९७७०७५७८०८, ७९७२७२५३६९

**ASC College** जवळ ३५० स्क्वे. फूट+४ हॉल व ५०० स्क्वे. फूट चा एक गाळा भाड्याने देण्याचे आहे. ९७६२६२६२३८, ९१७५२००९०८

**१२X११ गाळा** अर्जंट भाड्याने देणे आहे. पत्ता-मेन रोड, बालाजी चौक, विक्रमनगर, संपर्क-९९२१४९३०५०, ९०९६०५१२९६

**शाहू पुतळ्याजवळ** एएसी कॉलेज रोड ३००० व १००० स्क्वे. फूट गोडाऊन भाड्याने देणे आहे. संपर्क-९१९५८२००७२

**गोडावून भाड्याने देणे आहे.** १५०० स्क्वे. फूट. संपर्क-९१५६३९८२९७

**३००० स्क्वे. फूट** प्रशस्त हॉल, बँक, पत संस्था, ऑफिससाठी भाड्याने देणे आहे. सर्व सोयीनियुक्त. संपर्क-९८२२११०३८३.

## * नोकरी विषयक *

**मार्केटिंग ऑर्डर** व डिलीव्हरीसाठी इचलकरंजी व हातकणंगले तालुक्यासाठी एक सेल्समन व ड्रायव्हर हवा आहे. गरजूंनी संपर्क करावा. ९९२३२९२५५८

**लेडिज हेल्पर** कामगार पाहिजे आहे. रुचि क्रिएशन उत्तम प्रकाश टॉकीज जवळ वेळ सकाळी १०.३० ते संध्याकाळी ७.३० रविवारी सुट्टी वय मर्यादा २० ते ४०. अधिक माहितीसाठी संपर्क ९५११११२६१६

**गरजू महिला कामगार पाहिजे.** पाटील ट्रेडर्स, कबनूर. वाळू/सिमेंट डेपोसाठी सुपरवायझर पाहिजे. संपर्क-९३८५०५५१५५

**पेट्रोल पंपावर पेट्रोल,** डिझेल सोडण्याकरीता शिवाऊ/अनुभवी लेडीज/जेन्टस कामगार पाहिजेत. कलानगर, चंदूर रोड. संपर्क-९९७०७७६४६४.

**प्लेबिंग व हार्डवेअर** शोरूममध्ये जेन्टस व लेडीज कामगार पाहिजे व लेडीज कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजेत. संपर्क-९५०४१११९७१

**शहापूर येथे** खालील पदे त्वरीत भरणे. १) सीएनसी प्रोग्रॅमर-०४ (अनुभव ३-५ वर्षे) २) सीएनसी ऑपरेटर-०४ (शिकाऊ) संपर्क-८५६९४६६९४

**टेलिकॉलर पाहिजे.** किमान बारावी पास, अनुभवी, कॉम्प्युटर ज्ञान असलेली मुलगी/महिला टेलिकॉलर पाहिजे. ९४२११०५४४४

**सेल्समन पाहिजे.** ग्रॅज्युएट, सेल्समधील किमान दोन वर्षाचा अनुभव, उत्तम संभाषण कौशल्य, कॉम्प्युटर ज्ञान असलेली लेडीज अथवा जेंटस सेल्स असिस्टंट पाहिजे. ९४२११०५४४४

**आईस्क्रीम दुकानासाठी** पार्ट टाईम कामगार पाहिजेत. संपर्क-स्टेशन रोड, जुना नाका. ९६६६०११३०३

**पाहिजेत.** १) डाटा एंट्री ऑपरेटर-२ जागा (कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक) लेडिज किंवा जेन्टस. २) इनोव्हा गाडीकरीता कायमस्वरूपी ड्रायव्हर पाहिजे. संपर्क-८६२६००९०५. bawneindia@gmail.com डेक्कन मिलसमोर, जवाहरनगर, इचलकरंजी.

**गारमेंटसाठी** शिलाई कामगार पाहिजे. पायल बॅंग्ज, मेन रोड, इचलकरंजी. संपर्क-९३२५२२६९१९, ८२०८४७७२०२

**हेल्पर पाहिजे.** दहावी पास अथवा नापास कष्टाळू, हुशार, हेल्पर व कामगार भरती करणे आहे. राजवाडा चौक, इचलकरंजी. ९४२११०५४४४

**हेल्पर कामासाठी** कामगार पाहिजे. वेळ-सकाळी ८ ते ५. संपर्क-यशवंत कॉलनीजवळ, इचलकरंजी. ९७६७०५१४५४

**नामांकित कंपनी** पॅकिंगसाठी महिला कामगार पाहिजेत. वेळ-सकाळी ९ ते ६, पगार-७०००/-संपर्क-९९२१२४५४९९

**त्वरीत भरती-** इचलकरंजी, यड्राव फाटा येथील नामांकित गारमेंट कंपनीमध्ये शर्ट बनविणेसाठी स्त्री आणि पुरुष शिलाई कारागीर, लाईन मास्टर आणि चेकर पाहिजेत. बाहेर गावामधून (१५ ते ३० किलोमिटर अंतर) येणाऱ्यांना गाडीची व्यवस्था केली जाईल. आकर्षक पगार. संपर्क-चंदवाणी अॅपरल्स (स्टोरी गारमेंट्)-७६२०३८२३७२, ९३२५८३१३८०

**आयुर्वेदिक हॉस्पिटलमध्ये** कामासाठी मुलगा/मुलगी पाहिजे. शिक्षण-१२ वी. वय-१८ ते ३० वर्षे, स्वयंपाक व घरकामासाठी बाई पाहिजे. संपर्क-८८८८५११५२२

**टेलिकॉलिंगसाठी** लेडीज हव्या आहेत. वय-१८-४० वर्षे. शिक्षण-१० वी पुढे श्री महालक्ष्मी वधु-वर. ८८३०२४०४२६

## पाहिजेत

**कोरूगेटेड बॉक्स फॅक्टरीत १० वी/ १२ वी पास/नापास शिकाऊ कामगार पाहिजेत. अर्जासह समक्ष भेटा.**

### अरूंधती कलर कार्टन्स

**प्लॉट नं.६०, पार्वती को.ऑप इंडस्ट्रियल इस्टेट, यड्राव. ४१६१२१,**

**9595845774**

**कंपनी देखरेखीसाठी** नवरा-बायको पाहिजेत. रहाणेची सोय. पत्ता-लक्ष्मी इंडस्ट्रिज, हातकणंगले. मो. ९८५००५६५३२

**हॉस्पिटलसाठी** पुरुष स्टाफ पाहिजे. मानस क्लिनिक अॅन्ड नर्सिंग होम, अग्रसेन भवन रोड, अग्रसेन भवनसमोर, इचलकरंजी. भेटण्याची वेळ-संध्या. ४-६ वाजता. ९०७५००४८०४

**प्रोडक्शन कामासाठी** कामगार पाहिजेत. अनुभवी लेथ ऑपरेटर-१, सीएनसी ऑपरेटर-२, अॅटोमेटिक लेथ शिकाऊ-२. बालाजी मंगल कार्यालयमागे, शहापूर. ९९७५६२०००२

**REQUIRED-** Accountant for textile manufacturing company having good knowledge in GST, TDS & Experience in Audit (Excel, Tally & Mail) Minimum 2 to 3 year, Experience Required. Male & Female Candidate & Khabani Software Inventory Minimum 2 to 3 year, Experience Required. Male Candidate. Contact No. 7721909027

**अनंत इंडस्ट्रिज-** शहापूर येथे व्हीएमसी/सीएनसी मशीनवर ऑपरेटर पाहिजेत. लेडीज/जेंटस. इएसआय ची सोय. ९४२२५१२२३५

**इलेक्ट्रीक दुकानात** काम करणेसाठी अनुभवी/शिकाऊ मुले व वायरमन पाहिजेत. संपर्क-९४२११००५५५

**पाहिजेत.** पार्ट/फूल टाईम CNC/ VMC सेटर कम ऑपरेटर हेल्पर, फिटर, २.४ पट बोनस, तासावर पगार, रिपोर्ट नाही. दर १५ दिवसाला पगार. फ्लेक्सिबल टायमिंग. संपर्क-९५५८८०९५३७

**त्वरीत सिक्युरीटी** गार्ड पाहिजेत. इचलकरंजीत बंगल्यासाठी व शहापूर तारदाळ, जयसिंगपूरसाठी. आकर्षक पगार, पीएफ+इएसआयसी सुविधा. संपर्क-८००७०६९१८०, ८०५५६९३०४०

**अर्जंट कामगार पाहिजे.** पंचगंगा सर्व्हीसेस सेंटर येथे अनुभवी ११५००/- शिकाऊ-९०००/- प्रामाणिक गरजू, स्टेशन रोड, माणिक स्टिलसमोर.

**CNC/VMC** ऑपरेटर, प्रोग्रॅमर, जॉब इन्स्पेक्टर हेल्पर पाहिजेत. संपर्क-८४३२७७७१०७, ९७६२४०५००१

**टर्नर पाहिजेत.** लेथ मशिनवर कामासाठी आकर्षक पगार. पत्ता-गुरूकृपा इंजिनिअरिंग, शाहू पुतळा, जुन्या स्टॅन्डजवळ, इचलकरंजी. ८८०६०५८४६८, ९१५६५६९६०२

**अनुभवी सीएनसी** ऑपरेटर व हेल्पर पाहिजेत. संपर्क-पायोनिअर इंजिनिअर्स, आरगे भवनसमोर, विक्रमनगर, इचलकरंजी. फोन-७०२०१७९०३

**अनुभवी फार्मासिस्ट** लेडीज पाहिजे. संपर्क- चौगुले मेडिकल, शाहू पुतळा, इचलकरंजी. फोन-७८८८२३५३२२

**वोडाफोन, आयडीया** कंपनीमध्ये सिम विक्री, शॉपसाठी मुले पाहिजेत. पगार-१८,००० ते ३०,०००/- इन्सेटिव्ह+पीएफरूफ+ईएसआयसी सुविधा उपलब्ध. ऑफिस-भाग्यरेखा टॉकीजजवळ, अक्षदा मोबाईल, इचलकरंजी. ७७५५४८८१७०२, ९८२३००३४५५ (भेटण्याची वेळ-११ ते ७)

**दुकानात कामासाठी** १० वी, १२ वी पास-२ मुले पाहिजेत. पत्ता-स्टेशन रोड, अजब फर्निचरसमोर, भागवत एजन्सी, इचलकरंजी. ७०१७७०७०७०

**गारमेंटसाठी** स्टीम प्रेसिंग पॅकिंग करून मिळेल. एक्सपोर्ट डोमस्टिक, गांधीनगर. अनुभवी प्रेसमन, हेल्पर पाहिजेत. महासत्ता चौक. संपर्क-८०८३७७०२३

**नामांकित अॅकेडमीमध्ये** शिपाई, कौन्सिलर, टेलिकॉलर, ऑफिस स्टाफ पाहिजेत. संपर्क-८८०६०२०५९६, ८९०९९७६०९३

**इचलकरंजीतील** हॉटेलमध्ये मॅनेजर लेडीज/जेन्टस रिसेप्शनिस्ट, रूम बॉय, वेटर, सफाई करिता महिला, वॉचमन पाहिजेत. संपर्क-९८२३९८६०१०, ९२७२०५७४५६

**नोकरदार पुरुष** आणि विद्यार्थी मुलांसाठी सर्व सुखसोयींनी सुसज्ज आणि हवेशीर, आरोग्यपूर्ण वातावरण पार्किंग, वायफाय, लायब्ररीची सोय असलेले पी.जी. हॉस्टेल मिळेल. संपर्क-९५७९६९०११८

**शुध्द शाकाहारी** हॉटेलमध्ये चपातीसाठी व भांडी कामासाठी लेडीज पाहिजे. संपर्क-८९७५६९८४०४, ७९७२१२१६५५

**लेडिज हेल्पर** कामगार पाहिजे आहे. रुचि क्रिएशन उत्तम प्रकाश टॉकीज जवळ वेळ सकाळी १०.३० ते संध्याकाळी ७.३० रविवारी सुट्टी वय मर्यादा २० ते ४०. अधिक माहितीसाठी संपर्क ९५११११२६१६

**नामांकित टेक्सटाईल** कंपनीमध्ये फॅब्रिक डिस्पॅच विभागासाठी उमेदवार हवा आहे. कॉम्प्युटर आणि एक्सेलचे ज्ञान असणे आवश्यक आहे. संपर्क-९८२०४४९२९३

**नामांकित टेक्सटाईल** कंपनीमध्ये अकाऊंटंट हवा आहे. अनुभव असणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल. संपर्क-९४०४४०९११७

**नामांकित टेक्सटाईल** कंपनीमध्ये मार्केटिंगसाठी उमेदवार हवा आहे. इच्छुक उमेदवारांनी खालील क्रमांकावर संपर्क साधावा. ९८९०४४९२९३

**आयुर्वेदिक हॉस्पिटल मध्ये** कामासाठी गरजू मुलगा व मुलगी पाहिजे अट-शिक्षण-१२ वी, किमान टू व्हीलर चालवता येणे आवश्यकवयोमर्यादा - १८ ते ३० वर्षे तसेच स्वयंपाक व घरकामासाठी बाई पाहिजे संपर्क - ८८८८५११५२२

**लेडीज पाहिजेत.** हॉस्पिटल कामासाठी शिकाऊ/अनुभवी मुली व मावशी पाहिजेत. आकर्षक पगार, पत्ता-तीन बत्ती चौक, इचलकरंजी. मो. ९३७०८७९०५०

**अकौंटिंग, टॅली प्राईममध्ये** अनुभवी सिनिअर विवाहीत लेडीज अकौंटंट पाहिजे. अनुभव किमान ५ वर्षे. संपर्क-९३२६००८२९५

**सिक्युरिटी कंपनीमध्ये** त्वरीत जागा भरणे आहे. अकाउंट कॉम्प्युटर इंग्लिश व मराठी टायपिंग व टॅली आवश्यक. फिल्ड सुपरवायझर सुरक्षा रक्षक, पीएफ, ईएसआयसी सुविधा उपलब्ध. संपर्क-९७३९३०८४२, ७६२०८०९६४७

**दातांच्या दवाखान्यासाठी** १२ वी पास व कॉम्प्युटरचे ज्ञान असलेली फूल टाईम लेडीज रिसेप्शनिस्ट व असिस्टंट पाहिजे. तीन बत्ती, चार रस्ता चौकजवळ. संपर्क-८९९३०७३८१

**उपरणा, धोती पॉवरलूमवर** कामगार पाहिजे. आकर्षक पगार देऊ व पॉवरलूमच्या कांडी भरणेसाठी महिला कामगार पाहिजे. संपर्क-७२४९२१४६२३, कलानगर, इचलकरंजी.

**कामगार पाहिजेत.** कापड दुकानात मुली/लेडीज शिकाऊ व गरजू फूल/हाफ टाईम कामगार पाहिजेत. जनता चौकजवळ. ७७७३१९७६३४, ९८६०८७७३६९

**अकौंटिंग टेलिकॉलिंगसाठी** विवाहित महिला पगार १० ते १२ हाऊसकिपींग सुपरवायझर १२ हजार-८ तास, हेल्पर-४ पाहिजेत. संपर्क-९५०३२३३१००

**चायनिज हॉटेलमध्ये** हेल्पर पाहिजेत. पत्ता-पंचवटी टॉकीजजवळ, इचलकरंजी. फोन-९३२५०७०३३७, ७८४१०६१२८७

**बाळकृष्ण सायझिंगमध्ये** दिवाणजी पाहिजे. जागा-२, गणेश नगर, गल्ली नं.६. इचलकरंजी. भेटण्याची वेळ-स.१० ते १, दु. ३ ते ६ समक्ष भेटणे.

**इचलकरंजी येथे** मध्यवर्ती पेट्रोल पंपासाठी कामगार पाहिजेत. दु. ३ ते रा. ११ कॉलेज करणाऱ्या मुलांना सुवर्णसंधी व नाईट शिफ्टसाठी कामगार पाहिजे. फोन-८३२९०२८१४४

**अॅपे गाडीवर** डिलेव्हरीसाठी कामगार पाहिजे. गंगाधर ट्रेडर्स, ठाकरे चौक, जवाहरनगर, इचलकरंजी. फोन-७७४१०८८५४३, ९५५२१४४७४६

**शहापूर, खंजीरे इंडस्ट्रिज** इस्टेट येथील एअरजेट विविंग युनिट व ऑफिसमध्ये दिवाणजी (सायझिंग टिप्पन प्लॅनिंग अनुभवी) व लेडीज अकौंटंट स्टाफ पाहिजे. संपर्क-९३७११५५००७, वेळ- १० ते २

**अर्जंट भरणे-** दिवाणजी (PPC) डिस्पॅच टेक्स्टाईल क्षेत्रात १/२ वर्षे अनुभव. कॉम्प्युटरचे बेसिक ज्ञान आवश्यक. संपर्क-अथर्व फॅब्रेड्स, चिप्रे हॉस्पिटलसमोर, इचलकरंजी. मो. ९८३७७९३७७१

**सिलेंडर वाटपासाठी** ३/४ चाकी लायसनधारक डिलीव्हरी बॉय पाहिजेत. संपर्क-९१४५६०३००१

**डिलेवरीबॉय पाहिजे.** टू व्हीलर चालविणारा व लायसन असणारा संपर्क-तिरूपती डाटा फॉर्म्स, रूणवाल टॉवर, लायकर गल्ली, इचलकरंजी. यश टेलीकॉमजवळ.

**नाष्टा सेंटरमध्ये** पार्ट टाईम किचनसाठी हेल्पर पाहिजे. अटलबिहारी वाजपेयी चौक, इचलकरंजी. ९८८१९८२२९५

**रिटायर्ड क्लार्क हवा.** अक्षर चांगले हवे. संपर्क-९८२३४८२७३१

**पाहिजेत.** पार्वती इंडस्ट्रियल इस्टेटजवळील नामांकित कंपनीमध्ये अनुभवी महिला/पुरूष अकौंटंट कम अॅडमीन असिस्टंट पाहिजेत. अनुभव ३ ते ४ वर्षे. संपर्क-७७२००१८४०६

**अॅमेझॉन कंपनीमध्ये** पार्सल डिलीव्हरी करण्यासाठी त्वरीत मुले पाहिजेत. ड्रायव्हिंग लायसन आवश्यक. संपर्क-९०९६१०४४४२

A Fast Growing Hospital/ Laboratory Equipment Distributor requires following Professionals-1) Sales Representative-Male-02. 2) Office Co-ordinator-Female-01. Any Graduate with relerant experience or Fresher may apply. Contact-9850333396

**शिकाऊ/अनुभवी-** सीएनसी-व्हीएमसी ऑपरेटर्स, अनुभवी प्रोडक्शन/डेव्हलपमेंट, हेड, शिफ्ट सेटींग सुपरवायझर, क्वॉलिटी, लाईन इन्स्पेक्टर, अनुभवी अकौंटंट पाहिजे. टॅली प्राईमचे ज्ञान आवश्यक. संपर्क- ८०७७५७१७१.

**सिक्युरिटी गार्ड पाहिजे-** ८ तास सर्व सुविधा. लक्ष्मी इंडस्ट्रीज, कबनूर. संपर्क-९६०४६३९१०३.

**इचलकरंजी स्थित नामांकीत** कंपनीकरीता १) सुपरवायझर-पदवीधर + बेसिक कॉम्प्युटर ज्ञान, २) ऑर्डर घेण्यासाठी-पदवीधर,(महिला), बेसिक कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक. आकर्षक पगार व पीएफ+ ईएसआयसी व इतर अनेक सुविधा. संपर्क- ७७६७९०६३६३.

**पाहिजे-** अकौंटंट व इन्वेंटी कामासाठी फुलटाईम अनुभवी जेंट्स पाहिजे. संपर्क- ७५०७७१९३३१, ९०२११३४५९०. इचलकरंजी.

**पाहिजेत-** इचलकरंजी स्थित नामांकित कंपनीकरीता १) हेल्पर-(महिला व पुरूष १० वी, १२ वी पास/नापास), २) सफाई कामगार- महिला व पुरूष, ३) ड्रायव्हर लायसन्स आवश्यक. आकर्षक पगार व पीएफ+ ईएसआयसी व इथर अनेक सुविधा. संपर्क- ७७६७९०६३६३.

**ऑफिस कामासाठी** कॉम्प्युटर ज्ञान असणारी लेडीज पाहिजे. आझाद मोटार ट्रेनिंग स्कूल, इचलकरंजी. मो. ९१७५४९३३५५, ९१७४५४५००५७.

**पतसंस्थेमध्ये क्लार्क** नेमणे आहे. टॅली ईआरपी ९ येणे आवश्यक. आहे. विवाहित महिलांना प्राधान्य. संपर्क- ७४४४४५३८२, ७४४७४४४४९१.

**मेडिसर्व कंपनीमध्ये** फ्रेंच डोअर व विंडोज कामासाठी हेल्पर, वेल्डर व फिटर पाहिजेत. कोंडीबे फाटा. मो. ८६२६०७१९९६.

**बाळकृष्ण सायझिंगमध्ये** हमालीसाठी टेम्पो पाहिजे. पत्ता-गणेशनगर, ६ वी गल्ली, इचलकरंजी. संपर्क-९६०४००२७०३.

**सुरज गॅस एजन्सीमध्ये** क्लार्क व अॅपे गाडीवर डिलेव्हरी बॉय पाहिजेत. अर्जासह समक्ष भेटा- भेटणेची वेळ- ४ ते६. संपर्क-८८८८०१२१७२, ९५५२१४४६०५.

**कामगार / सेल्समन पाहिजे-** अनुभवी शिकाऊ, मॉडर्न इलेक्ट्रॉनिक्स, आवळे मैदानजवळ, इचलकरंजी. मो. ९८९०५४७०९८/-

**ड्रायव्हर पाहिजे-**अनुभवी पूर्ण वेळेकरीता लायसनसह अर्जासह भेटा- ओम मोटर्स शाहू पुतळ्याजवळ, इचलकरंजी.

**हॉटेलसाठी कामगार पाहिजेत -** हॉटेल बालाजी, बालाजी चौक, विक्रमनगर, शहापूर रोड, इचलकरंजी. मो. ८४८४०४२२००, ९०९६२७९००८.

**गारमेंट फॅक्टरीसाठी** हेल्पर मुले/ मुली पाहिजेत. सोशल मिडीया, इस्टाग्राम, फेसबुक, व्हॉट्सअॅप हॅन्डल करण्यासाठी लेडीज पाहिजे. सांगली रोड, इचलकरंजी. मो. ९८२३४२५७८५.

**वर्कशॉपमध्ये** हेल्पर पाहिजे. पत्ता-सुपर इंजिनिअरींग खंजिरे इंडस्ट्रीयल इस्टेट, शहापूर. संपर्क-९०११०१९२७७, ९९९९७२७२७०.

**दवाखान्यामध्ये कंपौंडर** कामासाठी मुले व मुली पाहिजेत. व ड्रायव्हर पाहिजे. संपर्क- डॉ. परदेशी दवाखाना, जिल्हाजी मंदिराजवळ, कोल्हापूर रोड, इचलकरंजी.

**Textile फर्ममध्ये** १) ग्रे कापड Reed Pick तपासणेसाठी १ माणूस पाहिजे. २) डिस्पॅचसाठी २ माणूस पाहिजे. संपर्क- ९४२१६१४३९१.

**टोप संभापूर,** कोल्हापूर येथे शिकाऊ अथवा अनुभवी ऑफिस अकौंटंट पाहिजे. संपर्क-७०२००९६००२, ९९६०५४९२०२

**गारमेंट फॅक्टरीमध्ये पाहिजेत.** शिलाई मशीन ऑपरेटर-६ फूल फिनिश. संपर्क-९४०३३६८९७४

**नामवंत अॅकेडमी** व स्कूलसाठी खालील पदे भरणे आहे. कौन्सीलर-१०, टेलिकॉलर-३, ऑफिसबॉय-१. पगार- १०,०००+इन्सेटिव्ह. मो. ९९२२३१४३०९

**पार्वती इस्टेट जवळील** टेक्स्टाईल मिलमध्ये एअरजेट लुमसाठी नॉटर भरती सुरू आहे. ईएसआयसी सुविधा उपलब्ध. संपर्क-९५११९९३६३५

**त्वरीत कामगार पाहिजे आहेत.** *ऑपरेटर व्हीएमसी मशिन-६ अनुभवी * क्वॉलिटी इन्स्पेक्टर-१ अनुभवी * सुपरवायझर-२ अनुभवी * एमआरसी कामदपत्रे कामे-१ अनुभवी * हेल्पर-१ अनुभवी * अकाऊंट-१ अनुभवी. पत्ता- तीन बत्ती, चार रस्ता, इचलकरंजी येथे पाहिजे आहेत. संपर्क-७९३७५१११७७, ७२७७१७७७१११

**मुले/मुली कामगार पाहिजे.** आकर्षक पगार. संपर्क-संतसाई फूटवेअर, गांधी पुतळ्याजवळ, इचलकरंजी. फोन-१०२११०२१३८

**इलक्ट्रीशियन भरती सुरू-** एका नामांकित कंपनीमध्ये इलेक्ट्रीशियन पाहिजेत. संपर्क-९९२१६०४०७८

**सांगली नाक्याजवळ** कंपनीमध्ये शिलाई, ओव्हरलॉक, पॅकिंग व इतर कामासाठी महिला कामगार पाहिजे. संपर्क-८६२४०४०९६०, ७७४५०३३८८

**वर्कशॉप व साईडवरच्या** कामाकरिता अनुभवी आयटीआय वेल्डर, ऑर्गन वेल्डर त्वरीत पाहिजेत. संपर्क-९३७०२६४२५२

**इलेक्ट्रीक बाईक शोरूममध्ये** कामासाठी अनुभवी/शिकाऊ मेकॅनिक पाहिजे. पत्ता-सांगली रोड, बजाज शोरूमसमोर, इचलकरंजी. ८८८८५११५२२

**व्हीएमसी मशिनवर** शिकाऊ/ अनुभवी ऑपरेटर पाहिजेत व जनरल कामासाठी लेडीज व हेल्पर पाहिजे. संपर्क-आसरानगर, गणपती मंदिरशेजारी, सांगली नाका, इचलकरंजी. फोन-९१३९९३४३१५

**नंबर प्लेस** बसविण्यासाठी फूल टाईम कामगार (मुलगा) पाहिजे. न्यू बालाजी मोटर्स, हॉटेल सोनालीजवळ, इचलकरंजी. ९१९५६७९९९१

**पीयुसी करीता** फूल टाईम कामगार (मुलगा) पाहिजे. संपर्क-श्री बालाजी ड्रायव्हिंग स्कूल, इचलकरंजी. मो. ९५९५६०९९११

**चार चाकी गाडी शिकविण्यासाठी** १२ वी शिक्षण झालेला ड्रायव्हर पाहिजे. संपर्क-श्री बालाजी ड्रायव्हिंग स्कूल, हॉटेल स्टेटस इनशेजारी, इचलकरंजी. मो. ८९८००३२००५

**पार्वती इस्टेट जवळील** टेक्स्टाईल मिलमध्ये एअरजेट लूम व्हीवर-१०, बँक साइझर-०५, हेल्पर-०६, प्रोसेस हेल्पर-०४, महिला कामगार-०४, इएसआयसी सुविधा उपलब्ध. संपर्क-९५११९९३६३५

**टर्नर पाहिजे.** लेथ मशिनवर प्रोडक्शन कामाकरिता स्किल्ड किंवा सेमी स्किल्ड टर्नर पाहिजे. संपर्क-९९८५०१९८२०

**नामांकित शिक्षण संस्थेसाठी** अनुभवी तज्ञ शिक्षक नेमणे आहेत. गणित-२ जागा, इंग्रजी-२ जागा. (MA./M.Sc/B.A./ B.Sc, B.Ed) संपर्क-८४२१६२२३१४, ८७६६७७६०६३

उर्वरित छो.जा. पान ७ वर

## वाचकांसाठी निवेदन

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी-विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे-घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहीरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै. महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**

✻ पान ६ वरून ✻

**होलसेल कॉस्मेटिक दुकानात** पूर्ण वेळ १० वी/१२ वी झालेली मुले पाहिजेत. हिरा इन्टरप्राईजेस, गांधी कॅम्प, सोनटक्के खानावळ शेजारी, इचलकरंजी.

**वाईन शॉपमध्ये** हुशार व अनुभवी मुलगा पाहिजे. वयाची अट-२१ ते ३५. संपर्क-७०२०१८२४२७

**पाहिजेत.** अनुभवी/शिकाऊ फिटर-४, अनुभवी/शिकाऊ टर्नर-४, हेल्पर-२, समर्थ इंजिनिअरींग, अलायन्स हॉस्पिटल, सुरज गॅस गोडाऊनजवळ, योगायोगनगर, गल्ली नं.२, चंदूर रोड, इचलकरंजी. फोन-७७०९१२०५२५, ९८२३१६४५५०

**दुकानात कामासाठी** कामगार पाहिजे. सुर्यवंशी कार ॲक्सेसरीज विरशैव बँकेजवळ, राजाराम रोड, बीजेपी ऑफिसजवळ, इचलकरंजी. ७७६९८३८७०९

**धोती पेढीवर** अंगावरती घडी कामासाठी कामगार पाहिजेत. संपर्क-७२७६७९७१७१

**टर्नर, फिटर** व हेल्पर पाहिजेत. प्रभा इंजिनिअरींग वर्क्स, हत्ती चौक, इचलकरंजी. फोन-९९२११९२९२२, ९८२२९०७८४१

**कामगार पाहिजेत.** सीएनसी सेटर, व CNC/VMC ऑपरेटर पाहिजेत. तसेच टर्नर, ड्रिलर पाहिजेत. पत्ता-धैर्यशिल इंडस्ट्रिज, व्यंकटेश कॉलनी पाठीमागे, एन.पी. चौक, जवाहरनगर, इचलकरंजी. ७८७५७०५४००

**सिक्युरीटी पाहिजे.** पगार १००००-१३५००/ड्युटी-८ तास, इचलकरंजी. कागल एमआयडीसी शिरोली, एमआयडीसी व कोल्हापूरसाठी. मो. ७४४७४०१८६२/७४४७४०१८६४/७४४७४०१८६५

**मेडिसर्व कंपनीमध्ये** हॉस्पिटल इक्वीपमेंट कामासाठी हेल्पर, वेल्डर, फिटर पाहिजेत. कोंडीग्रे फाटा. ८६२६०५७९५६

**एका नामांकित शिक्षण** संस्थेसाठी १ शिपाई, ३ टेलिकॉलर्स, १ मार्केटिंग पर्सन (PRO) नेमणे आहेत. संपर्क-९७३०५७५११२

**ओरॅकल हॉस्पिटल** येथे अनुभवी ANM/GNM Staff Day/Night साठी त्वरीत पाहिजे. Receptionit अनुभवी पाहिजे. मावशी डे/नाईटसाठी अनुभवी त्वरीत पाहिजे. संपर्क-ओरॅकल हॉस्पिटल, पाटील मळा, इचलकरंजी. मो. ८३०८४४१५०७

**पाहिजे.** डेव्हलपमेंट कामासाठी हुशार व अनुभवी टर्नर व रॅम मिलींग ऑपरेटर पाहिजे. संपर्क-८०५५१४७४६१

**लेडीज क्लार्क पाहिजे.** शिकावू/अनुभवी. श्री सत्यसाई नागरी सहकारी पतसंस्था मर्या. इचलकरंजी, पत्ता-बंडगर माळ, इचलकरंजी. भेटण्याची वेळ-सकाळी ११ ते १२.

**पाहिजेत.** सीएनसी ऑपरेटर, स्किल्ड टर्नर व वेल्डर पाहिजेत. संपर्क-८८८८९९७७०५, ९२२५८०६१६४

**अर्जंट भरती-** लक्ष्मी इंडस्ट्रिज इस्टेटमधील नामांकित यार्न प्रोसेसमध्ये, वायडिंग सुपरवायझर, ऑटोकोनर इलेक्ट्रीकल व मेंटनन्स (टेक्नीकल) लॅब असिस्टंट BSc/MSc मुलांना प्राधान्य. रिझ्युम व्हॉटस ॲप-८९९९२९७६४७, ७३८५८५२७६०

**साडी शोरूममध्ये** अनुभवी व शिकावू मुले/मुली कामगार पाहिजेत. सखी, शाहू कॉर्नर, इचलकरंजी. ९४२१०३७८८८

**नामवंत कंपनीमध्ये** अकौटंट, स्टोअर किपर, सेल्समन, कॉलींगसाठी लेडीज व मुले पाहिजेत. स्टेशन रोड, ओल्ड बॉम्बे आईस्क्रीमजवळ, इचलकरंजी.९७७१७३७९५५.

**हॉटेलमध्ये अनुभवी** तंदुर असिस्टंट पाहिजे. संपर्क-९५९५६०४७४७

**हेल्पर, फिटर, वेल्डर पाहिजे.** (शिकावू चालतील) संपर्क-अनिकेत सर्व्हिसेस. पत्ता- शाहूनगर, गल्ली नं.१, चंदूर. मो. ९७६२८०४९५६, ९८९०२०५९५८.

**पाहिजेत.** शिटमेटल मेस्त्री/ऑरगॉन/$CO_2$ वेल्डर/हेल्पर/पाऊडर कोटींगसाठी कोटर विशाल इंडस्ट्रिज, खोतवाडी. मो. ९१४६७६९६५६, ८९९९५००७७३

**अकौटींगसाठी** लेडीज टॅली ऑपरेटर पाहिजेत. प्रभाकर इंडस्ट्रिज, भोने माळ, इचलकरंजी. फोन-९३२५८२२२८८.

**सिक्युरीटी गार्डस् पाहिजेत.** इचलकरंजी, नांदणी, पार्वती इंडस्ट्रिज, जयसिंगपूरकरिता ड्युटी-८ व १२ तास. आकर्षक पगार, ९७०२४२४७७२, ९५२९५४५४६८

**प्रिटींग पॅकेजींग** इंडस्ट्रिजमध्ये हेल्पर व ऑपरेटर पाहिजेत. वेदांत पॅक, भोने माळ, इचलकरंजी. फोन-९३२५८२२२८८

**शिकाऊ व अनुभवी** वेल्डर व हेल्पर मुले स्टेनलेस स्टील रिलींग कामासाठी पाहिजेत. वेळ-९ ते ६. इएसआय व पीएफ फॅसिलीटी आहेत. पत्ता- समर्थ इंडस्ट्रिज, टाकवडे. मो. ९३७१५९५६६६

**टेक्स्टाईल ऑफिसमध्ये** हेल्पर कम ऑफिसबॉय अनुभवी ड्रायव्हर पाहिजे. अर्जासह समक्ष भेटा. किस्मत टेक्स्टाईल, आदर्श मंगल कार्यालयशेजारी, शाहू पुतळ्याजवळ, इचलकरंजी.

**लेडीज ब्लाऊज** व ड्रेस शिलाईकरीता लेडीज कामगार पाहिजे. भक्ती लेडीज टेलर, जनता बँकेजवळ, तारा हॉटेल रोड, इचलकरंजी. फोन-९६३७९२७४३३

**पाहिजेत.** कॉम्प्युटर ऑपरेटर, शिकाऊ वायरमन व शोरूमसाठी लेडीज/जेंटस पाहिजेत. संपर्क-प्रकाश लाईट हाऊस. मो. ७५८८३३९६३१, ९४२३०४११५०.

**पाहिजे.** शेती कामातील अनुभव असलेला दिवाणजी पाहिजे. बीएसस्सी ॲग्री किंवा डिप्लोमा यांना प्राधान्य. संपर्क-९८८१४९१५८२

**हुशार व अनुभवी** टर्नर पाहिजेत. संपर्क-एएससी कॉलेजसमोर, इचलकरंजी. फोन-९९७५०५०३५७

**अनुभवी कामगार पाहिजेत.** १) इंजिनिअर, १ टर्नर, ४ हेल्पर, CNC व VMC ऑपरेटर, योग्य पगार मिळेल. संपर्क-स्वाती एंटरप्राईजेस, एएससी कॉलेजजवळ, इचलकरंजी. फोन-९६०४८२४२०४

**प्रिटींग दुकानात** कामासाठी शिकाऊ/अनुभवी कॉम्प्युटर येणारी मुलगी (अविवाहीत) पाहिजे. संपर्क-९८९०८६१९२९ (व्यंकटेश)

**इचलकरंजी येथे** परमिट रूम, बियरबारसाठी अनुभवी वेटर पाहिजे. संपर्क-८८३०९८३४०१

**रंगाच्या दुकानात** अनुभवी व शिकाऊ कामगार पाहिजे. श्री बालाजी पेंटस, काँग्रेस कमिटीजवळ, इचलकरंजी. फोन-८८८८०४४३३०

**व्हीएमसी ऑपरेटर-** टर्नर व हेल्पर, लेडीज/जेंटस पाहिजेत. फक्त डे शिफ्ट, ईएसआयसी लागू, आकर्षक पगार. संपर्क-९३२२५९०४०७-कोरोची.

**ड्रायव्हर पाहिजे.** अनुभवी व निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे. अर्ज व लायसन्ससहीत भेटा. फोन-९५९५८४५७७४

**हॉस्पिटलमध्ये** नाईट ड्युटीसाठी सिस्टर किंवा ब्रदर आणि मावशी पाहिजे. संपर्क- ९४२२०५०३३३.

**गारमेंट कामाकरीता** लेडीज ऑपरेटर व हेल्पर मुले पाहिजेत. ऑफिस कामाकरीता ज्युनियर अकौंटंट (लेडीज) पाहिजे. दत्तनगर, भाटले मळा, इचलकरंजी. मो. ९५७९९९९७३९.

**अनुभवी टर्नर व फिटर** पाहिजेत. संपर्क- एकलव्य टेक्नो सोल्युशन, तारदाळ नाका, शहापूर. मो. ८५३०४३६२३५.

**ऑफीसमधील** कामाकरिता असिस्टंट पाहिजे (पुरुष) पात्रता ग्रॅज्युएट कॉम्प्युटरचे नॉलेज आवश्यक, कन्नड भाषा येत असल्यास प्राधान्य. रिजुम व्हॉटस् करा. मो. ९७६५०५७३५३, श्रीम इंडस्ट्रिज, शहापूर, इचलकरंजी.

**स्पंदन हॉस्पिटलमध्ये** आणि मेडिकल मध्ये कामासाठी गरजू मुले पाहिजेत. वखार भाग, इचलकरंजी. संपर्क - ८७८८१९३३६०, पगार ४०००/-, वेळ १० ते ४ पर्यंत.

**टॅली सॉफ्टवेअर** टॅली अकौंटींगच्या कामासाठी मनुष्यबळ आवश्यक आहे. पुरूष किंवा महिला उमेदवार अर्ज करू शकतात. संपर्क- डि.बी. छाबडा, मेन रोड, इचलकरंजी. ९०२१४३३३६६, ७०५७५१५१४७.

**धान्य डिलेव्हरीच्या गाडीवर** दिवाणजी काम करण्यासाठी मनुष्यबळाची आवश्यकता आहे. संपर्क- डी.बी. छाबडा मेन रोड, इचलकरंजी. ९०२१४३३३६६, ७०५७५१५१४७.

**धान्य गोडाऊनमध्ये** दिवाणजी काम करण्यासाठी मनुष्यबळाची आवश्यकता आहे. संपर्क- डी.बी. छाबडा मेन रोड, इचलकरंजी. ९०२१४३३३६६, ७०५७५१५१४७.

**कोरल ड्रॉ, फोटो शॉप** अनुभवी/शिकाऊ तसेच १२ वी पास ऑफिस कामासाठी मुले पाहिजेत. संपर्क-प्रिंट ओ- ९४२३८६०६४४.

**गारमेंटसाठी** शिकाऊ/अनुभवी महिला पाहिजेत. आकर्षक पगार. संपर्क-उल्हास गारमेंट, मुरदंडे मळा, गल्ली नं.२, इचलकरंजी. ७०२०४६९१४९, ९२८४३३९१६०

**अनुभवी CNC,VMC,HML** ऑपरेटर, सुपरवायझर, प्रोग्रॅमर, इन्स्पेक्टर पाहिजे. स्वस्तिक इंजिनिअर्स, यड्राव. ८६६८६१०८६०, ९४२३९७७३९८

**हार्डक्रोम प्लेटिंगसाठी** कामगार पाहिजेत. लेडीज/जेन्टस. संपर्क-९८५०६२०९३८, ९८३४४९४०५९

**REQUIRED-** 1) Sales Person. 2) Account Assistant. 3) Hardware Networking Engineer. 4) CCTV Engineer. Contact-9922123499

**पाहिजेत.** १) आयटीआय/डिप्लोमा इलेक्ट्रीशियन इंडस्ट्रियल वायरिंग व पॅनल कामाचा अनुभव. २) ऑफिस कामासाठी सीसीटीव्ही सर्व्हीसेस व इतर कामासाठी मुलगा/मुलगी पाहिजे. ३) हुशार व अनुभवी वेल्डर पाहिजे. संपर्क-मेट्रो इंडस्ट्रिज, पार्वती इंड. इस्टेट, यड्राव. पोस्ट ऑफिसजवळ. फोन-७८८८००६४०६

**सीएनसी ऑपरेटर पाहिजेत.** आकर्षक पगार+ईएसआयसी सुविधा. संपर्क-पार्वती इंडस्ट्रियल इस्टेट, यड्राव. फोन-९९७०५७८१०८, ९८८१२३१०८५

**होलसेल औषध दुकानासाठी** १० वी/ १२ वी उत्तीर्ण तथा अकाऊंटसाठी मुल-मुली आवश्यक. पत्ता- सुशिल फार्मा एलएलपी नाईट कॉलेजजवळ, इचलकरंजी. मो. ९०९६२६१२७२.

## पंधराशे लाच स्विकारताना लिपिक ताब्यात

**सातारा,ता.६**

**विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचा लिपिक प्रदीप सर्जेराव सावंत १५०० रुपयाची लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले.**

शासनाच्या वैयक्तिक परतावा योजनेच्या अंतर्गत वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाच्या योजनेच्या लाभाकरिता शेळी पालन व्यवसायासाठी कर्ज मिळणे कामी केलेला अर्ज मंजूर करण्यासाठी महामंडळाचे मानधन लिपिक प्रदीप सर्जेराव सावंत यास दीड हजार रुपयाची पंचायत समक्ष लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले.

सातारा जिल्ह्यातील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने ही कारवाई केली.

# भुदरगड तालुक्यात भात कापणी-मळणीला वेग

## बळीराजा कामात व्यस्त; मळणीसाठी असलेली खळी झाली कालबाह्य

■ गारगोटी,ता.६(प्रतिनिधी)–

**भुदरगड तालुक्यात गेल्या चार दिवसापासून पाऊस थांबला आहे, त्यामुळे तालुक्यात भाताची कापणी, झोडणी आणि मळणीच्या कामाची धांदल उडाली आहे.बळीराजा आणि त्याचे सारे कुटूंबच शिवारात मळणीत गुंतले आहे.**

भुदरगडसह आसपासच्या भागात किंबहुना कोल्हापूर जिल्ह्यात मे महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात पावसाने सुरुवात केली होती, त्यानंतर जून महिन्यापासून मान्सून सुरु झाला. सप्टेंबरनंतर ऑक्टोबर महिन्यात सुद्धा अवकाळी पावसाने कहर केला. गणपती, दसरा आणि दिवाळी सणात सुद्धा पावसाने हजेरी लावली. त्यामुळे खरीप पिकांची काढणी, मळणी खोळंबली होती. भुदरगड तालुक्यातील मुख्य पीक म्हणजे भात आहे. धरणामुळे बरीचशी शेती पाण्याखाली आली आहे, त्यामुळे उसाचे पीक वाढले असले तरी या तालुक्यात व परिसरात मोठ्या प्रमाणात भात पीक घेतले जाते, त्या खालोखाल भुईमूग, मिरची, सोयाबीन, कडधान्ये ही पिके घेतली जातात.



भुदरगड तालुक्यात रस्त्यावरच सुरु असलेल्या एका भाताच्या मळणीचे दृश्य

भुदरगड तालुक्यात आता पाऊस थांबला असून दिवसभर उन्हाचा चटका जाणवत आहे. आणि हे वातावरण काढणीसाठी मळणी पोषक आहे.आणि संधी साधून शेतकऱ्यांनी भात पिकाची काढणी आणि मळणी सुरु केली आहे.सारे कुटुंबच या मळणीच्या कामात गुंतले आहे. गावात दिसणारे शेतकरी व त्यांचे कुटूंब सध्या दिवसभर शिवारात दिसत आहे.

**मळणीमुळे गारगोटी आठवडा बाजारात गर्दी कमी**

भुदरगड सह कागल, राधानगरी तालुक्यात सुद्धा शेतकरी व त्याचे कुटूंब भात पिकाच्या मळणीच्या कामात गुंतले आहे. त्यातच शेतात काम करण्यासाठी मजूर मिळत नसल्याने शेतकऱ्याचे कुटूंब, भावकी, नातेवाईक, पै-पाहुणे, मित्र यांच्यामार्फत भाताची काढणी आणि मळणी सुरु आहे. ही सारी मंडळी मळणीत गुंतल्याने गारगोटीच्या बुधवार आठवडी बाजारात नेहमीसारखी गर्दी नव्हती. या बाजारात शेतकरी आपल्या शेतातील भाजीपाला, कडधान्ये विक्रीसाठी आणतो, शिवाय काही शेतकरी बाजारातील इतर वस्तू खरेदीसाठी सुद्धा येतो. पण मळणीत गुंतला असल्याने तो बाजारासाठी आलाच नाही. त्यामुळे बाजारात नेहमीसारखी गर्दी नव्हती.

**खळ्यावरची मळणी आता कालबाह्य ठरतेय**

पारंपारीक पध्दतीने भात मळणीची पध्दत दिसेनासी झाली. पुर्वी गावाबाहेर माळावरच्या मोकळ्या जागेत समतल जागा तयार करून गोलाकार खळी तयार केली जायची. ती गाय किंवा बैलांच्या शेणाने सारवली जायची.मध्यभागी लाकडाचा एक खांब असायचा. त्या खांबाला तिवडा म्हंटले जायचे. दिवसभर काढलेल्या भाताच्या काडयांची खळ्याच्या कडेला होळी रचायची. पहाटेच्या मंद चांदण्यांच्या प्रकाशात काढलेल्या भाताची मळणी टाकायची. स्वतःची आणि पैरेकऱ्याची असणारी देशी गाई, म्हैशी, बैल यांची तिवड्याला दावन बांधली जायची.आणि या जनावरांना तिवढ्या भोवती फिरवुन भाताची मळणी काढली जायची. परंतू मनूष्यबळाऐवजी भात मळणीसाठी यंत्राची धडधड सुरू झाली. आणि गावगाड्यातील खळ्यावरील मळणी कालबाह्य झाली. भात पिकाचे क्षेत्र कमी झाल्याने आता डांबरी रस्त्यावरच आता मळणी सुरु झाली.

# कोडोली पोलीस स्टेशन हद्दीत सावकारकी जोमात

■ बोरपाडळे,ता.६(प्रतिनिधी)

**कोडोली पोलीस स्टेशनच्या हद्दीत सध्या सावकारकी जोमात असून टक्केवारीचे वाढते प्रकार दिसूनही पोलीस यंत्रणा ढिम्म असल्याने कर्ज काढणारे गरजू अधिक संकटाच्या गर्तेत सापडले आहेत.**

**पोलिसांच्या दुर्लक्षामुळे सावकारांचे फावले; सर्वसामान्य मेटाकुटीस**

सहजासहजी कर्ज मिळत असल्याने आणि कागदपत्रांच्या जाचक अटीपासून मुक्तता मिळण्यासाठी सावकारकीच्या गर्तेत सापडतात. नेमका याचाच फायदा या परिसरातील सावकार घेत आहेत. याबाबत पोलिसांना छेडले असता त्यांनी पोलीस ठाण्यात अजून तक्रार नसल्याचे सांगितले असले तरी या गोरखधंद्यात असणाऱ्यांची नावे माहित नसण्याइतकी ढिम्म यंत्रणा नक्कीच नाही.गोपनीय विभाग सक्रीय झाला तर सावकारकीची पाळेमुळे नक्कीच शोधता येतील मात्र, सध्या यंत्रणा ढिम्म असल्याचे सर्वसामान्य नागरिकांचे म्हणणे आहे. काही सावकारांना राजकीय वरदहस्त आहे तर मुरब्बी सावकारांना पोलीसांचे अभय आहे हे आता सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे .सावकारकी मुद्दलच्या दहापटीने व्याज वसूल करून पुन्हा पैसे वसूल करण्याचा घाट घालतात. काखे, आणि कोडोली येथील दोन सावकारांवर गुन्हा दाखल झाला असला तरी ही दोन अपवादात्मक उदाहरणे आहेत.या गोष्टीला अनेक महिन्यांचा कालावधी लोटला आहे. त्यानंतर पुन्हा खाजगी सावकारकीचे पेव फुटले आहे. याकडे मात्र, जाणिवपूर्वक दुर्लक्ष होत आहे. मुलांचे लग्न, आजारपण, शिक्षण यासाठी सर्वसामान्य नागरिकांची पावले सावकारकीकडे वळत आहेत.महिन्याला दहा टक्के व्याज यासाठी सर्रास आकारला जातो.कर्ज फेडताना सर्वसामान्य मेटाकुटीस येत आहे . एखादा हप्ता थकला तर पाळलेले गुंड धमकी देवून आर्थिक लूट करीत आहेत. प्रसंगी मारहाणही होत आहे.कर्जासाठी कोरा चेक आणि पाचशे रुपयांचा स्टॅम्पपेपर वापरला जात आहे.काही जणांचा सातबाराही घेतल्याचे खात्रीलायक माहिती आहे .इतके सर्व प्रकार असूनही कोडोली पोलीसांचे कानावर हात आहेत . तक्रार नाही म्हणजे सर्व काही आलबेल असे पोलीस अधिक्षकांना किंबहुना जिल्हा पोलीसप्रमुखांना वाटेल मात्र, सावकारकीची धग आणि त्यात उद्ध्वस्त होत असणारी कुटूंबे याचा शोध न घेतल्यास भविष्यात याच कोडोली पोलीस स्टेशनच्या हद्दीत सावकारकीच्या जाचाला कंटाळून आत्महत्या वाढल्यास नवल असणार नाही. हे ठोकळेबाज उत्तर ऐकण्यापेक्षा तक्रार नसतानाही बेकायदेशीर लूट करणारे सावकार शोधल्यास पर्यायाने त्यांच्यावर कारवाई केल्यास सर्वसामान्य नागरिक दुवा देतील अन्यथा ये रे माझ्या मागल्या.. वृत्तीने पोलीसांच्या कार्य पद्धतीवरच सर्वसामान्यांकडून शंका घेतली जाईल याकडे वरिष्ठांनी लक्ष देणे गरजेचे आहे.

# कापशी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे नवीन बांधकाम करावे



सेनापती कापशी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत.

## ॲड.दयानंद पाटील यांची जि.प. मुख्य अधिकाऱ्यांकडे मागणी

■ से.कापशी,ता.६(वार्ताहर)–

**प्राथमिक आरोग्य केंद्र सेनापती कापशी इमारत बांधकाम बाबत तात्काळ सर्व्हे करून जीर्ण इमारतीचे निर्लेखन होऊन अंदाजपत्रकीय रकमेसह अर्थसंकल्पीय तरतूद करून अत्याधुनिक सुविधासह आरोग्य केंद्राचे नवीन इमारत बांधकाम करण्याची मागणी तालुका काँग्रेसचे अध्यक्ष ॲड.दयानंद नानासाहेब पाटील (सरपंच परिषद जिल्हा समन्वयक) परिसरातील सरपंच यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.**

निवेदनाच्या प्रती पालकमंत्री तथा आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांना दिल्या आहेत.निवेदनात पुढे म्हटले आहे की,कागल तालुक्यातील चिकोत्रा खोऱ्यामधील २५ डोंगराळ गावे, खेडी, वाड्यातील नागरिकांच्या आरोग्यासाठी कापशी येथे गेली पंचवीस वर्षापूर्वी प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम झाले आहे. या ठिकाणी दररोज शंभर ते दीडशे बाह्य रुग्णांची तपासणी व औषध उपचार घेत आहेत. या ठिकाणच्या प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत जुनी असल्यामुळे अत्यंत जीर्ण व निकामी झाली आहे.या इमारती खोल्या ढासळलेले असून कोणत्याही निवासी सुविधा उपलब्ध नाहीत.त्यामुळे रात्रीच्या वेळी तसेच साथ,रोग, डिलिव्हरी तसेच आपत्कालीन परिस्थितीमध्ये या ठिकाणी वेळीच उपचार होऊ शकत नसल्यामुळे अनेक वेळा रुग्ण दगावले आहेत.प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये विविध लसी,औषधे, गोळ्या यांचा अपुरा पुरवठा होत असून रुग्णांची हेळसांड होते आहे. दवाखान्यातील अपुरा स्टाफ भरण्याबद्दल गेली अनेक वर्ष वृत्तपत्राच्या माध्यमातून लक्ष वेधले आहे. याबाबत विविध संघटना,पक्ष कार्यकर्ते यांनी यापूर्वी प्रशासन,लोकप्रतिनिधी यांचे चर्चा, निवेदन, आंदोलने इत्यादी मार्गाने लक्ष वेधले आहे.तथापि याबाबत आज पर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नाही. यावेळी कृष्णात बुरटे , गीतांजली पाटील (सरचिटणीस), सुनील कोले, दिगंबर शेळके अबोली कांबळे (सरपंच काळामा बेलेवाडी) सुभाष गडकरी (सरपंच, हसुर खुर्द) इत्यादी उपस्थित होते.

## रायगडात ४१५६ दुबार मतदार आढळले

**रायगड,ता.६–**

राज्यातील नगरपरिषद व नगरपंचायतींच्या निवडणुकांचे बिगुल वाजताच रायगड जिल्ह्यातील निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. जिल्ह्यातील दहा नगरपरिषदांमधील मतदार याद्यांची छाननी करताना तब्बल ४ हजार १५६ दुबार मतदार आढळून आले आहेत. या मतदारांवर निवडणूक विभागाची करडी नजर राहणार असून, मतदान प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी विशेष उपाययोजना आखण्यात आल्या आहेत, अशी माहिती रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली.राज्यात जाहीर झालेल्या नगरपरिषद निवडणुकानंतर रायगड जिल्ह्यात एकूण २ लाख ३७ हजार ५०३ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

## जाहीर नोटीस

मौजे कोरोची येथील गट नंबर ४५२/अ पैकी प्लॉट नंबर २६ पैकी उत्तरबाजुचे क्षेत्र ९२-९३ चौरस मीटरची खुली प्लॉट जागा मिळकत यासी चतुः सिमा पुर्वेस- प्लॉट नंबर २७ ची मिळकत, पश्चिमेस-२० फुट रस्ता, दक्षिणेस-माधुरी रूकडीकर यांची मिळकत, उत्तरेस-ओपन स्पेस सदरची मिळकत ही रत्नप्रभा विजय सुतार रा.इचलकरंजी यांचे कब्जेमालकीची असून त्यांनी सदर मिळकतीची संचकार पावती आमचे अशिलांकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना सदर मिळकतीची संचकार पावती करून दिलेली आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा हक्क, दावा, पोटगी, बोजा कोर्ट केस इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी.म्हणून दिली नोटीस सही.

ता.०६/११/२०२५

**ॲड.शिवकुमार सुखदेव लकडे**
**३/१५३, देवमोरे वाडा, टाकवडे वेस, राणाप्रताप चौक, इचलकरंजी.**
**मो. ९८८१०१४७२५.**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

मिळकतीचे वर्णनः- मौजे कोरोची येथील गट नं ६१८ मधील गुंठेवारी बिगर शेती झालेला भूखंड नंबर अ, ब, क, ड मिळकतीचे क्षेत्र १२७-७८ चौ.मी. खुली जागा व त्यावर असलेली आर सी सी इमारत तिच्या ग्रामपंचायत मिळकत नंबर ४५१० ची मिळकत यासी चतुः सिमा पूर्व-पाटील यांची मिळकत, पश्चिम-रियाज नदाफ यांची मिळकत, दक्षिण-चौगुले यांची मिळकत, उत्तर- २० फुटाचा रस्ता, सदरची मिळकत ही सौ. शशिकला चंद्रकांत चौगुले व चंद्रकांत जंबू चौगुले यांच्या समाईक मालकीची असून त्यांनी सदरची मिळकत ही आमच्या पार्टीस करारपत्राने लिहून दिलेली असून त्यापोटी संचकार ही स्विकारलेला आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणाचा काहीही हक्क, हित संबंध,दावा तारण इत्यादी काही असलेस ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ०७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर लेखी तक्रारी नोंदवावी.म्हणून दिली नोटीस.

दि.०७/११/२०२५

**विश्वनाथ कृष्णा घाटगे**
**(स्टॅम्प रायटर)**
**१०/५६३, विक्रम नगर इचलकरंजी**
**मो. ९८२३४५८५८५**

## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नं ३०४ पैकी प्लॉट नं.६१ व ६२ चे क्षेत्र १८५.८६ चौ. मीटर ची खुली जागा मिळकत सर्व यासी चतुः सिमा पुर्वेस-श्री.पार्वती कुंभार यांची मिळकत, पश्चिमेस- रमेजा तांबोळी यांची मिळकत, दक्षिणेस-१५ फुट रुंदीचा रस्ता, उत्तरेस- श्री. हाजरा मुल्ला व आदम बाणदार यांची मिळकत सदर मिळकत ही श्री. अकबर आप्पासो मुल्ला रा. संकेश्वर यांचे कब्जे मालकीची मिळकत असून त्यांनी सदर मिळकतीचे संचकारपत्र आमचे अशिलांचे कडून संचकार रक्कम स्वीकारून करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही.

ता. ०६/११/२०२५

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**
**रा.आसरा नगर, बस स्टॉपजवळ सांगली रोड, इचलकरंजी**
**मो.नं. ९४२०७७६४८६**

## जाहीर नोटीस

१) मिळकतीचे वर्णन-जिल्हा - कोल्हापूर, ता. शिरोळ पैकी मौजे यड्राव येथील गट नं.४२ एकुण क्षेत्र हे. ३-१८ आर, आकार रू.३-१९ पैसे या पुरे गट नंबर पैकी क्षेत्र हे. ०-१४.८१ आर, आकार रू.०-१५ पैसे ची संपूर्ण शेत जमीन मिळकत.यासी चतुःसिमा पुर्वेस- श्री. दातार यांची मिळकत,पश्चिमेस-श्री.पिंजारे यांची मिळकत व २० फुट रुंदीचा रस्ता, दक्षिणेस-काकडे यांची घर मिळकत व पूर्वेस दातार यांचे हद्दीलगत दक्षिण बाजूस सोडलेला २० फुट रुंदीचा रस्ता व उत्तरेस-श्री. संजय मारूती घोरपडे यांची मिळकत. येणेप्रमाणे चतुः सिमेतील शेतजमीन,तदंगभूत वस्तुसह व इजमेंटच्या हक्कासह मिळकत.

२) वर कलम १ मध्ये नमुद केलेली मिळकत ही राजाराम दत्तात्रय तोडकर, श्री. विठ्ठल दत्तात्रय तोडकर व इतर रा. तांबे माळ, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यांच्या मालकीची मिळकत असून सदर मिळकतीवर दि इचलकरंजी मर्चंटस् को. ऑप बँक लि इचलकरंजी यांचे कर्ज बोजा असून, याव्यतिरीक्त सदरची मिळकत ही निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा वरील मिळकत मालकांनी आमचे अशिलांना दिलेने वर वर्णन केलेली मिळकत आमचे अशिलांनी खरेदी घेण्याचे ठरवून तसे खरेदीचे संचकारपत्र केलेले असून सदर मिळकतीच्या खरेदी व्यवहारापोटी संचकार रक्कम अदा केलेली आहे.

३) सबब वर कलम १ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीबाबत कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा तारणगहाण दान, बोजा, कर्ज, आरक्षण, नोंद बोजा, जप्ती आदेश, मनाई आदेश तसेच वारसा, वाटणी व इतर कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असलेस सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसाचे आत खालील नमुद पत्त्यावर आपले लेखी कागदपत्रासह मुदतीत कळवावे. मुदतीत तक्रार वा हरकत न आलेस आमचे अशिल वर नमुद मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मग नंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस सही ता.०६/११/२०२५

**ॲड.जी.एम.साळोखे**
**यड्राव,ता.शिरोळ, जि. कोल्हापूर.**
**मो.नं.९८५०५०१२९२**



राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांसह मार्गदर्शक शिक्षक.

## साई इंग्लिश स्कूलचे राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेत यश

इचलकरंजी,ता.६-

**रंगोत्सव कला विभाग, मुंबई यांनी आयोजित केलेल्या राज्यस्तरीय रंगोत्सव चित्रकला स्पर्धेत श्री साई शिक्षण संस्थेच्या साई इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उत्तुंग असे यश मिळवले.**

जैन शिकलगार (इयत्ता २ री) याने राज्यात प्रथम क्रमांक मिळविला. तर रोशनी शेख हिने विशेष पारितोषिक मिळविले. यामध्ये एकूण २२ विद्यार्थ्यांनी गोल्ड मेडल, १७ विद्यार्थ्यांनी सिल्वर मेडल तर १२ विद्यार्थ्यांनी ब्राँझ मेडल प्राप्त केले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांची आंतरराष्ट्रीय रंगोत्सव स्पर्धेसाठी निवड झाली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना कला शिक्षिका सौ.अरुणा म्हेत्रे व सौ.विजयालक्ष्मी खराडे यांचे मार्गदर्शन मिळाले तर प्रशालेचे मुख्याध्यापक आर.एन.आळतेकर व मिलिंद कांबळे यांचे प्रोत्साहन मिळाले.

## संत गजानन महाराज मंदिरात कार्तिक दीपोत्सव संपन्न

इचलकरंजी,ता.६-

**लोक भावनेतून साकारलेल्या ब्रह्मचरणी मंदाताई नवरे यांच्या संत गजानन महाराज मंदिरात संध्याकाळी सहा वाजता भक्त परिवाराच्यावतीने नामस्मरण, भजन, संध्याकाळी सात वाजता सर्व महिलांच्या हस्ते दीपोत्सव साजरा करण्यात आला.**

लावलेल्या दिव्यामध्ये मंदिर परिसर उजळून निघाला नंतर श्रींची आरती होऊन काला वाटप झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सौ. ज्योती पागडे यांचा सत्कार मंदिराच्या सेवेकरी सौ.किशोरी दंडगे यांनी केला. त्यानंतर मंदाताई नवरे यांचे मार्गदर्शन झाले. याकामी मंदिराच्या सौ. किशोरी दंडगे, प्रज्ञा शिंदे, विद्या सांगोलेकर, वैशाली जाधव, विनोदा शेरीगार, सुनिता धोत्रे आदींचे सहकार्य लाभले असे पत्रक मंदिराचे भाऊसो पाटील यांनी प्रसिद्धीस दिले.

## कुरुंदवाड येथे शरद व्याख्यानमालेचे आयोजन

कुरुंदवाड,ता.६(प्रतिनिधी)-

**येथील शतकीय रौप्य महोत्सवी नगरवाचनालयात सुप्रसिद्ध पत्रकार व लेखक पद्मश्री पा. वा. गाडगीळ व कै. डॉ. स. रा. गाडगीळ यांच्या स्मृती प्रित्यर्थ शरद व्याख्यानमालेचे. ता.१० ते १५ नोव्हेंबर अखेर आयोजन केले आहे, अशी माहिती वाचनालयाचे कार्याध्यक्ष अ. शा. दानवाडे व उपकार्याध्यक्ष प्रा भाऊसाहेब सावगावे यांनी दिली.**

व्याख्यानमाला नगर वाचनालयाच्या डॉ.रत्नाप्पा कुंभार सभागृहात दररोज सायंकाळी साडेपाच वाजता सुरू होणार आहे. परिसरातील नागरिकांनी या व्याख्यानमालेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कार्याध्यक्ष दानवाडे व उपकार्याध्यक्ष भाऊसाहेब सावगावे यांनी केले.यावेळी ग्रंथपाल दत्ता भोसले, ग्रंथपाल मेघा पाटील, कर्मचारी नरसिंह नाईक दादासाहेब परीट उपस्थित होते.




## निरंकारी संत समागम सोहळ्यात कोल्हापूर जिल्ह्यातून हजारो भाविक सहभागी

कोल्हापूर,ता.६(प्रतिनिधी)-

**संत निरंकारी मिशनचा ७८ वा वार्षिक निरंकारी संत समागम सद्गुरु माता सुदीक्षा महाराज आणि निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन छायेखाली नुकताच समालखा (हरियाणा) येथे संपन्न झाला. या संत समागमामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातून असंख्य भाविक सहभागी झाले.**

समागमाचा शुभारंभ सत्गुरु माताजींनी मानवतेच्या प्रति दिलेल्या दिव्य संदेशाने झाली. त्यामध्ये माताजींनी सांगितले, की मानवाने मानवतेचा मार्ग स्वीकारावा, स्वतःचे अंतरंग सदोदित शुद्ध करत जावे जेणेकरून त्याची व्याप्ती वाढत जाऊन संपूर्ण बाह्य जगात सुधारणा घडेल आणि सगळीकडे शांतीसुखाचे वातावरण स्थापित होईल. समागमाच्या निमित्ताने भव्य रॅलीने झाला.

# पावसाच्या उघडीपीमुळे पिकांच्या काढणीला जोर

### भाताची ५० टक्के कापणी पूर्ण; कृषी अधिकारी पांगरे यांची माहिती

कोल्हापूर,ता.६(प्रतिनिधी)-

**पावसाने बऱ्यापैकी उघडीप दिली असल्यामुळे कोल्हापूर जिल्ह्याच्या पूर्व भागात भात काढणीला जोर आला आहे. गेल्या वर्षभरात अचानकपणे पडत असलेल्या पावसाळी व अवकाळी पावसामुळे हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाऊ नये म्हणून मिळेल त्या कामगारांच्या मदतीने तसेच घरातील अबालवृध्दांच्या मदतीनेही भात काढणीचा हंगाम जोरात सुरु आहे. सारं गाव आता शेतात पहायला मिळत आहे.**

जिल्ह्यात खरीप हंगामात १ लाख ६९ हजार हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली होती. यामध्ये भात, सोयाबीन, भुईमूग, ज्वारी, उडीद, मूग, नाचणी अशा खरीप पिकांचा समावेश असून यापैकी जवळपास ९२ हजार हेक्टरवर भाताची पेरणी झाली होती, त्यापैकी आतापर्यंत ५० टक्के भाताची काढणी पूर्ण झाली असून उर्वरित भाताची कापणी गतीमान झाली आहे. सोयाबीन, उडीद, मूगाची काढणी १०० टक्के पूर्ण झाली असून भुईमूगाची ८० टक्के काढणी पूर्ण झाली आहे तसेच नाचणीच्या काढणीस आता २-४ दिवसात सुरुवात होऊ शकते मात्र ज्वारी अद्याप काढणीला आलेली नाही. पावसाने उघडीप दिल्याने खरीप हंगामातील पिकांच्या काढणीला वेग आल्याचे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी जालिंदर पांगरे यांनी सांगितले.

भात, सोयाबीन, शेंगांच्या काढणीच्या कामामध्ये मजूर मिळत नसल्याने घरातील माणसांच्या मदतीने काढणी चालू आहे. काही ठिकाणी यंत्राचा वापरही केला जात



आहे. शेतीत यांत्रिकीकरण आल्यामुळे पारंपारिक पद्धतीने भाताची खळ्यावरती मळणी करणे जवळपास बंद झाले आहे. पण सततच्या पावसामुळे यंत्राचा वापर करण्यास अडथळा निर्माण होत आहे. अचानक ढगाळ वातावरण होणे त्यानंतर मोकळे वातावरण असा वातावरणाचा लपंडाव चालू असला तरी काढणीला आलेली पिके काढून मळणी केली जात आहे. वातावरणातील बदल यामुळे शेतकऱ्यांचीही घालमेल होत आहे. भुईमूग काढून वाळवला जात आहे, ढगाळ वातावरण झाल्यास शेतकऱ्यामध्ये अस्वस्थता निर्माण होत आहे.

नोव्हेंबरमध्ये जिल्ह्यात खरीप हंगामातील काढणीस सुरुवात झाली असली तरी सततच्या पावसामुळे ती मंदावली आहे. खरीप हंगामातील पीक काढणीस गती येते, विशेषतः भात,सोयाबीन, भुईमूग आणि ऊस यांसारख्या पिकांची कापणी सुरू होते. मात्र, अचानक येणाऱ्या पावसामुळे शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

जिल्ह्यात काही दिवसांपासून मध्यम ते जोरदार पाऊस सुरू आहे. ज्यामुळे शिवारात पाणी साचले आहे. भातशेतीत पाण्यामुळे मळणी करता येत नाही, परिणामी काढणीस अडथळा येत आहे. काढणीस तयार असलेली पिके पावसामुळे खराब होण्याची शक्यता आहे. ऊस कापणीसाठी शेत सुकण्याची प्रतीक्षा करावी लागत आहे. जमीन ओली असल्यामुळे साखर कारखान्यांचा गाळप हंगामही लांबण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार आगामी काही दिवसांत पावसाची शक्यता वर्तविली जात असल्यामुळे पावसाळी पिके काढणीची गती अशीच राहू शकते.

## तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये नवोदित विद्यार्थ्यांचे स्वागत

वारणानगर,ता.६(प्रतिनिधी)-

**वारणा विद्यापीठाच्या तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसी, वारणानगर (ता.पन्हाळा) येथे प्रथम वर्षात नव्याने दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ तसेच पालक-शिक्षक सभा उत्साहात संपन्न झाली. या कार्यक्रमाला पालक, विद्यार्थी आणि महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वारणा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के हे होते. आपल्या



वारणानगर येथील कार्यक्रमास मार्गदर्शन करताना कुलगुरु डॉ.डी.टी.शिर्के, व्यासपिठावर इतर मान्यवर.

प्रभावी अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना ध्येय निश्चित करून नियोजनबद्ध पद्धतीने त्या ध्येयाकडे वाटचाल करण्याचे आवाहन केले.

शिक्षण मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.व्ही. व्ही.कारजिन्नी यांनी महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण प्रवेश प्रक्रियेचे कौतुक केले. यावेळी प्रा.डॉ.कल्पना पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कार्यक्रमादरम्यान मच्छिंद्र चौगुले व दीपक जाधव या पालकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमासाठी श्री वारणा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आमदार डॉ. विनय कोरे, वारणा विद्यापीठाचे कुलाधिकारी एन.एच.पाटील, कुलगुरू डॉ.डी. टी. शिर्के, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विलास कारजिन्नी यांचे मार्गदर्शन लाभले.कार्यक्रमाचे सुयोग्य संयोजन डॉ.शर्वरी हर्डीकर, सौ.सुप्रिया गायकवाड,प्रा.रमण भोपळे, प्रा.राजदीप भोकरे, प्रा.भक्ती डंबे आणि निलेश पाटील यांनी केले. आभार प्राचार्य डॉ.किरण पाटील यांनी मानले.

## महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्याशी संबंधित कागदपत्रांचे आज कोल्हापूरात प्रदर्शन

कोल्हापूर,ता.६(प्रतिनिधी)-

**राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीचे औचित्य साधून पुराभिलेख संचालनालय व श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्था कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमानाने श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयातील यशवंतराव चव्हाण सभागृहात शुक्रवारी ता. ७ नोव्हेंबर रोजी या नेत्यांशी संबंधित पुराभिलेख संचालनालयातील कागदपत्रांचे प्रदर्शन सुरु आहे.**

हे प्रदर्शन सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत सर्वांसाठी विनामुल्य खुले राहणार आहे. या प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी इतिहासप्रेमी नागरिक, संशोधक, विद्यार्थी व सर्वसामान्य जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित रहावे व प्रदर्शनाचा सर्वांनी आवर्जून लाभ घ्यावा, असे आवाहन पुराभिलेख संचालनालयाचे संचालक सुजितकुमार उगले यांनी केले.

## भारतीय हॉकी शताब्दी दिनानिमित्त आज कोल्हापूरात स्पर्धांचे आयोजन

कोल्हापूर,ता.६(प्रतिनिधी)-

**हॉकी हा भारताचा राष्ट्रीय खेळ. भारतीय हॉकी महासंघाची स्थापना ७ नोव्हेंबर १९२५ रोजी झाली व ७ नोव्हेंबर २०२५ रोजी भारतीय हॉकी परंपरेला १०० वर्षे पूर्ण होत आहेत. या दिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय पातळीवर शिखर संघटना म्हणुन काम करणाऱ्या 'हॉकी इंडिया'ने 'एक देश एक उपक्रम' या अंतर्गत उपक्रम घेण्याचे निर्देश दिले आहेत.**

त्यानुसार हॉकी कोल्हापूर दि डिस्ट्रीक्ट हॉकी असो. कोल्हापूर जिल्ह्यातील हॉकी साठी कार्यरत असणारी सर्व क्रीडा मंडळे, वरिष्ठ खेळाडू व हॉकी प्रशाला यांच्या संयुक्त विद्यमाने हा दिवस साजरा करण्यात येत आहे. आज ता. ७ रोजी सकाळी ९ वा. हॉकीची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लाईन बाजार येथे 'क्रीडा ज्योत प्रज्वलनाने' रॅलीचे उद्घाटन करण्यात येणार आहे. यानंतर सकाळी १० वा. मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम येथे भारतीय हॉकी शताब्दी चषक ज्युनियर बॉईज व ज्युनियर गर्ल्स या दोन सामन्यांचे आयोजन करण्यात येणार आहे. विशेष बाब म्हणजे संपूर्ण देशामध्ये एकूण ५०० जिल्ह्यामध्ये सकाळी ८ ते १२ या वेळेत प्रत्येकी दोन म्हणजे एकूण १००० सामने होणार असुन या उपक्रमाची नोंद 'गिनिज बुक वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये करण्यात येणार आहे.

या रॅलीचे उद्घाटन लाईन बाजार येथे तर स्पर्धेचे आयोजन मेजर ध्यानचंद स्टेडियम येथे करण्यात येणार आहे, अशी माहिती हॉकी कोल्हापूरच्या अध्यक्षा सौ. सुरेखा पाटील यांनी दिली आहे.

# मुलींची प्रगती म्हणजे संपूर्ण समाजाची प्रगती

### नाम.चंद्रकांत पाटील

कोल्हापूर,ता.६(प्रतिनिधी)-



**एकविसाव्या शतकात मुलगा मुलगी असा भेद राहिलेला नसून मुलींची प्रगती म्हणजे संपूर्ण समाजाची प्रगती आहे, असे प्रतिपादन नामदार चंद्रकांत पाटील यांनी केले ते कौन्सिल ऑफ एज्युकेशन या संस्थेतर्फे उभारलेल्या विद्यार्थिनी वसतिगृह इमारत उद्घाटन समारंभ कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा मा. सौ. रजनीताई मगदूम या होत्या.**

नामदार पाटील पुढे म्हणाले की,वर्तमान परिस्थितीत मुलांच्या पेक्षा मुलींची प्रगती वेगाने होत आहे. प्रत्येक क्षेत्रामध्ये मुली आघाडीवर आहेत इतकेच नव्हे तर भारतीय महिला संघाने क्रिकेट खेळामध्ये विश्वचषक कप जिंकला आहे, ही देशासाठी अभिमानाची गोष्ट आहे आणि अशी मुलींची प्रगती होण्यासाठी अशा विद्यार्थिनी वसतिगृहांची नितांत गरज आहे.

यावेळी डॉ.विश्वनाथ मगदूम यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला कौन्सिल ऑफ एज्युकेशन या संस्थेच्या अध्यक्षा सौ.रजनीताई मगदूम, उपाध्यक्ष डॉ. प्रसाद मगदूम सदस्य ॲड.अमित बाडकर ॲड.वैभव पेडणेकर, शहाजी लॉ कॉलेजचे प्राचार्य डॉ. प्रवीण पाटील, नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्सचे प्राचार्य डॉ. उत्तम पाटील, पार्वती देवी कुंभार नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य भालचंद्र कुलकर्णी, चारही महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने या वसतिगृह इमारतीचे बांधकाम करणाऱ्या आर्किटेक्ट अनुज मिठारी आणि सिव्हिल इंजिनियर युवराज गोजारे यांचा सत्कार करण्यात आला. याशिवाय कॉमर्स कॉलेजमधील सीए परीक्षा उत्तीर्ण झालेल्या, एनसीसीमध्ये उत्तुंग कामगिरी केलेल्या, पुरुषोत्तम करंडकासाठी पात्र ठरलेल्या सांस्कृतिक विभागातील विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. आभार डॉ. वर्षा मैंदर्गी यांनी मांनले तर सूत्रसंचालन सौ. अश्विनी मगदूम यांनी केले. यावेळी चारही महाविद्यालयातील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

श्रीहरी
शुक्रवार, ता.७/११/२०२५ पासून दुपारी १ वाजता
ओरिजीनल हिंदी इचलकरंजीत प्रथमच
कॉलेज लव
प्रौढांसाठी
दु. ४ व सायं. ७ वा.
फरेबी आशिक
A A

श्रीदत्त
शुक्रवार, ता. ७ पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
लस्ट कनेक्शन
A शहरात प्रथमच * फक्त प्रौढांसाठी A

पंचवटी DOLBY DIGITAL PLUS 7.1 शुक्रवार ता.७ पासून
ॲडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरू राहील
ऑनलाईन बुकींग book my show
अधिक माहितीसाठी संपर्क : 9623150103
रोज १ खेळ * दु. १२ वा. — पुन्हा शिवाजीराजे भोसले (मराठी)
रोज १ खेळ * दु. ३ वा. — कांतारा-२ (हिंदी)
रोज २ खेळ * ६ व * ९ वा. — जटाधरा (हिंदी)

५६ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत भाग्यरेखा DOLBY DIGITAL
शेवटचे मोजकेच दिवस
नवीन डॉल्बी डिजीटल साऊंड सिस्टीम
रोज ४ खेळ *१२ *३ *६*९ वा.
जागतिक रिलीज
कांतारा-२ (हिंदी)

कल्पना लेजर प्रोजेक्टरसहीत शुक्रवार ता.७ पा
१२,३,६,९ वा
(हिंदीचित्र) जटाधरा
DOLBY DIGITAL QUBE

गुरु शुक्रवार ता.७ पासून
ऑनलाईन बुकींग book my show
रोज ४ खेळ १ * ४ * ७ व १० वा.
अनेलिचा प्रिडेटर विसराच. येत आहे त्याचा बाप
'प्रिडेटर बॅडलॅन्डस' (हिंदीमध्ये)
९० चे दशक गाजविलेल्या प्रिडेटरचा पुढील भाग

RK CINEMA 3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा 3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070 book my show
"कांतारा: चॅप्टर 1" (हिंदी) 01:00 PM, 06:30 PM 09:30 PM
"हक" (हिंदी) 05:45 PM, 07:30 PM
"दी गर्लफ्रेंड" (हिंदी) 11:30 AM, 02:30 PM
"प्रेडेटर:बॅडलॅब्स" (हिंदी 3D) 10:15 AM, 03:30 PM 08:15 PM, 10:30 PM
"तीन पायाचा घोडा" (मराठी) 05:15 PM
"द ताज स्टोरी" (हिंदी) 12:30 PM, 10:15 PM
अभंग तुकाराम (मराठी) 04:15 PM
चित्रपटाचा भरघोस आनंद घ्या आमच्या नवीन खाद्य प्रकारासह, खासकरून पिज्जा, पास्ता, सँडविच, गार्लिक ब्रेड आणि वरिस्ता एक्सप्रेसो कॉफी इचलकरंजीत प्रथमच

फोर्च्युन सिनेफ्लेक्स इचलकरंजी
Now Book Tickets on book my show OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क +91 88 88 01 51 11
हक (HIN) (U/A) 11.00am, 04.45, 07.30, 10.30pm
द ताज स्टोरी (HIN) (U/A) 01.45, 04.30, 07.30pm
कांतारा २ (HIN) (U/A) 01.15, 10.15pm
प्रिडेटर : बॅडलँड्स (3D) (HIN) (U/A) 10.30am, 06.15, 10.40pm
एक दिवाने की दिवानियत (HIN) (A) 12.30pm
पुन्हा शिवाजीराजे भोसले (MAR) (U/A) 03.15pm
जटाधारा (HIN) (U/A) 08.15pm
द गर्लफ्रेंड (HIN) (U/A) 10.45am
कोणताही सिनेमा पहा 100 रु. पासून पुढे

# कराड,मलकापूर पालिका निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज

## निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची माहिती

कराड,ता.६(प्रतिनिधी)-

**कराड व मलकापूर या दोन्ही नगरपालिकांच्या निवडणुका २ डिसेंबर रोजी पार पडणार असून, प्रशासनाने दोन्ही ठिकाणी सर्व तयारी पूर्ण केल्याची माहिती प्रांताधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी अतुल म्हेत्रे आणि तहसीलदार कल्पना ढवळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.दोन्ही ठिकाणी मतदान सुरळीत व पारदर्शक पार पडावे यासाठी प्रशासन सज्ज आहे.**



कराड पालिकेच्या निवडणूक नियोजनाची माहिती देताना प्रांताधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी अतुल म्हेत्रे म्हणाले, कराड नगरपालिकेत एकूण १५ प्रभागात ६९,८३६ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. निवडणुकीसाठी यशवंतराव चव्हाण बहुउद्देशीय सभागृह येथे मुख्य निवडणूक कार्यालय स्थापन करण्यात आले आहे. निवडणुकीसाठी ७४ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली असून, ८९ केंद्राध्यक्षांसह मतदान अधिकारी क्रमांक १, २,३ तसेच इतर कर्मचारी व पोलीस दलाची नेमणूक करण्यात आली आहे. निवडणुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी ५ भरारी पथके,२ व्हिडिओ पाहणी पथके, २ व्हिडिओ सर्वेक्षण पथके व ६ स्थिर पथके नेमण्यात आली आहेत.

मतमोजणीची प्रक्रिया दैत्यनिवारिणी मंदिराशेजारील यशवंतराव चव्हाण सभागृहात होणार आहे.तसेच मतदान केंद्राबाहेर वेब कास्टिंगची सोय करण्यात आली आहे.

तर मलकापूर नगरपालिकेच्या निवडणूक तयारीची माहिती देताना निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार कल्पना ढवळे म्हणाल्या,मलकापूर नगरपालिकेच्या मतदार यादीत एकूण २५, १७४ मतदार आहेत. यामध्ये १२, ७१२ पुरुष, १२,४५७ महिला व इतर पाच मतदारांचा समावेश आहे. मलकापूरची लोकसंख्या ३१,६७१ असून, एकूण ११ प्रभागांमधून २२ नगरसेवक निवडून द्यायचे आहेत.

दरम्यान,दोन्ही ठिकाणी नगराध्यक्षपदासाठी निवडणूक खर्चाची मर्यादा साडेसात लाख रुपये,तर नगरसेवकांसाठी अडीच लाख रुपये निश्चित करण्यात आली आहे. दोन्ही नगरपालिकांच्या निवडणुका पारदर्शक, शांततेत आणि सुरळीत पार पडाव्यात यासाठी प्रशासनाने सर्व यंत्रणा सज्ज ठेवली असल्याचे दोन्ही निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

### निवडणूक कार्यक्रम

निवडणुकीसाठी ३३ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली असून, मुख्यालय मलकापूर नगरपरिषद बहुउद्देशीय सभागृह, लक्ष्मीनगर येथे आहे.उमेदवार अर्ज १० नोव्हेंबरपासून १७ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत दाखल करू शकतील. १८ नोव्हेंबर रोजी अर्ज छाननी,२५ नोव्हेंबर रोजी अर्ज माघार घेण्याची अंतिम तारीख असून, २६ नोव्हेंबर रोजी निवडणूक चिन्हांचे वाटप व अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध होईल. मतदान २ डिसेंबर रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत होईल, तर मतमोजणी ३ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता सुरू होईल.अशी माहिती कराड व मलकापूर पालिकेच्या निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिली.

# कोरेगावात सोयाबीन खरेदीसाठी नोंदणी सुरू

## खरेदी विक्री संघात संपर्काचे आवाहन : प्रति क्विंटल ५३२८ रुपये दर

कोरेगाव,ता.६(वार्ताहर)-

**कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातील कोरेगाव खरेदी विक्री संघाच्या गोदामात शासनाची सोयाबीन आधारभूत किंमत पाच हजार ३२८ रुपये प्रतिक्विंटल दराने खरेदीसाठी शेतकऱ्यांकडून ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली असून ती ३१ डिसेंबर अखेर सुरू राहणार आहे.**

कोरेगाव तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघ मार्केटिंग फेडरेशन व नाफेड यांच्या संयुक्त विद्यमानाने येथील बाजार समिती आवारातील खरेदी विक्री संघाच्या गोदामात खरीप हंगाम २०२५ मध्ये उत्पादित सोयाबीन शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत पाच हजार ३२८ रुपये प्रमाणे शेतकऱ्यांकडून ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असून, ही प्रक्रिया ३१ डिसेंबरपर्यंत सुरू राहील. सोयाबीन शेतीमालाच्या जादा आवकमुळे सध्याच्या बाजार भाव आधारभूत किमतीपेक्षा कमी असल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ नये या उद्देशाने सदरची हमीभाव योजना सुरू करण्यात आली आहे.



खरेदी केंद्र सुरू करण्यासाठी नाफेड पणन महासंघ, सहकार खाते व खरेदी विक्री संघ यांनी प्रयत्न केल्याचे संघाचे अध्यक्ष शहाजीराव क्षीरसागर, जिल्हा उपनिबंधक संजयकुमार सुद्रिक सहाय्यक निबंधक अभिनव थोरात यांनी प्रयत्न केले आहेत. खरेदी केंद्रावर माल घेऊन येताना तो स्वच्छ असावा. आर्द्रता १२ टक्केच्या आत असावी काडी कचरा माती व डाळ नसावी. नाफेड यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे योग्य त्या दर्जाचा माल शेतकऱ्यांनी खरेदी केंद्रावर आणावा, असे आवाहन संघाचे व्यवस्थापक राजेंद्र येवले यांनी केले आहे

### नोंदणीसाठी कागदपत्रे

शेतकऱ्यांनी नोंदणी करताना आधार कार्ड आधार लिंक मोबाईल क्रमांक, सातबारा उतारा (खरीप हंगाम २०२५ मध्ये सोयाबीनची पीकपेरा नोंदी सह) आधार व मोबाईल क्रमांक लिंक असलेल्या बँक पासबुकचे झेरॉक्स घेऊन यावे,असे आवाहन संघाचे अध्यक्ष शहाजीराव क्षीरसागर यांनी केले आहे.

# विजय यमगर यांनी पटकाविला आयर्नमॅनचा किताब

सांगली,ता.६(प्रतिनिधी)-

**प्रत्येक टप्प्यावर अपात्रतेची टांगती तलवार आणि जगभरातील इतर स्पर्धांच्या तुलनेत अतिशय खडतर असलेली मलेशिया फुल आयर्नमॅन ही आंतरराष्ट्रीय स्पर्धा सांगलीतील इंजिनिअर विजय आत्माराम यमगर यांनी गाजवली. वेळेच्या आगोदर स्पर्धा पूर्ण करून भारतीय ध्वज मोठ्या दिमाखात उंचावला. आयर्नमॅनचा किताब पटकावून विजय यमगर यांनी सांगलीबरोबरच आपल्या चोरोची (ता.कवठेमहांकाळ) गावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.**



**मलेशियातील आंतरराष्ट्रीय स्पर्धेत यश**

जगभरातील विविध देशात आयर्नमॅन स्पर्धेचे आयोजन केले जाते. त्यात हाप आणि फुल आयर्नमॅन स्पर्धा असे दोन प्रकार आहेत. त्यात मलेशियातील लंगकावी या आंतरराष्ट्रीय शहरात आयोजित केली जाणारी ही स्पर्धा खडतर अशीच आहे, शिवाय अनोख्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी केली जात असल्याने स्पर्धेकाला छोट्याश्या चुकीचीही मोठी किंमत मोजावी लागते. याचा प्रत्यय विजय यांना आला. त्यांच्या एका सहकाऱ्याला पहिल्याच टप्प्यानंतर अपात्र ठरवून स्पर्धेतून बाजूला काढण्यात आले. समुद्रात ३.८ किलोमीटर पर्यंतचे अंतर पोहून स्पर्धेला सुरुवात होते. हे अंतर २ तास २० मिनिटात पूर्ण झाले तरच तुम्ही दुसऱ्या टप्प्यासाठी पात्र होता. १८० किलोमीटर सायकलने १० तास ३० मिनिटात पूर्ण करणे आवश्यक आहे. स्पर्धेचा अखेरच्या टप्पा म्हणजे तब्बल ४२ किलोमीटर धावणे. याकरिता साडे सहा तासांच्या वेळेची मर्यादा आहे. अशी ही एकूण १७ तासांची सलग स्पर्धा आहे. विजय यांनी ही स्पर्धा १६ तास १५ मिनिटात पूर्ण करून आपल्या देशाचा तिरंगा मोठ्या दिमाखात मलेशियाच्या मैदानात फडकावला. या स्पर्धेत जगातील १ हजार ७०० मेहनती खेळाडूंनी सहभाग घेतला होता. विजय यांच्या यशाचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

# कॅम्पच्या माध्यमातून अडचणी सोडविण्यास मदत होईल

## आ.सत्यजित देशमुख; कोकरूड येथे आरटीओ कॅम्प सुरू

शिराळा,ता.६(प्रतिनिधी)-

**ग्रामीण भागातील वाहन धारकांची अधिकची सोय व्हावी यासाठी उपप्रादेशिक परिवहन मंडळ अंतर्गत आर.टी.ओ कॅम्प शासनाकडून मंजूर केला असून कॅम्पच्या माध्यमातून वाहन धारकांच्या अडचणी सोडवण्यास मदत होईल, असे प्रतिपादन आमदार सत्यजित देशमुख यांनी केले.**



कोकरूड येथे नव्याने मंजूर झालेल्या उपप्रादेशिक परिवहन अंतर्गत आर.टी.ओ कॅम्पचे उद्घाटन समारंभप्रसंगी आमदार सत्यजित देशमुख, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी प्रसाद गाजरे आदी.

कोकरुड येथे नव्याने मंजूर झालेल्या उपप्रादेशिक परिवहन अंतर्गत आर.टी.ओ कॅम्पचे उद्घाटन उत्साहात संपन्न झाले. यावेळी ते बोलत होते. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी प्रसाद गाजरे प्रमुख उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना आमदार सत्यजित देशमुख म्हणाले,कोकरूड येथे उपप्रादेशिक परिवहन विभागाने आरटीओ कॅम्प मंजूर केला असून शासनाने आम्ही केलेली मागणी मान्य केली आहे. ग्रामीण भागातील खेड्यांमध्ये राहणाऱ्या वाहन धारकांना वाहन परवाना,चालक परवाना,वाहन परवाना दुरुस्ती अशा परवानग्या मिळविणे आता सोयीचे होणार आहे.यामुळे युवाना रोजगाराची संधी वाढतील'असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाला कोकरूड पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक राहुल अतिग्रे, सहाय्यक वाहन निरीक्षक स्नेहल बारपट्टे, विकास देशमुख, अनिल देशमुख, तौफिक पटेल,शब्बीर मुल्ला,सरदार शेख,अनिल घोडे पाटील, शंकर पाटील, अमित मुल्ला, ग्रामपंचायत सदस्य, व्यावसायिक, युवक, वाहन धारक उपस्थित होते.

# पाटणमध्ये आज सांस्कृतिक कार्यक्रम

पाटण,ता.६(प्रतिनिधी)-

**वंदे मातरम् गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त आज ता.७ रोजी वंदे मातरम गीत वर्धापन दिन संपूर्ण राज्यात एकाच वेळीस साजरा करण्यात येत आहे. वंदे मातरम् गायनाचे वर्ल्ड रेकॉर्ड करण्याचा शासनाचा मानस आहे.**

वंदे मातरम् या गीतास आज रोजी १५० वर्षे पूर्ण होत आहेत. या ऐतिहासिक व सांस्कृतिक घटनेच्या निमित्ताने वंदे मातरम्, गीतगायन, देशभक्तीपर वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा सांस्कृतिक कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. पाटण तालुक्यातील सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कौशल्य विद्यापीठ व कौशल्य विकास केंद्र, शाळा, महाविद्यालय, नागरिक सहभागी होणार असल्याचे कौशल्य विकास रोजगार उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी हणमंत नलावडे यांनी सांगितले. यावेळी पोलिस निरीक्षक अविनाश कवठेकर, नायब तहसीलदार एस.बी. भालेकर, शिक्षण विस्तार अधिकारी दैवता पाटणकर, मनोहर यादव, शंकर मोहिते, प्रा.पांडुरंग ऐवळे, मारूती लोहार, महेंद्र चव्हाण, निलेश घोणे, रोहित मिसाळ, लकी लांबोर, भाग्यश्री कवडे, सुरेखा कुंभार, मनीष मोरे आदी उपस्थित होते.

# अति पावसामुळे झेंडू उत्पादक अडचणीत

पाटण,ता.६(प्रतिनिधी)-

**अति पावसामुळे झेंडु फुल उत्पादक शेतकरी अडचणीत आला आहे. दर चांगला मिळेल अशी शक्यता असताना करपा व सतत पडणाऱ्या पावसामुळे फुलांची संख्या घटली आहे.पावसाने फांद्यांची मोडतोड होत असून झाडे पडून फुलांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.**

यंदा पाऊसकाळ जास्त झाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या नाहीत. सरी सोडलेल्या शेतात अनेक शेतकऱ्यांनी कमी दिवसात व मोठ्या प्रमाणात फायदा देणारे पिक म्हणून झेंडूची लागवड केली आहे. सुरूवातीस खतपाणी घालून पीक जोमात आणले. मात्र, सतत पडणाऱ्या पावसामुळे अपेक्षेप्रमाणे उत्पादन मिळणार नसल्यामुळे शेतकरी चिंतेत आहेत. अनेक वर्षांपासून लहान मोठे शेतकरी दसरा, दिपावलीत झेंडू घेतात. कमी क्षेत्रात जास्त उत्पन्न मिळते. तसेच मुंबईला रात्री जाणाऱ्या खाजगी ट्रॅव्हल्सवरून माल मार्केटला जात असल्यामुळे पाच गुंठ्यांपासून एकरापर्यंत झेंडु फुल उत्पादन घेणारे अनेक शेतकरी आहेत.

# शिवसेना पदाधिकारी निवडी जाहीर

कराड,ता.६(प्रतिनिधी)-

**शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने जिल्ह्यातील शिवसेना पदाधिकारी निवडी जाहीर केल्या आहेत. कराडमध्ये अडचणीच्या काळात किल्ला लढवणाऱ्या शिवसैनिकांना बढती देण्यात आली आहे.**

सध्याचे शहरप्रमुख शशिराज करपे यांना कराड दक्षिण तालुकाप्रमुखपदी नेमणूक देण्यात आली आहे. उपशहरप्रमुख शेखर बर्गे यांची शहरप्रमुखपदी निवड करण्यात आली आहे. तर जुने शिवसैनिक शशिकांत हापसे यांची कराड दक्षिण विधानसभा संघटकपदी निवड करण्यात आली आहे. भरत पवार यांची पाटण तालुकाप्रमुखपदी तर किरण कदम यांची कराड उत्तर तालुका प्रमुखपदी निवड करण्यात आली आहे. विशाल कुंभार हे कराड उत्तर तालुका संघटक असून सुरेश पाटील यांची पाटण तालुका संघटकपदी निवड करण्यात आली आहे.

# शिराळा शहरासाठी पाच कोटींचा निधी मंजूर

शिराळा,ता.६(प्रतिनिधी)-

**शिराळा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी मोठी भर म्हणून पाच कोटी रुपयांचा भरघोस निधी मंजूर झाला आहे. भाजप सांगली जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक यांच्या सततच्या पाठपुराव्याला आणि प्रयत्नांना यश मिळाले असून नागरिकांना आवश्यक नागरी सुविधा पुरविण्यासाठी हा निधी मंजूर करण्यात आला असल्याची माहिती शिराळ्याचे माजी नगरसेवक व संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष केदार नलावडे यांनी दिली.**

नलावडे म्हणाले, विशिष्ट नागरी सेवा व सुविधा पुरवणे २०२४-२५ योजनेंतर्गत,ज्येष्ठ नागरिक व बालकांसाठी उद्याने विकसित करणे, शिराळा शहरात ओपन जिमची निर्मिती,आंतरिक रस्ते विकसित करणे,गटर लाईन सुधारणा व आधुनिकीरण, रस्त्यांवरील प्रकाश व्यवस्था (पतदिवे) उभारणी तसेच उद्यान विकसित करणे व परिसर सुशोभीकरण, सांस्कृतिक व धार्मिक परिसर सुशोभीकरण शहरातील होळीची टेक येथे भगवा ध्वज स्तंभ उभारणे व संपूर्ण परिसराचे सुशोभीकरण करणे आदी कामे करण्यात येणार आहेत. नलावडे पुढे म्हणाले, शिराळा शहरातील नागरिकांना स्वच्छ, सुशोभित आणि आधुनिक सुविधा मिळाव्यात हा हेतू ठेवून या विकास कामांचा प्रस्ताव सादर केला होता. भाजप जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक यांच्या पाठपुराव्यामुळे हा निधी मंजूर होऊन शिराळा शहराच्या विकासाला नवी दिशा मिळाली आहे.

# कराड लोकशाही आघाडी सर्व प्रभागांमध्ये उमेदवार देण्यास सक्षम

## बाळासाहेब पाटील

कराड,ता.६(प्रतिनिधी)-

**कराड नगरपालिकेच्या होऊ घातलेल्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये कराड लोकशाही आघाडी सर्व प्रभागांमध्ये उमेदवार देण्यास सक्षम असून, राजकारण विरहित सर्व समविचारी मंडळींशी चर्चा करून सर्वांना बरोबर घेऊन ही निवडणूक लढवणार असल्याचे प्रतिपादन माजी सहकार व पणन मंत्री, सातारा जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, सह्याद्री सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब पाटील यांनी केले.**



कराडः कराड लोकशाही आघाडीच्या प्रमुख कार्यकर्त्यांच्या बैठकीप्रसंगी मार्गदर्शन करताना बाळासाहेब पाटील,समवेत मान्यवर.

ते कराड नगरपालिका पंचवार्षिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सारडा लॉन, सोमवार पेठ कराड येथे आयोजित केलेल्या प्रमुख कार्यकर्त्यांच्या बैठकीप्रसंगी ते बोलत होते.

माजी मंत्री बाळासाहेब पाटील पुढे म्हणाले की, सन २०१९ मध्ये शरद पवार यांनी मला जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून जबाबदारी दिली, त्या माध्यमातून शासनाच्या विविध योजनांमधून कराड शहरातील विविध विकास कामे करू शकलो, असे सांगून, शहरात विविध प्रभाग आहेत, नगरसेवकांची संख्या जास्त असून लोकशाही आघाडी सर्व प्रभागांमध्ये उमेदवार देण्यास सक्षम आहे.तथापि शहराच्या विकासासाठी, शांततामय सहजीवनासाठी समविचारी मंडळींना बरोबर घेण्याची आपली तयारी आहे, त्याबाबत आपण सर्वांशी चर्चा करणार आहोत.माझं गाव कराड मी गावासाठी ही संकल्पना आपण राबवू. भविष्यात शहराच्या सर्वांगीण विकासाची कामे व शहरवासीयांची सेवा करण्याची संधी कराड लोकशाही आघाडीला द्यावी, असे आवाहन बाळासाहेब पाटील यांनी यावेळी केले.

यावेळी अ‍ॅड. सतिश पाटील, मिलींद कांबळे, दाऊद सुतार, अक्षय सुर्वे, मुसद्दीक आंबेकरी, डॉ. अनिल वाघमारे,अ‍ॅड. विद्याराणी साळुंखे, अ‍ॅड. मानसिंगराव पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सर्वांनी एकदिलाने या निवडणुकीला सामोरे जाण्याचे अभिवचन दिले. यावेळी कराड नगरपरिषदेचे विरोधीपक्ष नेते सौरभ पाटील यांनी प्रास्ताविक केले.अ‍ॅड.पी.एन. पाटील यांनी सूत्रसंचालन केले व प्रताप ऊर्फ पोपटराव साळुंखे यांनी आभार मानले.

# विरोधकांनी पोलिसांच्या मदतीने पुतळा रोखला-शिंदे

## ■आठ दिवसात पुतळा द्या अन्यथा न्यायालयात जाऊ■

आष्टा,ता.६(प्रतिनिधी)-

**छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा पोलिस प्रशासनाच्या मदतीने विरोधकांनी अडवून छत्रपतींचा अवमान केला आहे. आठ दिवसात हा पुतळा आमच्या ताब्यात मिळाला नाही तर पोलिस प्रशासना विरोधात कोर्टात जाणार आहोत अशी माहिती शहर विकास आघाडीचे नेते वैभव शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.**



आष्टा: पत्रकार परिषदेत बोलताना शहर विकास आघाडीचे नेते वैभव शिंदे, शेजारी इतर प्रमुख मान्यवर.

विराज शिंदे,रघुनाथ जाधव, संग्राम फडतरे, रामचंद्र सिद्ध, शिवाजीराव चोरमुले, सयाजी गावडे, माणिक शेळके, नंदकुमार बसुगडे, कौशिक वग्यानी,अर्जुन माने, तानाजीराव सूर्यवंशी, सुनील माने हे प्रमुख उपस्थित होते. वैभव शिंदे म्हणाले, दिवंगत माजी आमदार विलासराव शिंदे यांनी २०१७ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज सेवाभावी संस्थेच्यावतीने पुतळा उभारणीसाठी समिती स्थापन केली.कोरोना व महापुराच्या पार्श्वभूमीवर उशीर झाला. या दरम्यान विरोधकांनी राजकारणासाठी स्टंट करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर फायबरचा पुतळा बसवून छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान केला. शहराला वेठीस धरले. पुतळा समितीच्या माध्यमातून पंचधातूचा पुतळा तयार केला असून सर्व त्या प्रशासकीय मंजुरीनंतरच तो आष्टा येथील शिवाजी चौकात बसवण्यात येईल मात्र तयार झालेला पुतळा आष्ट्यात येत असताना विरोधकांची धडकी भरली आणि मताच्या भीतीने त्यांनी पोलिस प्रशासनाला हाताशी धरून पुतळा सांगली येथे रोखला. याप्रकरणी पोलिसांनाही आम्ही जाब विचारला असून कोणी कितीही विरोध केला तरी छत्रपतींचा पुतळा आष्टा शहरात वाजत गाजत येईल.

यावेळी किरण काळोखे विकास बोरकर सतीश माळी बाबासाहेब सिद्ध समीर गायकवाड, शकील मुजावर रणजीत पाटील, उपस्थित होते.

# सांगलीकरांना व्यावसायिक नाटक मोफत पहायला देऊ

## पालकमंत्री चंद्रकांत पाटील; निना कुळकर्णी यांना भावे गौरव पदक प्रदान

सांगली,ता.५(प्रतिनिधी)-

**सांगलीकरांना महिन्यातून एकदा व्यावसायिक नाटकाचा प्रयोग मोफत पाहण्याची संधी देण्यात येत असल्याची घोषणा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी रंगभूमीदिनी केली. यावेळी ज्येष्ठ अभिनेत्री निना कुळकर्णी यांना नाट्य क्षेत्रात मानाचे मानले जाणारे आद्यनाटककार विष्णुदास भावे गौरव पदक अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ दिग्दर्शक डॉ.जब्बार पटेल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.**



सांगली:ज्येष्ठ अभिनेत्री निना कुळकर्णी यांना पालकमंत्री चंद्रकांत पाटील व डॉ. जब्बार पटेल यांच्या हस्ते विष्णुदास भावे गौरव पदक देऊन सन्मानित करण्यात आले.

नाट्य क्षेत्रात ८३ वर्षापासून कार्यरत असलेल्या अखिल महाराष्ट्र नाट्य विद्या मंदिर समिती या संस्थेतर्फे ५ नोव्हेंबर रंगभूमीदिनाच्या निमित्ताने नाट्यक्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या रंगकर्मीस विष्णुदास भावे गौरव पदक देऊन सन्मानित करण्यात येते. यंदाचा हा ५८ वा पुरस्कार असून या पुरस्काराचे स्वरूप गौरवपदक, २५ हजार रुपये रोख आणि स्मृतीचिन्ह असे आहे. समितीचे अध्यक्ष डॉ. शरद कराळे यांनी स्वागत केले तर प्राचार्य भास्कर ताम्हणकर यांनी प्रास्ताविक करून गौरव पदकाच्या मानकरी निना कुळकर्णी यांचा परिचय करून दिला.

गौरवपदक स्वीकारल्यानंतर मनोगत व्यक्त करताना कुळकर्णी म्हणाल्या, पडद्याच्या मागे राबणारे हात,रंगमंचावरील कलाकार आणि रसिक असा संयोग जुळून आला की नाटक उत्तम होते. नाटक ही सामूहिक कला आहे.एकट्याची नाही. त्यामुळे हे पदक घेणारी मी एक प्रतीक आहे. हे पदक गळ्यात आल्यानंतर नेमके काय होतंय, हे सांगता येणे कठीण आहे, पण गेल्या ५५ वर्षात काय काय केले ते सर्व आठवतंय. सत्यदेव दुबे आणि विजया मेहता हे दोन गुरु लाभले. नाटकात काम करणे अवघड आहे. एकाग्रता, सातत्य आणि निवड या महत्वाच्या गोष्टी आहेत.

डॉ. जब्बार पटेल म्हणाले, विष्णुदास भावे गौरवपदक प्रदान म्हणजे डॉक्टरेट दिल्यासारखेच आहे. त्यामुळे निना कुळकर्णी यांना डॉ. कुळकर्णी म्हणण्यास हरकत नाही. नाट्यप्रयोगाच्या तिसऱ्या घंटेपर्यंतचा प्रवास हा भयानक असाच आहे. तिसऱ्या घंटे नंतर सर्व काही नटांचे असते, नट होणे सोपे नाही,हे नव्याने या क्षेत्रात येणाऱ्यांनी समजून घ्यावे. नाट्यक्षेत्रात ही गुरु शिष्याची परंपरा आहे. गुरु शिष्य ची परंपरा जोपर्यंत मानत नाही तोपर्यंत अभिनेता होता येत नाही. गुरूला समजून घेण्यासाठी पडेल ते काम करणे क्रमप्राप्त आहे. रंगभूमी हे लेखकाचे माध्यम आहे. दिग्दर्शकाचे नाही आणि चित्रपट हे दिग्दर्शकाचे माध्यम असल्याचे डॉ. पटेल यांनी सांगितले.

यावेळी संस्थेचे बलदेव गवळी, मेधा केळकर, बिना साखरपे, विलास गुप्ते,प्राचार्य भास्कर ताम्हणकर, विवेक देशपांडे, मिलिंद चितळे, जगदीश कराळे, नंदकुमार जाधव यांच्यासह नाट्य क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

# जिल्ह्यात महायुती व मविआ आमने-सामने

## मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यानंतर राजकीय जोडण्या सुरु

कोल्हापूर,ता.६(पांडुरंग दळवी)

**राज्याच्या राजकारणात मतदार यादीचा मुद्दा गाजत असताना, राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी विरोधकांच्या मागणीकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. २ डिसेंबरला मतदान आणि ३ डिसेंबरला मतमोजणी होणार आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलल्या जाणार नाहीत, हे आता स्पष्ट झाले आहे. कोल्हापूर जिल्ह्यात महाविकास आघाडी आणि महायुतीच्या नेत्यांनी जोडण्या लावण्यास सुरुवात केली आहे. राज्यातील बदललेल्या समीकरणामुळे कोल्हापूर जिल्ह्यात महायुती व महाविकास आघाडीच आमने-सामने येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.**

'सदोष मतदार याद्या' हा मुद्दा घेऊन न्यायालयाचा दरवाजा ठोठावण्याचा विचार करणाऱ्या महाविकास आघाडी (मविआ) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) प्रयत्न मुंबई उच्च न्यायालयात दुबार नोंदीवर घेतले जातील की नाही, हे पाहावे लागणार आहे.निवडणूक जाहीर होताच कोल्हापूर जिल्ह्यासह राज्यभरात राजकीय हालचालींना प्रचंड वेग आला आहे.कोल्हापुरातील गडहिंग्लज, हातकणंगले, हुपरी, जयसिंगपूर, कागल, कुरुंदवाड,मलकापूर,मुरगुड, पन्हाळा, शिरोळ,पेठवडगाव या नगरपालिका, नगरपरिषद आणि आजरा,चंदगड या नगरपंचायतीच्या निवडणुकीत आता जोरदार प्रचार रंगणार आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झालेल्या मेळाव्यात ठाकरे गटातील अनेक कार्यकर्त्यांनी शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करत प्रचाराचा औपचारिक 'शुभारंभ' केला.याला प्रत्युत्तर म्हणून, शिवसेना (उद्धव ठाकरे गट) यांचा मेळावा शिवाजी पेठेतील शिवाजी मंदिरात होणार असून, त्यासाठी पक्षाचे वरिष्ठ नेते उपस्थित राहणार आहेत.

**पालिका निवडणूक**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कोल्हापूर दौऱ्याने बुधवारीच निवडणुकीचा माहोल अधिक तापवला.जाहीर कार्यक्रमाच्या निमित्ताने आलेल्या या तिन्ही नेत्यांनी कार्यकर्त्यांशी संपर्क साधून स्थानिक




स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात प्राथमिक स्तरावरील चर्चा केली, ज्यामुळे महायुतीच्या तयारीला गती मिळाली.सदोष मतदार यादीचा मुद्दा घेऊन महाविकास आघाडी आणि मनसेने आक्रमक भूमिका घेतली होती. मुंबईत 'महामोर्चा'चे आयोजन करून 'दुबार मतदारां'चा मुद्दा विरोधकांनी लावून धरला होता. तर निवडणूक आयुक्तांनी या प्रश्नावर नवीन उपाययोजना जाहीर केली आहे.'दुबार नोंदणी' असलेल्या मतदारांच्या नावापुढे दोन स्टार (**) असणार आहेत. अशा मतदारांना दुसऱ्या ठिकाणी मतदान करणार नाही, असे शपथपत्र निवडणूक अधिकाऱ्यांना द्यावे लागणार आहे. त्यामुळे दुबार मतदानास काही प्रमाणात आळा बसेल.एकाच निवासस्थानी असलेल्या मतदारांच्या संशयास्पद संख्येची प्रत्यक्ष जागेवर जाऊन पडताळणी करण्याची यंत्रणाही आयोगाने कार्यान्वित केली आहे.

डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात अस्तित्वात येणाऱ्या या छोट्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सभागृहांसमोर मूलभूत सुविधांचा मोठा दुष्काळ आहे.जनतेच्या समस्यांचा 'डोंगर' उभा असताना, नव्या लोकप्रतिनिधींना येत्या पाच वर्षांत मूलभूत सुविधांचे जाळे निर्माण करण्याचे मोठे आणि आव्हानात्मक काम करावे लागणार आहे.निवडून येणारे लोकप्रतिनिधी विकासकामांसाठी जास्तीत जास्त निधी आणण्याचा प्रयत्न करतील, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.मतदार यादीतील त्रुटींवरून राजकारण तापलेले असतानाही निवडणूक आयोगाने आपला कार्यक्रम निर्धाराने जाहीर केला आहे. विरोधकांचा न्यायालयीन लढा कायद्याच्या कसोटीवर टिकेल की नाही, याबाबत साशंकता आहे. त्यामुळे आता सर्वच राजकीय पक्षांना 'सदोष' यादीसह जनतेच्या न्यायालयात आपले नशीब आजमवावे लागणार आहे.

# हातकणंगलेत शिवसेना ठाकरे गटाकडून इच्छुकांच्या मुलाखती

हातकणंगले,ता.६(प्रतिनिधी)-

**हातकणंगले नगरपंचायतीच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून इच्छुक उमेदवारांच्या प्राथमिक मुलाखती पार पडल्या. पक्षाचे उपनेते संजय पवार व जिल्हाप्रमुख संजय चौगुले यांच्या प्रमुख उपस्थितीत या मुलाखती घेण्यात आल्या. नगराध्यक्ष पदासह सर्व जागा शिवसेना मोठ्या जोमाने लढवणार आहे. गतवेळी शिवसेनेचे सात नगरसेवक निवडून आले होते .**

मुलाखतीच्या सुरुवातीस शिवसैनिक व पदाधिकाऱ्यांनी आपल्या इच्छा व्यक्त करताना, 'हातकणंगले हा शिवसेनेचा बालेकिल्ला असून तो अबाधित ठेवण्यासाठी सामान्य शिवसैनिकांना बळ देणे गरजेचे आहे,' असे मत मांडले. तसेच नगराध्यक्षपदासह सन्मानजनक जागा मिळाव्यात, यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करावेत, असा ठाम निर्धार व्यक्त करण्यात आला.




हातकणंगले नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती दरम्यान उपस्थित संजय पवार, संजय चौगुले व अन्य.

यावेळी बोलताना पक्षाचे उपनेते संजय पवार म्हणाले,'सर्व शिवसैनिकांनी झपाटून कामाला लागावे.पक्षनेतृत्व नक्कीच शिवसैनिकांचा सन्मान राखणारा निर्णय घेईल.येणाऱ्या हातकणंगले नगरपंचायतीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचाच नगराध्यक्ष होईल असा आम्ही आत्मविश्वास बाळगतो,' असे ते म्हणाले.जिल्हाप्रमुख संजय चौगुले यांनी हातकणंगले नगरपंचायतीवर भगवा फडकवण्यासाठी सर्व शिवसैनिकांनी सज्ज रहावे, असे आवाहन केले.

**नगराध्यक्षपदासह १७ जागा लढवणार**


या बैठकीदरम्यान उपस्थित सर्व शिवसैनिकांनी लोकनियुक्त नगराध्यक्ष पदासाठी अभिषेक प्रसाद पाटील यांचे नाव एकमुखाने सुचवून त्यांना पाठिंबा जाहीर केला. नगरसेवक पदांसाठी एकूण १९ इच्छूक उमेदवारांनी मुलाखत दिली. यावेळी उपजिल्हाप्रमुख साताप्पा भवान, शहरप्रमुख धोंडीराम कोरवी, सुरेश खोत,राजू शिंदे, विश्वास कोळी, अभिषेक पाटील,प्रसाद पाटील,रमेश शिंदे, पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

# मलकापूर : महायुतीत जागावाटपावरुन रस्सीखेच

सरूड,ता.६(नथुराम डवरी)-

**शाहूवाडी तालुक्यातील एकमेव नगरपालिका असणारी व कोल्हापूर जिल्ह्यात दुसऱ्या स्थानावर स्थापन झालेली नगरपालिका म्हणून ओळखली जाणाऱ्या मलकापूर नगरपालिकेवर आत्तापर्यंत आमदार कोरे, गायकवाड, पाटील अशा राजकीय गटात अटीतटीच्या निवडणुका झाल्या आहेत पण यावेळी मात्र राज्याच्या राजकारणात झालेल्या बदलामुळे यावेळची निवडणूक महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी होणार आहे.**

गतवेळच्या निवडणुकीत कोरे- गायकवाड गटाने बाजी मारली होती यावेळी महायुतीचे आमदार विनय कोरे, गोकुळचे संचालक करणसिंह गायकवाड, माजी सभापती सर्जेराव पाटील पिरेडकर यांच्याकडे भाजपचे नेते राजू पडवळकर ,भाजपचे राज्य सदस्य व शेतकरी जन आक्रोश मोर्चाचे प्रमुख आबासाहेब पाटील यांनी यावेळच्या निवडणुकीत भाजपच्या चिन्हावर लढण्यासाठी कोरे व गायकवाड गटाकडून ठराविक जागेची मागणी केली आहे या जागा न दिल्यास भाजप स्वबळावर निवडणूक लढवणार असल्याची घोषणा केली आहे.त्यामुळे महायुतीत कोण कोणाला किती जागा देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.महाविकास आघाडी कडून माजी आमदार सत्यजित पाटील, जिल्हा बँकेचे संचालक रणवीर सिंह गायकवाड, शेतकरी कामगार पक्षाचे भाई भारत पाटील हे महाविकास आघाडीचे नेतृत्व करून निवडणूक लढवणार आहेत त्यामुळे महायुतीविरुद्ध महाविकास आघाडी असा सामना रंगणार असे चित्र दिसत आहे.



**महायुतीविरुद्ध महाआघाडी सामना रंगणार**

मलकापूर नगरपालिकेच्या निवडणुकीत आमदार विनय कोरे यांच्या नेतृत्वाखाली जनसुराज्य - भाजप विरुद्ध शिवसेना अशी लढत झाली होती. त्यावेळी माजी नगराध्यक्ष बाबासाहेब पाटील व प्रकाश पाटील हे शिवसेना गटाचे प्रमुख होते पण यावेळी दोघांनीही जनस्वराज्य पक्षात प्रवेश केला आहे.त्यामुळे आमदार कोरे यांच्या गटाचे प्रमुख म्हणून सर्जेराव पाटील यांच्याबरोबर बाबासाहेब पाटील व प्रकाश पाटील माजी नगराध्यक्ष अमोल केसरकर यांनी निवडणुकीच्या अगोदरच प्रत्येक वॉर्डाची तयारी केली असल्याचे चित्र दिसून येत आहे तर यावेळी सत्यजित पाटील व रणवीर गायकवाड यांच्या गटाकडून विनायक कुंभार यांच्या पुढाकारातून प्रत्येक वॉर्डात तयारी केली आहे या वेळच्या निवडणुकीत महाविकास आघाडी शहरातील वाहतूक कोंडी, सांडपाणी प्रकल्प, पार्किंग प्रश्न, शासकीय जागेत अतिक्रमण, पूरग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या समस्या घेऊन ताकतीने लढणार आहे तर महायुती गतवेळी केलेल्या विकासकामांचा मुद्दा घेऊन या निवडणुकीत उतरणार असल्याचे चित्र दिसत आहे

# जयसिंगपुरात राजकीय घडामोडींना वेग

## नगराध्यक्षपदासाठी संजय पाटील-यड्रावकर यांची उमेदवारी चर्चेत

जयसिंगपूर,ता.६(प्रतिनिधी)-

**जयसिंगपूर नगरपालिका निवडणुकीसाठी राजकीय हालचाली गतिमान झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर जयसिंगपूर नगरपालिकेच्या राजकारणातील घडामोडींना वेग आला आहे. सत्ताधारी यड्रावकर गटातून नगराध्यक्षपदाचे उमेदवार म्हणून संजय पाटील यड्रावकर यांचे नाव जवळपास निश्चित झाले आहे. समविचारी पक्षाच्या नेत्यांनी हालचाली गतिमान केल्या आहेत. नगराध्यक्षपद सर्वसाधारण प्रवर्गासाठी खुले असल्यामुळे सत्ताधारी राजर्षी शाहू विकास आघाडीच्या तगड्या उमेदवारासमोर विरोधकांकडून कोण उमेदवार मैदानात उतरतो हे आता पहावे लागणार आहे.**

जनतेतून नगराध्यक्ष आणि तेरा प्रभागातून २६ नगरसेवक निवडून द्यावयाचे आहेत.विद्यमान आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर आणि त्यांचे बंधू माजी नगराध्यक्ष संजय पाटील यड्रावकर यांच्या राजर्षी शाहू विकास आघाडीच्यावतीने आपल्याला तिकीट



मिळावे याकरिता इच्छुकांनी कंबर कसली आहे. तर आघाडीच्या नेत्यांनी प्रभागात कोणत्या उमेदवाराला मतदारांचे पाठबळ मिळेल याबाबत चाचपणी सुरू केली आहे.

तालुक्यात काँग्रेसचे नेतृत्व गणपतराव पाटील करतात.विधान परिषदेतील काँग्रेसचे गटनेते आम.सतेज पाटील यांची भूमिका या निवडणुकीत निर्णायक ठरणार आहे.त्यातच राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखालील स्वाभिमानी शेतकरी संघटना, माजी आमदार उल्हास पाटील हे सर्वजण एकत्र येऊन समविचारी पक्षांची मोट बांधतील अशी राजकीय जाणकारातून चर्चा आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर डाव आणि प्रतिडाव हे सर्वच पक्षाकडून आखले जात आहेत. यामुळे होणारी निवडणूक ही सत्तेच्या सारीपाटावरील निर्णायक ठरणार आहे.

**राजश्री शाहू आघाडीकडे उमेदवारांची रिघ**

सत्ताधारी आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर यांच्या राजश्री शाहू विकास आघाडीकडे उमेदवारी मिळावी यासाठी शहरातील बहुतांश इच्छुकांनी देव पाण्यात घातले आहेत. अनेक उमेदवारांचे समर्थक मोठ्या प्रमाणात यड्रावकर बंधूंची भेट घेऊन उमेदवारीसाठी मागणी करत असल्याचे दिसून येत आहे. तर विरोधी आघाडीने मात्र यड्रावकर यांच्या उमेदवारांवरती लक्ष ठेवून उमेदवारी न मिळणाऱ्यांना आपल्या जाळ्यात ओढण्यासाठी डाव प्रति डाव सुरू केले आहेत.

# जयसिंगपूरात पंधराशे दुबार मतदारांची नोंद

जयसिंगपूर,ता.६(प्रतिनिधी)-

**जयसिंगपूर नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाली असून शहरात पंधराशे नावे दुबार असल्याचे आढळून आले आहे. मतदार यादी मध्ये या नावांच्या समोर डबल स्टार असून मतदारांना एकाच ठिकाणी मतदान करता यावे यासाठी पालिकेकडून खास नियोजन करण्यात येत आहे.**

निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनेनुसार पालिकेने या मतदार यादीमध्ये दुबार मतदारांना त्या ठिकाणी डबल स्टार करण्यात आले आहे. दुबार मतदारांना कोणत्याही एका ठिकाणी मतदान करता यावे यासाठी अधिकारी त्यांना संपर्क करून त्यांच्याकडून फॉर्म भरून घेण्यात येणार आहे. यातूनही शक्य झाले नाही तर मतदानादिवशी ज्या ठिकाणी दुबार मतदार मतदान करणार आहे त्या ठिकाणी त्यांच्याकडून घोषणापत्र घेऊन दुसरे मतदान करणार नाही याच्याबाबतचे प्रतिज्ञापत्र द्यावे लागणार आहे. त्यामुळे संभाव्य होणाऱ्या दुबार मतदारांच्यावर यावेळी चाप लागणार आहे.

# गडहिंग्लजमध्ये जनता दल,जनसुराज्य आघाडी चर्चेत

## राष्ट्रवादीला रोखण्यासाठी मोर्चेबांधणी सुरु; राजकीय पक्षांच्या भूमिकेकडे लक्ष

गडहिंग्लज,ता.६(वार्ताहर)-

**नगरपालिका निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर गडहिंग्लज नगरपालिकेसाठी राजकीय हालचालींना वेग आला आहे. पक्षाकडून उमेदवारी मिळविण्यासाठी इच्छुक उमेदवारांनी फिल्डींग लावली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत नेतेमंडळींची प्रतिष्ठा पणाला लागली असून नगराध्यक्षपद अनुसूचित जातीसाठी राखीव आहे.**

पालिकेची सत्ता मिळविण्यासाठी मोर्चेबांधणी सुरू झाली आहे.जनसुराज्य शक्ती पक्षाचे अध्यक्ष आम. विनय कोरे आणि जनता दलाच्या नेत्या प्रा. स्वाती शिंदे- कोरी यांची युती होण्याची शक्यता चर्चेत आहे. अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, मंत्री हसन मुश्रीफ यांच्या विरोधात कोरे यांच्या माध्यमातून कोरी, समरजितसिंह घाटगे यांच्यासह भाजपाचा एक गट, मनसे अशी व्यापक आघाडी होण्याची



शक्यता आहे. त्यादृष्टीने जोर बैठका घेतल्या जात आहेत.गतवेळी जनता दलाच्या हाती पालिकेची सत्ता होती. अटीतटीच्या व चुरशीच्या लढतीत प्रा.स्वाती शिंदे कोरी थेट नगराध्यक्ष पदी निवडून आल्या होत्या. राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने ना.हसन मुश्रीफ यांच्या नेतृत्वाने गडहिंग्लज नगरपालिका सत्ता मिळविण्यासाठी रस्सीखेच आहे.जनता दलाला रोखण्यासाठी मुश्रीफ प्रयत्नशील आहेत.

पालिकेची सत्ता अबाधित ठेवण्यासाठी जनता दलाने जनसुराज्य पक्षाचे अध्यक्ष आम. विनय कोरे यांची भेट घेतली आहे. राष्ट्रवादी विरोधात जनता दल १० व जनसुराज्य शक्ती पक्ष ८ तर भाजपा ४ तर अन्य घटक पक्ष २ जागा अशी आघाडी बहुचर्चित आहे. नगराध्यक्षपद जनसुराज्य शक्ती पक्षाकडे देवून राष्ट्रवादीला रोखायचेच व सत्तेचा सोपान जनता दलाकडे ठेवायचा अशी चर्चा आहे.

अजित पवार राष्ट्रवादी विरुद्ध जनता दल अशीच लढत होणार असली तरी जनसुराज्य शक्तीपक्षाची भूमिका महत्वपूर्ण ठरणार आहे.शरद पवार राष्ट्रवादीचे नेते समरजित घाटगे यांची भूमिका जाहीर केली नसली तरी हा पक्ष जनता दलासोबत राहण्याचे संकेत आहेत.काँग्रेस, ठाकरे व शिंदे शिवसेनेसह मनसेच्या भूमिकेकडे लक्ष लागले आहे. राष्ट्रवादी व जनता दल दोघांशीही भाजपची चर्चा सुरू आहे. नगराध्यक्षसाठी बेडा जंगम समाजाला संधी देण्याबाबत दोन्हींकडून प्रयत्न केले जात आहेत.

| प्रभाग | मतदार संख्या | सदस्य | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | २९६१ | २ | अ- अनुसूचित जाती,महिला ब- सर्वसाधारण |
| २ | २९८३ | २ | अ ना.मा.प्रवर्ग ब-सर्वसाधारण महिला |
| ३ | २८७० | २ | अ-ना.मा.प्रवर्ग महिला ब-सर्वसाधारण महिला |
| ४ | २८३४ | २ | अ सर्वसाधारण महिला ब-सर्वसाधारण |
| ५ | ३२२० | २ | अ- सर्वसाधारण महिला ब-सर्वसाधारण |
| ६ | २९२२ | २ | अ- सर्वसाधारण महिला ब-सर्वसाधारण |
| ७ | ३२२२ | २ | अ- ना.मा.प्रवर्ग महिला ब-सर्वसाधारण महिला |
| ८ | २७३३ | २ | अ- अनुसूचित जाती ब-सर्वसाधारण |
| ९ | २८१० | २ | अ-ना.मा. प्रवर्ग महिला, ब-सर्वसाधारण |
| १० | २८१६ | २ | अ-ना.मा. प्रवर्ग ब-सर्वसाधारण महिला |
| ११ | ३२५१ | २ | अ-ना.मा. प्रवर्ग ब-सर्वसाधारण महिला |

# मुरगूडमध्ये महायुतीतच दुरंगी लढत होण्याचे संकेत

## प्रत्येक गटाची तयारी स्वतंत्र लढण्याची,पण अंतिमक्षणी आघाड्या होणार?

मुरगूड,ता.६(प्रतिनिधी)-

**मुरगूड नगरपालिका निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर होताच राजकीय हालचाली गतीमान झाल्या आहेत.इच्छुकांनी यापूर्वीपासूनच आपल्यालाच उमेदवारी मिळावी व विजय मिळवण्यासाठी फिल्डिंग लावल्या आहेत.मुरगूड पालिका निवडणुकीचा यापूर्वीचा इतिहास पाहता दोन गट एकत्र आल्याशिवाय यश मिळत नाही असा आहे.याची जाणीव ठेवून नेतेमंडळी कामाला लागली आहेत.**

सध्या तरी तयारी स्वतंत्र लढण्याची सुरु असली तरी शेवटच्या क्षणी मुरगूड पालिका निवडणूक हि दुरंगीच होईल असे सध्याचे चित्र असून हि दुरंगी लढत महायुतीमध्येच होण्याची चिन्हे दिसत आहेत.इच्छुकांची भरमसाठ संख्या पाहता आघाड्यांची उभारणी आणि नगराध्यक्ष व नगरसेवक उमेदवारांच्या नावांची निश्चिती करताना नेतेमंडळींना मात्र तारेवरची कसरत करावी लागणार आहे.मुरगूड पालिकेचे एकूण दहा प्रभाग असून बहुसदस्यीय निवडीमुळे प्रत्येक प्रभागातून दोन असे २० नगरसेवक निवडले जाणार आहेत.एकूण दहा प्रभागातून १० हजार १२८ मतदार संख्या आहे . सर्वाधिक मतदार संख्या प्रभाग क्रमांक ७ मध्ये १ हजार १७३ इतकी आहे तर सर्वात कमी मतदार संख्या प्रभाग क्रमांक ३ मध्ये ८२९ इतकी आहे .

सर्वसाधारण खुल्या वर्गातून ७ (प्रभाग क्रं २,३,६,७,८,९ व १०) इतर मागास प्रवर्गातून २ (प्रभाग क्र . १ व ५) व अनुसूचित जाती प्रवर्गातून १ (प्रभाग क्रं ४ ) असे दहा पुरुष सदस्य निवडले जाणार आहेत तर महिला वर्गासाठी सर्वसाधारण खुल्या गटातून पाच सदस्य निवडले जाणार आहेत (प्रभाग क्र . १,३, ४, ५ व ७) इतर मागास प्रवर्गातून तीन सदस्य निवडले जातील त्यामध्ये ( प्रभाग क्रं २,६ व ८) तर अनुसूचित जाती प्रवर्गातून दोन महिला सदस्य निवडले जाणार आहेत (प्रभाग क्र ९ व १० )

नगराध्यक्षपद सर्वसाधारण (खुला) गटातील महिलेसाठी राखीव आहे त्यामुळे गटनेत्यांच्या घरातीलच पत्नी



सून किंवा बहिण किंवा अन्य महिला नातेवाईकांना प्राधान्य मिळणार आहे. त्यामुळे राजकारणातील घराण्यातील महिलांमध्येच नगराध्यक्ष पदासाठी रस्सीखेच होणार हे निश्चित आहे .

गेल्या सन २०१६ च्या निवडणूकीत ९ हजार ४५० मतदार संख्या होती या निवडणूकीसाठी ६७८ मतदार वाढून एकूण १० हजार १२८ मतदार संख्या झाली आहे त्यामध्ये ४ हजार ८५८ पुरुष मतदार व ५ हजार २७० स्त्री मतदार आहेत. पुरुषांपेक्षा ४१२ जादा महिला मतदार आहेत. दहा महिला सदस्या व नगराध्यक्ष महिलाच असल्याने पालिकेच्या राजकिय वर्तुळात महिला कार्यकर्त्यांना महत्व आले आहे. १० प्रभागातून एकूण १० हजार १२८ मतदार २० नगरसेवक आणि थेट नगराध्यक्ष पदाची निवड करणार आहेत. मतदारांमध्ये महिलांची संख्या पुरुषांहून अधिक असल्यामुळे महिला मतदारच किंगमेकर ठरणार आहेत.

गतवेळच्या निवडणुकीत माजी खासदार संजय मंडलिक यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने सत्ता बदलाचा करिष्मा घडवत स्पष्ट बहुमतासह व थेट नगराध्यक्षपदावर विजयी ध्वज फडकवला होता.

तथापी मंडलिक गटाकडून लोकनियुक्त नगराध्यक्ष म्हणून निवडून गेलेले राजेखान जमादार यांनी मुश्रीफ गटात प्रवेश केला त्यांच्यासोबत गोकुळचे अध्यक्ष रणजीतसिंह पाटील यांनीही मुश्रीफ गटात प्रवेश केला. तत्पूर्वी मुश्रीफ गटाचे प्रमुख मानले जाणारे प्रवीणसिंह पाटील यांनी जोरदार धक्का देत भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. हसन मुश्रीफ यांच्या उपस्थितीत पहिला मेळावा घेऊन मुश्रीफ गटाने सुरुवातीला प्रचारास जाहिर प्रारंभ केला. संजय मंडलिक यांनी वैयक्तिक गाठीभेटी घेऊन व युवा नेते वीरेंद्र मंडलिक यांनी घरोघरी जाऊन सत्ताकाळात केलेल्या कामांची माहिती देत कार्यकर्त्यांना रिचार्ज केले आणि गटात चैतन्य आणले आहे. समरजितसिंह घाटगे गटाने स्वतंत्र आघाडी उभारून सर्व जागा लढवण्याचा निर्धार करून निवडणुकीत रंगत आणली आहे. तर प्रवीणसिंह पाटील यांनी भाजप प्रवेशाच्या दुसऱ्या दिवसापासून मतदारांच्या भेटीगाठींवर भर दिला आहे. निवडणूक घोषणा होण्याअगोदरच अनेक स्थानिक राजकीय घडामोडी झाल्यामुळे ही निवडणूक अभूतपूर्व इर्षेची होणार हे निश्चित आहे.



बेघरांच्या मेळाव्यात मार्गदर्शन करताना आनंदा गुरव.

# रेंदाळमधील शिल्लक प्लॉट बेघरांसाठी द्या

## मेळाव्यात एकमुखी मागणी

रेंदाळ ,ता.६–

**लक्ष्मी नगर रेंदाळ येथील बेघरांसाठी शिल्लक ठेवलेले प्लॉट मागणी केलेल्या बेघर नागरीकांना द्या या मागणीसाठी रेंदाळ येथील बेघर कामगारांचा जनरल लेबर युनियनच्यावतिने रेंदाळ येथे मेळावा घेण्यात आला.**

गावातील बेघर नागरिकांना स्वतःचे घर मिळावे व येथील उद्योगधंद्यासाठी कामगार मिळावेत. या उद्देशाने बेघरांना घर मिळणे साठी पन्नास एकर जागा गायरान आरक्षित केली आहे पण ही जागा तशीच पडून आहे.या जागेचा अधिकार शासनास आहे. या जागेवर ज्या नागरिकांना घरे नाहीत.त्या नागरिकांना प्लॉट देण्यात यावी अशी मागणी मेळाव्यात एक मताने मंजुर केली. त्याचबरोबर या मागणीसाठी शासन पातळीवर आंदोलन करण्याचा निर्णय ही करण्यात आला.

यावेळी कामगार नेते कॉ. आनंदा गुरव, कॉ. मौला नदाफ कॉ रघुनाथ देशिंगे यांनी मेळाव्यात मार्गदर्शन केले तर सुजाता मोहिते, दिलावर मोमीन, इसाक कडगे, बानुबी नदाफ, तानाजी कुंभार, संजय कोळी, मारुती पाटील, अस्लम मुजावर, रामा जाधव प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.



शेतकऱ्यांच्या बैठकीत बोलताना आण्णासाहेब शहापूरे, व्यासपीठावर बसगोंडा बिरादार,सतिश मगदूम व इतर.

# मागील दोनशे व चालू ३७५० रुपया शिवाय ऊसतोड नाही

## शेतकऱ्यांचा निर्धार

इचलकरंजी ता.६–

**मागील गाळप हंगामातील दोनशे रुपये व चालू हंगामासाठी ३७५० रुपये घेतल्याशिवाय ऊसतोड द्यायची नाही असा निर्धार ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या बैठकीत घेण्यात आला.**

चालू हंगामासाठी वेगवेगळ्या साखर कारखान्याने ऊस दर जाहीर केला आहे. जाहीर केलेल्या दारावर चर्चा करून निर्णय घेण्यासाठी शहापुरे फॉर्म हाऊस येथे शेतकऱ्यांची बैठक होती. प्रारंभी स्वागत व प्रास्ताविक अण्णासाहेब शहापुरे यांनी केले. तर आर. के. पाटील, बाळासाहेब पाटील, सतीश मगदूम, भीमगोंडा पाटील, निवृत्ती शिरगुरे, शितल देवमोरे, संजय बेडक्याळे आदींनी मनोगत व्यक्त केले. त्यामध्ये अनेक मान्यवरांनी यंदा उसाचे क्षेत्र कमी असल्याने ऊसाला चांगला भाव येणार आहे. तेव्हा ऊस तोडणी करताना कोणतीही गडबड करू नये. तोडणी, वाहतूकदारांना पैसे देऊ नये तसेच आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सर्वच शेतकऱ्यांनी आपली एकी दाखवावी असे आवाहन केले.

बैठकीला स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष बसगोंड बिरादार, सतीश मगदूम, हेमंत वनकुंद्रे, कुबेर बेडकाळे, बाबुराव दरीबे, शिवगोंडा पाटील, अण्णा बेडक्याळे, बापू पाटील, रामा शेळके, भाऊसो रुग्गे, सदाशिव मिरजे, अनिल देवमोरे, सुनील गोंधळी, विष्णू साळुंखे, सागर पाटील, राजू येलाज यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# नामदेव भवनमध्ये ऑनलाइन नामदेव गाथा पारायण सांगता

इचलकरंजी ता ६–

**श्री नामदेव समाजसेवा मंडळ इचलकरंजी आणि सर्व संलग्न संस्थांच्या वतीने गुरुनानक जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात गुरुग्रंथ साहिब मध्ये समाविष्ट असलेल्या संत श्री नामदेव महाराजांच्या ६१ अभंगांचे पारायण नामदेव भवन येथे संपन्न झाले.**

यावेळी या वर्षी पार पडलेल्या ऑनलाईन गाथा पारायण समाप्तीचा समारोपही करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात श्री नामदेव महाराज आणि गुरुनानक यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. त्यानंतर प्रास्ताविक, पाहुण्यांचे स्वागत, आणि गाथा पारायणातील सहभागी कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी इचलकरंजी सिंधी पंचायतचे अध्यक्ष भगतराम छाबडा, उपाध्यक्ष प्रकाश पंजवानी आणि दिल्लीहून विशेष उपस्थिती असणारे जितेंद्रसिंह मदान हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.राजन उरुनकर यांनी अध्यक्षीय मनोगत केले, ह.भ.प. केशवराज गोंदकर यांचे प्रवचन, आरती आणि पसायदानाने कार्यक्रमाचा समारोप झाला.कार्यक्रमास समाजबांधव आणि नागरिकांची उपस्थिती होती.

# ऊस दरासाठी स्वाभिमानीने ऊस वाहतूक रोखली

हुपरी, ता. ६ (वार्ताहर)–

**एफआरपीपेक्षा अधिकचा दर आणि मागील हंगामातील थकीत दोनशे रुपये देण्याच्या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने जवाहर साखर कारखान्याकडे जाणारी ऊस वाहतूक हुपरी येथे अडवून आक्रमक भूमिका घेतली. ज्यामुळे काही काळ तणाव निर्माण झाला होता.**



सिद्धार्थ नगर येथील मुख्य रस्त्यावर दुपारच्या सुमारास हा प्रकार घडला. कारखान्याकडे ट्रॅक्टर, अंगद ट्रॉली आणि बैलगाड्यांमधून सुरू असलेली ऊस वाहतूक स्वाभिमानी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी अचानक थांबवली.अपेक्षित दर जाहीर न करता ऊस वाहतूक का सुरू केली? असा सवाल कार्यकर्त्यांनी विचारला.या आंदोलनामुळे वाहतूक ठप्प झाल्याने शहराच्या प्रवेश मार्गावर वाहतुकीची कोंडी झाली.

घटनेची माहिती मिळताच कारखान्याचे ॲग्री ओव्हरसीयर अमित चौगुले, धोंडीराम पाटील, दिपक कदम यांनी आंदोलकांशी चर्चा केली. चौगुले यांनी उद्यापासून ऊस दराचा निर्णय झाल्याशिवाय वाहतूक न करण्याचे आश्वासन दिले.कारखान्याच्या प्रतिनिधींकडून आश्वासन मिळाल्यानंतर कार्यकर्त्यांनी वाहने सोडून दिली आणि वाहतूक पुन्हा सुरू झाली.राजाराम देसाई, अशोक बल्लोळे, रामा पाटील, विजय माळी, भीमराव सव्वाशे, किरण शिंदे, सुरेश जावरे, रंगराव ठोंबरे यांच्यासह कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाले होते.

**दरम्यान, आंदोलनाचा व्हिडिओ करणाऱ्या एका ट्रॅक्टर चालकाला कार्यकर्त्यांनी धक्काबुक्की करत माफी मागायला लावली आणि व्हिडिओ डिलीट करायला लावला. मात्र, कारखान्याच्या ठोस आश्वासनानंतर सध्या तणाव निवळला असला तरी, ऊस दराचा प्रश्न सुटेपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेने दिला आहे.**

### टीईटीची सक्ती रद्द करण्यासाठी

# प्राथमिक शिक्षक समितीच्यावतीने १४ रोजी दिल्लीत धरणे आंदोलन

कोल्हापूर ता.६ (प्रतिनिधी)–

**सर्वोच्च न्यायालयाने पहिली ते आठवीला शिकवणाऱ्या सर्व शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा (टिईटी) सक्तीची केली आहे. या परीक्षेतून सर्व कार्यरत शिक्षकांना वगळण्यात यावे, शिक्षण हक्क कायद्यामध्ये आवश्यकता सुधारणा व्हाव्यात, शिक्षकांना आवश्यकतेनुसार रिफ्रेशमेंट कोर्स आयोजित करावेत या मागण्यांसाठी ऑल इंडिया फेडरेशन ऑफ एलिमेंटरी टीचर्स ऑर्गनायझेशन्स व महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्यावतीने १४ नोव्हेंबरला जंतर मंतर दिल्ली येथे धरणे आंदोलन करत असल्याची माहिती राष्ट्रीय अध्यक्ष प्रभाकर आरडे व महासचिव सुधाकर सावंत यांनी दिली.**

या आंदोलनात देशभरातील सर्व राज्यातून प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. महाराष्ट्रातूनही आंदोलनासाठी सर्व शिक्षकांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले. यावेळी कार्यालयीन सचिव उमेश देसाई, जिल्हाध्यक्ष प्रमोद तौंदकर, ऑडिटर राजेंद्र पाटील, उपस्थित होते.शहराध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस संजय कडगावे, राज्य प्रतिनिधी उत्तम कुंभार इत्यादी उपस्थित होते.

# गांधीनगरमध्ये गुरुनानक जयंती साजरी

गांधीनगर,ता.६(वार्ताहर)–

**शीख धर्मियांचे धर्मगुरू श्री गुरुनानक यांची जयंती गांधीनगरमध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. येथील नयनमनोहर विद्युत रोषणाई, गुरु ग्रंथ साहीब या ग्रंथाचे वाचन, नामजपाचा जयघोष करत गुरुनानक जयंती उत्साहात साजरी झाली.**



गुरुनानक जयंतीनिमित्त गांधीनगर बाजारपेठ बंद राहिली. सिंधी सेंट्रल पंचायतमध्ये गुरू ग्रंथ वाचन व तसेच गुरुद्वारा येथे भोगसाहेब सोहळा झाला. सिंधी सेंट्रल पंचायत, स्वामी प्रेम प्रकाश मंदिर, टेऊराम दरबार, भक्तीधाम, सच खंड धाम, जयरामदास ठाकूर दरबार, मेहरूराम दरबार, भाई केसाराम दरबार, भाई ईसरदास दरबार, भाई किसनचंद दरबार, भाई बुद्धदास दरबार, झंडूलाराम दरबार आदी ठिकाणी विविध धार्मिक कार्यक्रमांनी गुरुनानक जन्मसोहळा उत्साहात झाला. सिंधी सेंट्रल पंचायतसह सर्व दरबार, मंदिरे व चौकाचौकांमध्ये आयोजित महाप्रसादाचा भक्तांनी लाभ घेतला. अबालवृद्धांच्या उपस्थितीमध्ये पवित्र कार्तिक मास फेरीची सांगताही झाली. बाल-बालिकानी केलेली श्रीकृष्ण-राधेच्या वेशभूषेने गुरुनानक जयंती सोहळ्याला रंगत आली. रात्री उशिरापर्यंत भजन, कीर्तन, ग्रंथ वाचन व विविध धार्मिक कार्यक्रमात येथील सिंधी समाज सहभागी झाला होता.

# चित्तरंजन कांबळे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

इचलकरंजी,ता.६–

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीतील एक उभरता युवा कार्यकर्ता,वंचित बहुजन आघाडीचे युवा शहराध्यक्ष चित्तरंजन कांबळे यांचा वाढदिवस सिद्धार्थ हौसिंग सोसायटी या ठिकाणी माजी उपनगराध्यक्ष रवि रजपुते यांच्या हस्ते केक कापून साजरा करण्यात आला.**



वाढदिनी शुभेच्छा देण्यासाठी माजी उपनगराध्यक्ष तानाजी पोवार, प्रकाश मोरबाळे, माजी नगरसेवक मदन कारंडे, सागर चाळके, मनोज साळुंखे, संगीता कांबळे, सिद्धार्थ हौसिंग सोसायटीचे चेअरमन प्रमोद बेलेकर, राजेंद्र कांबळे, किरण पोवार, सिद्धार्थ कांबळे, प्रदीप कांबळे, मनोहर कांबळे, प्रवीण चव्हाण, अमर कांबळे, राहुल कांबळे, अमित कांबळे, किशोर कुरणे, संजय शिंदे, बबन कांबळे, विकी चाफेकर, नितीन कांबळे, प्रणील भाईमाने, सोमनाथ चाफेकर, विजय कांबळे, विशाल शिंदे, सुनील प्रताप यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते व मित्र परिवार उपस्थित होते.

# लोकशाहीर सातपुते यांच्या शाहिरी कलेचा वारसा नव्या पिढीने जतन करावा : कांबळे

गारगोटी,ता.६–

**लोटेवाडी(ता.भुदरगड) येथील लोकशाहीर गणपती सातपुते यांच्या शाहिरी कलेचा वारसा नव्या पिढीने जतन करावा, असे शाहीर बंडेराव कांबळे यांनी सांगितले. कोल्हापूर जिल्ह्यातील ४६ जेष्ठ व युवा शाहिरांनी शाहिरी प्रबोधन कार्यक्रमास हजेरी लावली होती.**



लोकशाहीर गणपती सातपुते यांच्या शाहिरी कलेचा वारसा या कार्यक्रमप्रसंगी उपस्थित ज्येष्ठ, युवा शाहीर आदी.

शाहीर सातपुते यांच्या अमोघ वाणीचा, पहाडी आवाजाचा, कलेसाठी वर्षानुवर्ष जगलेल्या शाहिरी गाण्याच्या कार्याची ओळख अनेक शाहिरांनी शाहिरी गाण्यातून जागृत केली.प्रत्येक शाहिरीने आपली कला यावेळी सादर केली. मोहन सातपुते म्हणाले की, गणपती सातपुते यांनी जनसामान्य लोकांच्या अडचणी सोडविल्या तसेच शाहिरी गाण्यातून जन प्रबोधन केले.विविध सामाजिक विषयावर जनजागृती केली. कार्यक्रमास शाहिर नामदेव निकम,रविंद्र दबडे,सुभाष तोंदले, संजय देसाई, दिलीप गणपुले, संजय मोहिते, बंडेराव कांबळे, रामदास सातपुते, मारुती केसकर, किरण पोवार, सागर चौगुले, विठ्ठल कांबळे, आंनदा कुरळे, सात्तप्पा गुरव, युवराज मालप, बाळासो कांबळे, महादेव काशिलकर, बाळासाहेब कांबळे, रंगराव पाटील, संजय इंगळे, परसु कांबळे, बचाराम इंगळे, लक्ष्मण कांबळे,शाहीर धोंडीराम नलवडे यांच्यासह शिवाजी सारंग, बबन खवरे, आनंदा सारंग, बाजीराव सातपुते, बबन सातपुते,उपस्थित होते. आभार कुंडलिक शिर्सेकर यांनी मानले.



# खुपिरेत ट्रान्सफर फोडून कॉपरची चोरी

कोपार्डे,ता.६(प्रतिनिधी)–

**खुपिरे येथील विठ्ठल सहकारी पाणीपुरवठा संस्थेचा ट्रान्सफॉर्मर रात्री चोरट्यानी फोडला. यातून कॉपर व साहित्याची चोरी केली. ट्रांसफार्मर फोडल्यामुळे २०० एकर शेतीच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. यावेळी घटनास्थळी पोलिसांनी पंचनामा केला आहे.**

खुपिरे येथील विठ्ठल सहकारी पाणीपुरवठा संस्थेची जॅकवेल भोगावती नदीच्या काठावर आहे. येथे जॅकवेल जवळ संस्थेच्? ट्रान्सफॉर्मर होता. चोरट्यांनी रात्री वीज पुरवठा करणारी केबल कट करून ट्रान्सफॉर्म फोडला आहे. यातील सुमारे साडेतीनशे लिटर ऑइल सोडून देण्यात आले आहे. या ट्रान्सफॉर्मर मध्ये २२ किलोच्या बारा कॉइल होत्या.

यातून चार लाखाची कॉपरची चोरी केली, सुमारे ६० हजार चे ऑइल होते ,मजुरी असा सर्व खर्च पाच लाखाचा संस्थेवर पडला आहे. हंगाम सुरू झाला असून उसाला पाण्याची मागणी होत असताना चोरी झाल्यामुळे २०० एकर शेतीच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

यावेळी याबाबत करवीर पोलिसात तक्रार दिल्यानंतर पोलीस विजय तळसकर, अमोल चव्हाण यांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष आनंदा पाटील, संचालक सर्जेराव पाटील, बळवंत पाटील,सचिव प्रकाश कुंभार उपस्थित होते.

# बेडकिहाळ–शमनेवाडी सर्कलमधील वाहने शेतकरी संघटनेने सोडली

### शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी घेतला निर्णय

बेडकिहाळ,ता.६(वार्ताहर)–

गेल्या सहा दिवसापासून बेडकिहाळ सर्कल परिसरातील शमनेवाडी ते सदलगा या प्रमुख मार्गावर, महाराष्ट्रातील साखर कारखान्याकडे जात असलेले सुमारे ८० ते १०० ऊस वाहतुक करत असलेली वाहने स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने रोखण्यात आली होती. मात्र साखर कारखान्यांनी योग्य तो निर्णय न घेतल्याने, शेतकऱ्यांच्या ऊस वाळत असून संभाव्य नुकसान लक्षात घेऊन ऊस भरलेली वाहने सोडण्यात यावीत अशी विनंती शेतकऱ्यांनी केली होती.त्यामुळे वाहनचालकांची गैरसोय टाळत शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी थांबून राहिलेली वाहने



बेडकिहाळ शमनेवाडी सर्कल मध्ये रोखण्यात आलेली उस वाहतूकीची वाहने सोडताना राजू खिचडे, रमेश पाटील, उपनिरीक्षक शिवकुमार बिरादार व शेतकरी.

सोडण्याचा निर्णय आज दुपारी घेतला असे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते राजू खिचडे यांनी सांगितले.प्रतिटन ३५०० रूपये घेतल्याशिवाय ऊसतोड करू देणार नसल्याचे सांगीतले.

याप्रसंगी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते रमेश पाटील,बाबासाहेब खोत, भारत खोत, मंजु भानुसे, अजित कोन्नूरे, विजय मडिवाळ, अभय पाटील, भारत अम्मानवर उपनिरीक्षक.शिवकुमार बिरादार ऊस उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

## युवकाची आत्महत्या

सांगली ,ता.६ (प्रतिनिधी)–

**खरशिंग (ता. कवठेमहांकाळ) येथे एका युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली असून, याची नोंद कवठेमहांकाळ पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, खरशिंग येथील सौरभ बाबासाहेब मलमे (वय २२) या युवकाने राहत्या घरात तुळईला दोरीने गळफास घेऊन जीवन संपवले. या घटनेची फिर्याद सुनिता सुभाष मलमे (वय ३५, रा. खरशिंग) यांनी कवठेमहांकाळ पोलिस ठाण्यात दिली आहे.

घटनेची माहिती मिळताच कवठेमहांकाळ पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला असून, पुढील तपास सुरू आहे.

# रुकडी उपसरपंचपदी पाकीजा मुल्लानी

रुकडी,ता.६(वार्ताहर) –

**येथील ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी पाकीजा मुल्लानी यांची बिनविरोध निवड झाली.**



ग्रामपंचायतीच्या कै.खा. बाळासाहेब माने सभागृहामध्ये ही निवड प्रक्रिया झाली. निवडणूक निरीक्षक म्हणून सरपंच राजश्री रूकडीकर यांनी काम पाहिले. खा. धैर्यशील माने यांनी टाकलेली जबाबदारी निष्ठेने पार पाडू. गावच्या हितासाठी व विकासासाठी या पदाचा वापर करू, असे उपसरपंच पाकीजा मुल्लानी यांनी सांगितले. यावेळी ग्रामसेवक अजय वाघ, मावळत्या उपसरपंच मालती इंगळे,ग्रा.पं. सदस्य शितल खोत,शमूवेल लोखंडे, राजकुमार मोहिते, राहुल माने, सिकंदर पेंढारी, शंकर मुरूमकर, श्वेता दाभाडे, शोभा कोळी,अश्विनी सुतार, अश्विनी इंगळे, वनिता गायकवाड तसेच संतोष रुकडीकर,दिलीप इंगळे,राज मुल्लानी, राजू सुतार उपस्थित होते.

# पाच हजाराची लाच स्विकारताना महावितरणचा कर्मचारी जाळ्यात

सातारा,ता.६–

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी दहिवडी शहर शाखेतील राहुल आनंदराव महालिंगे यास ५०००रुपयाची लाच स्वीकारताना रंगहात पकडण्यात आले.**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या दहिवडी शहर शाखेतील राहुल आनंदराव महालिंगे यांनी तक्रारदाराकडे नवीन व्यावसायिक विद्युत कनेक्शन जोडणी करिता पाच हजार रुपयाची लाचेची मागणी करून पंचासमक्ष स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले.

या सापळा पथकात पोलीस निरीक्षक सुनील पाटील, गणेश ताटे, निलेश राजपुरे, नवनाथ शिंदे, सत्यम थोरात, पोहवा पुजारी होते. तपासी अधिकारी म्हणून लाचलुतपत प्रतिबंधक विभाग साताराच्या पोलीस निरीक्षक सुप्रिया गावडे कार्य करीत आहेत.

# विनापरवाना आरायंत्र व मशिनवर वनविभागाची कारवाई

कोल्हापूर ता.६ (प्रतिनिधी) –

**सहाय्यक वनसंरक्षक (वनीकरण व कॅम्प) कोल्हापूर व वनपाल करवीर, वनरक्षक करवीर हे टिंबर मार्केट या ठिकाणी फिरती करीत असताना गोपनिय माहितीनुसार कल्पना फर्निचर या दुकानामध्ये उभे आरायंत्र (वर्तुळाकार करवत) १८ इंच हे विनापरवाना वापरत असल्याचे दिसून आले.**

आरागिरणी यंत्र मालक राजू आनंदराव सुतार, रा.टिंबर मार्केट, कोल्हापूर यांच्याकडे आरायंत्राची परवाना मागणी केली असता आरायंत्र परवाना नसल्याचे सांगितले. हे आरायंत्र विनापरवाना असल्याचे निदर्शनास आल्याने वनरक्षक करवीर यांचेकडील महाराष्ट्र वन नियमावली च्या अनुषंगाने गुन्हा नोंद केला आहे. या गुन्ह्यामध्ये वापरण्यात आलेले उभे आरायंत्र (वर्तुळाकार करवत) १८ इंच, व्हील २, ब्लेड पाते १ (१२० इंच लांबी) इ. साहित्य जप्त करुन संरक्षणाच्या दृष्टीने वनविभागाच्या ताब्यात घेण्यात आले असून पुढील तपास सुरु आहे.

काजवे फर्निचर इंडस्ट्रीजची तपासणी केली असता दोन चाक असलेले बेंड सॉ मशिन विनापरवाना मिळून आल्याने आरोपी राजेश मारुती काजवे यांच्याविरुध्द गुन्हा नोंदविला.


**कोल्हापूर महानगरपालिका,**
**राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान,**
**जाहीर नोटीस क्र. ८८**

कोल्हापूर महानगरपालिका आरोग्य विभाग, १५ वित्त आयोग अंतर्गत फर्निचर साहित्य खरेदी करणेकरिता जेम पोर्टलवरुन निवीदा मागविणेत येत असुन GeM Bidding No- GeM/2025/B/6858743 हे असुन याप्रमाणे प्रसिध्दी करणेत आलेली आहेत. तरी, इच्छुक पुरवठादारांनी अधिक माहितीसाठी जेम पोर्टल संकेतस्थळावर भेट द्यावी. निविदा सादर करणेचा कालावधी दिनांक १७/११/२०२५ रोजी अखेर आहे.

**आरोग्याधिकारी**
**कोल्हापूर महानगरपालिका**



# भारताने ऑस्ट्रेलियाला ४८ धावांनी नमवले

## टी २० मालिकेत २-१ ने आघाडी; सुंदरने ३ धावांत घेतले ३ बळी

कॅनबेरा,ता.६-

**क्वीन्सलँडमधील कॅरारा ओव्हल येथे झालेल्या टी-२० मालिकेतील चौथ्या सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाचा ४८ धावांनी पराभव करून पाच सामन्यांच्या मालिकेत २-१ ने आघाडी घेतली. मालिकेतील पहिला सामना पावसामुळे रद्द झाला होता. चौथ्या सामन्यात नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना भारताने १६७ धावा केल्या. भारताकडून शुभमन गिलने सर्वाधिक ४५ धावा केल्या. प्रत्युत्तरा दाखल ऑस्ट्रेलियाचा संघ १८.२ षटकांत ११९ धावांवर बाद झाला.**

ऑस्ट्रेलियाकडून मिचेल मार्शने सर्वाधिक ३० धावा केल्या. ऑस्ट्रेलियाने चांगली सुरुवात केली पण ठराविक अंतराने त्यांनी आपल्या विकेट्स गमावल्या. भारताकडून वॉशिंग्टन सुंदरने तीन, अक्षर पटेल आणि शिवम दुबेने प्रत्येकी दोन, अर्शदीप सिंग, जसप्रीत बुमराह आणि वरुण चक्रवर्ती यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

**अष्टपैलू अक्षर पटेलला सामनावीर म्हणून गौरवण्यात आले. त्याने भारतीय डावाच्या शेवटच्या षटकांमध्ये ११ चेंडूत नाबाद २१ धावा केल्या, ज्यामध्ये एक चौकार आणि एक षटकार होता.**

नाणेफेक गमावल्यानंतर आणि प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर भारत २० षटकांत १६७ धावा करण्यात यशस्वी झाला. चांगल्या सुरुवातीनंतर भारतीय संघाच्या एकाही फलंदाजाला त्याचे रुपांतर मोठ्या खेळीत करता आले नाही. त्यामुळे टीम इंडिया



१५० धावांचा टप्पाही ओलांडणार नाही असे वाटत होते. पण शेवटी अक्षर पटेलने फटकेबाजी केल्यानंतर टीम इंडियाला १६७ धावा करण्यात यश आले.

भारताकडून शुभमन गिलने सर्वाधिक धावा केल्या. गिलने ३९ चेंडूत ४६ धावा केल्या. अभिषेकने २८, शिवम दुबेने २२, अक्षर पटेलने नाबाद २१ आणि कर्णधार सूर्यकुमार यादवने २० धावा केल्या. ऑस्ट्रेलियाकडून ॲडम झांपा आणि नाथन एलिसने प्रत्येकी तीन विकेट घेतल्या. पाच सामन्यांच्या मालिकेतील चौथ्या टी२० मध्ये ऑस्ट्रेलियन कर्णधार मिचेल मार्शने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता.भारतीय संघात कोणताही बदल झाला नाही, तर ऑस्ट्रेलिया संघात चार बदल करण्यात आले होते.





## किशोर-किशोरी राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धा

### मुंबई शहर पश्चिम, रत्नागिरी, नंदूरबार, लातूर व पुणे शहरची आगेकूच

पुणे,ता.६-

**३६ व्या किशोर किशोर राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेत किशोरी गटात मुंबई शहर पश्चिम, रत्नागिरी, नंदूरबार तर किशोर गटात लातूर, नंदुरबार व पुणे शहर यानी आगेकूच सुरू ठेवली आहे.**



पिंपरी चिंचवड बोपखेल येथील श्रीरंग धोदाडे क्रीडानगरीत कै.राकेश घुले कबड्डी संघ व युवा प्रतिष्ठान संघ यांच्यावतीने आयोजित दुसऱ्या दिवसातील पहिल्या सत्रात झालेल्या सामन्यात किशोरी विभागात या गटात मुंबई शहर पश्चिम संघाने मुंबई उपनगर पूर्व संघाचा ५७-२१ असा सहज पराभव केला.किशोरी ब गटात नंदुरबारने बीड संघाचा ६३-२९ असा फडशा पाडला.

किशोर विभागात अत्यंत चुरशीच्या झालेल्या ग गटात लातूरने बलाढ्य मुंबई उपनगर पश्चिमला ५२-४९ असे चकविले. विश्रांतीपूर्वी ३०-२० अशी आघाडी घेणाऱ्या लातुरला नंतर मात्र, मुबंई उपनगरने विजयासाठी झुंजविले.नंदुरबारने मुंबई शहर पश्चिम संघाला ह गटात ५३-२९ असे नमवित आगेकूच केली.ब गटात पुणे शहर संघाने सोलापूर संघाचा ५३-२६ असा पाडाव केला. कार्तिक तरडे व श्रेयश सुरवसे यांनी या विजयात उत्कृष्ठ खेळ केला. सोलापूरचा अथर्व सोनार चमकला.

## स्नेहा बसुदे हिची राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी निवड

इचलकरंजी,ता.६-

**येथील गंगामाई स्पोर्टसच्या कु. स्नेहा बसुदे हीची जळगाव येथे होणाऱ्या १६ वर्षाखालील राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी कोल्हापूर विभागातून निवड झाली आहे.**



कु. स्नेहा बसुदे हिने आतापर्यंत अनेक स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी केली असून तिच्या या कामगिरीमुळेच तिची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तिला प्रशिक्षक शेखर शहा, बी. ए. माने आणि के. ए. पाटील यांचे मार्गदर्शन लाभत आहेत. तर मुख्याध्यापिका सौ. ए. एस. काजी, उपमुख्याध्यापिका सौ. व्ही. एस. लोटके, उपप्राचार्य व्ही. जी. पंतोजी, पर्यवेक्षक एस. एस. कोळी यांचे प्रोत्साहन लाभत आहे. या यशाबद्दल संस्थेचे प्रेसिडेंट श्रीनिवास बोहरा, चेअरमन कृष्णा बोहरा, व्हाईस चेअरमन उदय लोखंडे, ट्रेझरर महेश बांदवलकर, मानद सचिव बाबासाहेब वडींगे, स्कुल कमिटी चेअरमन मारुतराव निमणकर यांच्यासह सर्व पदाधिकारी, विश्वस्त यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

## जिल्हास्तरीय महिला क्रिकेट स्पर्धेत डॉ.पतंगराव कदम विद्यालय प्रथम

कुंडल, ता.६ -

**नव कृष्णा व्हॅली कुपवाड येथे झालेल्या १९ वर्षाखालील शालेय जिल्हास्तरीय महिला क्रिकेट स्पर्धेत कुंडलच्या डॉ.पतंगराव कदम माध्यमिक विद्यालय संघाने प्रथम क्रमांक मिळवला.** या संघाची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. संघास संस्थेचे संस्थापक महेंद्र लाड,मुख्याध्यापिका कांचन बाबर यांचे प्रोत्साहन तर राहुल शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

## रैना,धवनची ११.१४ कोटींची मालमत्ता ईडीकडून जप्त

नवी दिल्ली,ता.६-

**ईडीने माजी क्रिकेटपटू सुरेश रैना आणि शिखर धवन यांच्या ११.१४ कोटी रुपयांच्या मालमत्तेवर जप्ती केली आहे. ईडीने सुरेश रैनाच्या ६.६४ कोटी रुपयांच्या म्युच्युअल फंड गुंतवणूकी आणि शिखर धवनच्या ४.५ कोटी रुपयांच्या स्थावर मालमत्तेवर जप्ती केली आहे. ईडीची ही कारवाई १ आणि त्याचे सरोगेट ब्रँड १ आणि १ स्पोर्टिंग लाइन्ससह बेकायदेशीर ऑफशोअर बेटिंग प्लॅटफॉर्मच्या चालू चौकशीचा**



**भाग म्हणून करण्यात आली आहे. विविध राज्य पोलीस एजन्सींनी दाखल केलेल्या अनेक एफआयआरच्या आधारे तपासात असे दिसून आले की, या संस्था भारतीय वापरकर्त्यांना लक्ष्य करून अनधिकृत ऑनलाइन बेटिंग आणि जुगार सेवा चालवत होत्या.**

ईडीच्या मते रैना आणि धवन दोघांनीही १ च्या सरोगेट्सना प्रोत्साहन देणाऱ्या परदेशी संस्थांसोबत एंडोर्समेंट डील केले होते. काही दिवसांपूर्वी हे स्पष्ट झाले की, अंमलबजावणी संचालनालय काही प्रमुख क्रिकेटपटू आणि इतर सेलिब्रिटींविरुद्ध कारवाई करण्याची तयारी करत आहे. ऑनलाइन बेटिंग आणि गेमिंगशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात अनेक प्रमुख खेळाडू आणि चित्रपट कलाकार कधीही अडकू शकतात अशी माहिती होती. ईडीने सुरेश रैना आणि शिखर धवन यांच्या मालमत्ता जप्त करून ही कारवाई सुरू केली आहे.

ईडीने गेल्या काही आठवड्यात युवराज सिंग, सुरेश रैना, रॉबिन उथप्पा आणि शिखर धवन सारख्या क्रिकेटपटूंची तसेच अभिनेता सोनू सूद, मिमी चक्रवर्ती (तृणमूल काँग्रेसचे माजी खासदार) आणि अंकुश हाजरा (बंगाली चित्रपट) यांचीही चौकशी केली आहे. काही सोशल मीडिया प्रभावकांचीही चौकशी करण्यात आली आणि त्यांचे जबाब नोंदवण्यात आले. निधीसाठीचे पैसे त्यांचे बेकायदेशीर मूळ- बेकायदेशीर सट्टेबाजीशी संबंधित गुन्ह्यांचे उत्पन्न लपविण्यासाठी परदेशी व्यवहारांद्वारे केले गेले.

## मोहम्मद शमीसाठी भारतीय संघाचे दरवाजे कायमचे बंद?

नवी दिल्ली, ६-



१४ नोव्हेंबरपासून दक्षिण आफ्रिकेविरुद्ध होणाऱ्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी मोहम्मद शमीचा भारतीय संघात समावेश करण्यात आलेला नाही. बीसीसीआयने कसोटी संघ आणि भारत अ संघाची घोषणा केली. दोन्ही संघातून या वेगवान गोलंदाजाचे नाव वगळण्यात आले. २०२३ च्या विश्वचषक आणि २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये संयुक्तपणे सर्वाधिक विकेट्स घेणारा शमी मार्च २०२५ मध्ये शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना खेळला होता. पण तेव्हापासून तो भारतीय जर्सीमध्ये खेळताना दिसला नाही. इंग्लंड आणि वेस्ट इंडिजविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठीही त्याला संघात स्थान देण्यात आले नव्हते. दक्षिण आफ्रिका मालिकेतून त्याला वगळल्याबद्दल आता त्याची क्रिकेट कारकिर्द संपुष्टात आली असल्याची चर्चा भारतीय क्रिकेट वर्तुळात सुरु झाली आहे.

मोहम्मद शमी काही काळापासून नियमितपणे देशांतर्गत क्रिकेट खेळत आहे. बंगालसाठी त्याने गेल्या तीन रणजी ट्रॉफी सामन्यांमध्ये चांगली कामगिरी करूनही, त्याला पुन्हा एकदा कसोटी संघातून वगळण्यात आले आहे. त्याने बंगालला उत्तराखंड आणि गुजरातवर सलग विजय मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली होती. शमीने गेल्या तीन रणजी ट्रॉफी सामन्यांमध्ये जवळपास ९३ षटके गोलंदाजी केली. आणि १५ पेक्षा जास्त विकेट्स घेतल्या आहेत.

निवडकर्त्यांना असे वाटते की, शमीचे कसोटी क्रिकेटच्या कठोरतेचा सामना करू शकेल की, नाही याची खात्री नाही. कसोटी क्रिकेट खेळण्यासाठी दीर्घ सरावाची आवश्यक असते. स्थानिक क्रिकेटमध्येही शमी अनेकदा प्रभावी सरावानंतर विश्रांती घेतो. त्यामुळे त्याच्या फिटनेसवर अजूनही प्रश्नचिन्ही कायम आहे. द.आफ्रिकेच्या मालिकेनंतर भारत किमान सहा महिने कसोटी क्रिकेट खेळणार नाही. त्यामुळेच शमीसाठी भारतीय संघाचे दरवाजे बंद झाल्याची चर्चा सुरु झाली आहे.



## शासकीय कबड्डी स्पर्धेत गंगामाई गर्ल्स हायस्कूलला विजेतेपद

इचलकरंजी,ता.६-

**इचलकरंजी महानगरपालिकेच्या वतीने आयोजित शालेय शासकीय कबड्डी स्पर्धेत १४ वर्षाखालील गटात गर्ल्स हायस्कुल अॅन्ड ज्युनिअर कॉलेज, १७ वर्षाखालील आणि १९ वर्षाखालील गटात गंगामाई गर्ल्स हायस्कुलने विजेतेपद मिळविले. विजयी संघांची रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथे होणाऱ्या विभागीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.**

येथील डायनॅमिक स्पोर्टस् क्लबच्या मैदानावर संपन्न या स्पर्धेत १४ वर्षाखालील गटात १२, १७ वर्षाखालील गटात १८ तर १९ वर्षाखालील गटात ८ संघ सहभागी झाले होते. स्पर्धेचा शुभारंभ महानगरपालिका क्रीडा अधिकारी सुर्यकांत शेटे, शेखर शहा, बी. एस. माने, रफिक मांगुरे, बाळू चव्हाण, वसिम बागवान, ओंकार खानाज, सचिन खोंद्रे, संजय कांबळे, विजय गुख व संजय परीट यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.

सर्वच सामने अत्यंत चुरशीने खेळले गेले. प्रत्येक खेळाडूने आपले कसब पणाला लावत संघाच्या विजयासाठी प्रयत्न केले. १४ वर्षाखालील गटात गर्ल्स हायस्कुल अॅन्ड ज्युनिअर कॉलेज (प्रथम), ताराबाई गर्ल्स हायस्कूल (द्वितीय) व तात्यासाहेब मुसळे हायस्कुल (तृतीय), १७ वर्षाखालील गटात गंगामाई गर्ल्स हायस्कुल (प्रथम), सरस्वती हायस्कुल (द्वितीय) व ताराबाई गर्ल्स हायस्कुल (तृतीय) तर १९ वर्षांखालील गटात गंगामाई गर्ल्स हायस्कुल (प्रथम), डीकेटीई मराठी मिडीयम ज्युनिअर कॉलेज (द्वितीय) आणि ताराबाई गर्ल्स हायस्कुल (तृतीय) यांनी यश मिळविले.

## वर्ल्डकप विजेत्या भारतीय संघाला मिळणार कार

### टाटा मोटर्सकडून घोषणा

नवी दिल्ली,ता.६-

**भारतीय महिला क्रिकेट संघाने महिला विश्वचषकाच्या ट्रॉफीवर नाव कोरले. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्त्वाखालील संघाने दक्षिण आफ्रिकेचा पराभव करत जेतेपद आपल्या नाव कोरले. वर्ल्ड चॅम्पियन ठरल्यानंतर सगळ्याच स्तरावरून भारताच्या लेकींचे कौतुक केले जात आहे. सरकार, बीसीसीआय आणि विविध राज्ये संघातील खेळाडूंसाठी खास पुरस्कार जाहीर करत आहे. याचदरम्यान टाटा मोटर्सने मोठी घोषणा केली आहे.**

भारतीय महिला क्रिकेट संघाने भारतात झालेल्या या विश्वचषकात उत्कृष्ट कामगिरी केली आणि अखेरीस वर्ल्ड चॅम्पियन होण्याचा मान मिळवला. अंतिम फेरीत टीम इंडियाने दक्षिण आफ्रिकेचा ५२ धावांनी पराभव करत जेतेपद आपल्या नावे केले. या विजयानंतर भारतीय महिला संघाने पंतप्रधान नरेंद्र मोदींचीदेखील भेट घेतली. यानंतर आता टाटा मोटर्सने प्रत्येक खेळाडूला कार भेट म्हणून देणार असल्याची घोषणा केली आहे.

टाटा मोटर्सने त्यांच्या एका अधिकृत हँडलवर पोस्ट केली आहे की, २०२५ चा विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय महिला क्रिकेट संघातील प्रत्येक खेळाडूला कंपनीकडून लाँच केली जाणारी एक नवीन टाटा सिएरा कार दिली जाईल. याची घोषणा करताना कंपनीने कॅप्शनमध्ये लिहिले ''

टाटा मोटर्सची नवी टाटा सिएरा कार २५ नोव्हेंबर रोजी लाँच होणार आहे. या कारच्या पेट्रोल आणि सीएनजी व्हर्जनची शोरूम किंमत सुमारे ११-२० लाख असेल, तर ईव्हीची किंमत २०-२५ लाख आहे. ही लाँच होणारी नवी कार वर्ल्ड चॅम्पियन ठरलेल्या भारतीय संघातील प्रत्येक खेळाडूला दिली जाणार आहे.

भारतीय महिला क्रिकेट संघाला बीसीसीआयने विश्वचषकाचे जेतेपद पटकावल्यानंतर ५१ कोटींची स्वतंत्र बक्षीस रक्कम जाहीर केली आहे. शिवाय, विजेतेपद जिंकल्यानंतर, भारतीय संघाला आयसीसीकडून ३९.७७ कोटी बक्षीस रक्कम मिळाली. एवढेच नाही तर विश्वचषकात खेळणाऱ्या प्रत्येक संघाला २.२० कोटी रुपये देण्यात आले आहेत. सामना जिंकणाऱ्या संघाला ३० लाख रुपये बक्षीस देण्यात आले.

म्हणजेच भारताने अंतिम सामन्यासह पाच सामने जिंकले आहेत आणि यासाठी टीम इंडियाला १.५० कोटी रूपये आयसीसीकडून मिळाले. या व्यतिरिक्त, विविध राज्याच्या सरकारकडून खेळाडूंसाठी बक्षीस रक्कम जाहीर केली जात आहे.

## मलोलन रंगराजन आरसीबी महिला संघाचे नवे मुख्य प्रशिक्षक

बंगळुरु,ता. ६-

**रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने आगामी महिला प्रीमियर लीग हंगामासाठी मलोलन रंगराजन यांची संघाच्या नवीन मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती केली आहे. ते २०२४ पासून या पदावर असलेल्या ल्यूक विल्यम्स यांची जागा घेणार आहेत.**



आगामी हंगाम जानेवारीच्या सुरुवातीला सुरू होणार आहे. या काळात ल्यूक विल्यम्स बिग बॅश लीगमध्ये ॲडलेड स्ट्रायकर्सच्या मुख्य प्रशिक्षकपदी व्यस्त असणार आहेत म्हणूनच त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे.

तामिळनाडूचे माजी क्रिकेटपटू मलोलन रंगराजन गेल्या सहा वर्षांपासून आरसीबी फ्रँचायझीशी विविध भूमिकांमध्ये जोडले गेले आहेत. गेल्या दोन वर्षांपासून त्यांनी आरसीबी महिला संघाचे सहाय्यक प्रशिक्षक म्हणून काम पाहिले आहे. स्मृती मानधना म्हणाली,त्यांच्याशी खूप चांगले संबंध आहेत क्रिकेटवर आमच्यात अनेक चर्चा झाल्या आहेत.